
# देशोदेशीचें लोकशिक्षण



म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
स. नं. १०२६
REFBK-0008530

जगताप-कारले प्रकाशन, पुणे २.

: प्रकाशक :
स. आ. जगताप
जगताप-कारले प्रकाशन
१९२ शुक्रवार, पुणें २.

★

: मुद्रक :
मा. र. कारले,
जनसेवा मुद्रणालय,
१९२ शुक्रवार पुणें २.

# देशोदेशीचे लोक-शिक्षण

( लोकशिक्षण मासिकावरून )

प्रथमावृत्ति १९५५

REFBK-0008530

जगताप-कारले प्रकाशन, पुणे २.

: प्रकाशक :
स. आ. जगताप
जगताप-कारले प्रकाशन
१९२ शुक्रवार, पुणें २.

★

: मुद्रक :
मा. र. कारले,
जनसेवा मुद्रणालय,
१९२ शुक्रवार पुणें २.

# देशोदेशीचे लोक-शिक्षण

( लोकशिक्षण मासिकावरून )

८५३०

प्रथमावृत्ति १९५५

REFBK-0008530

या

जगताप-कारले प्रकाशन, पुणे २.

# निवेदन

जगातील निरनिराळ्या देशामधील लोकशिक्षणाची आजतागायत माहिती पुरविणारे पुस्तक प्रसिद्ध करण्याचा आमचा फार दिवसांचा हेतु होता. तो हेतु, अल्पांशाने का होईना 'देशोदेशींचे लोकशिक्षण' या लहानशा पुस्तकाच्या प्रसिद्धीने सफल होत आहे, याचा आनंद वाटतो.

महाराष्ट्राचे लोकशिक्षण—अधिकारी श्री. व्ही. बी. कर्णिक यांची आस्ट्रेलिया, न्यूझिलंड, डेन्मार्कमधून आलेली पत्रे व लेख लोकशिक्षण मासिकातून वाचले. ते फार उपयुक्त वाटले व पुस्तक रूपाने प्रसिद्ध करण्याची कल्पना आली. आमच्याप्रमाणेच लोकशिक्षणाविषयी आस्था बाळगणाऱ्या अनेक लोकानाही अशा पुस्तकाची गरज वाटत होती ती भागविण्याची संधि लाभत आहे.

लोकशिक्षण मासिकात देशोदेशीच्या लोकशिक्षणावर प्रसिद्ध झालेले सर्व लेख लोकशिक्षणाच्या आजतागायतच्या प्रयत्नांची चांगली कल्पना देणारे आहेत. त्यामुळे ते लेख पुस्तक रूपाने प्रसिद्ध करण्याची परवानगी, महाराष्ट्र लोकशिक्षण समितीचे चेअरमन माननीय बाबूरावजी जगताप यांच्याकडे आम्ही मागितली. त्यानी ती परवानगी दिल्यामुळेच 'देशोदेशींचे लोकशिक्षण' प्रसिद्ध होत आहे. त्यानी दिलेल्या परवानगीबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहोत. या पुस्तकातील बहुतेक लेख श्री. व्ही. बी. कर्णिक यांचेच आहेत. त्यानी ते छापण्यास अनुमति दिली म्हणून त्यांचेही आम्ही आभार मानतो.

लोकशिक्षण प्रसारासाठी या पुस्तकाचा उपयोग होईल असा भरवंसा धरून हे निवेदन संपवितो.

जगताप—कारले प्रकाशन
१९२ शुक्रवार,
पुणें २

**स. आ. जगताप**
प्रकाशक

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे स्थापना
अनुक्रम १८८८५ वि. मिवंद्
क्रमांक १०२८ नों: दि: २८।३।५५

# ‘ प्रारंभीचे दोन शब्द ’

वेगवेगळ्या देशामध्ये कोणत्या प्रकारचे ‘ लोकशिक्षण ’ दिले जाते, हे जनतेला समजावे, यासाठी ‘ लोकशिक्षण ’ मासिकात वेळोवेळी प्रसिद्ध झालेले लेख एकत्र करून ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्यात येत आहेत, ही समाधानाची गोष्ट होय. भारतासारख्या मागासलेल्या देशामध्येच केवळ हे शिक्षण दिले जात नसून, पुढारलेल्या देशामध्येही त्याला प्रमुख स्थान आहे, यावरून या शिक्षणाचे महत्त्व कोणासही पटण्यासारखे आहे. भारतामध्ये साक्षरता कमी आहे, म्हणून लोकशिक्षणामध्ये साक्षरतेवर जास्त भर दिला जातो, परंतु साक्षरता म्हणजे लोकशिक्षण नव्हे. लोकशिक्षण प्रत्येक माणसाला स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न करते. मनुष्य निरक्षर असला म्हणजे तो परावलंबी बनतो, यासाठी त्याला प्रथम साक्षर बनविणे अगत्याचे होते.

सर्व देशामध्ये आज लोकशाही नांदत आहे. लोकशाहीचे प्रकार वेगळे असतील, परंतु ‘ सर्वांचे हित ’ हेच ध्येय प्रत्येक सरकारने आपल्यापुढे ठेविलेले आहे. जगात ‘ तुझे व माझे ’ असे कांही नाही; आहे ते सर्व ‘ आपले ’ आहे, हीच भावना वाढीस लावण्याचा प्रयत्न आज होत आहे. एकमेकांच्या देशाला भेटी द्याव्यात, त्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम पाहावेत, चांगल्याचे कौतुक करावे व ते शिकावे, एकमेकांचा परिचय करून घ्यावा, भीतीचे वातावरण नाहीसे करून विश्वासाचे वातावरण उत्पन्न करावे, यासाठी लहान मोठ्या राष्ट्रांचे चाललेले प्रयत्न पाहिले, म्हणजे जगाचे एक कुटुंब कसे घडविले जात आहे, हे दिसून येते. याच ध्येयासाठी शिक्षण, सहकारी चळवळी, खेळ, कला, प्रदर्शने आणि परिषदा.

' लोक-शिक्षण ' हा शिक्षणाचा नवा प्रकार नसून एक महत्त्वाचा भाग आहे. बुद्धीने ग्राह्य केले जाते तेवढेच शिक्षण, अशी शिक्षणाची आकुंचित व्याख्या आता राहिलेली नाही. आपण सर्व संबंधित आहोत, एकमेकांच्या बऱ्या वाईट गोष्टींचा परिणाम आपणावर होत असतो, यासाठी आपण सर्वांनी सुधारल्याशिवाय कोणत्याही देशाला सुख लाभणार नाही. केवळ मी सुधारून भागणार नाही, तर माझा शेजारीही सुधारला पाहिजे, हे ज्या शिक्षणाने आपण ओळखू शकतो, तेच खरे शिक्षण होय. शिक्षणाचा संबंध डोक्याशी आणि हाताशी आहे, तसाच अंतःकरणाशीही आहे. शिक्षणाने अंतःकरण तयार होत नसेल; प्रेम, सहानुभूति निर्माण होत नसेल तर त्या शिक्षणाला कांहीच किंमत राहणार नाही. इतकेच नव्हे, तर त्याने दोषही निर्माण होतील. प्रौढाना शिक्षण देण्याकरिता एक स्वतंत्र कमिटी निर्माण केली असली तरी हे ' तात्पुरते खाते ' नाही. जोपर्यंत समाज आहे, तोपर्यंत समाजशिक्षण आहे. स्वावलंबन व सहकार ही या शिक्षणाची दोन प्रमुख साधने आहेत. डेन्मार्क सारखा देश या साधन-संपत्तीमुळेच आज सुखी झाला आहे. इतर देशातील लोक आपल्यापेक्षा सुखी कां हे त्या देशात दिल्या जाणाऱ्या लोक-शिक्षणावरून आपणास समजणार आहे. या थोर हेतूनेच हे पुस्तक प्रकाशित होत आहे. याने लोकशिक्षणाचे कार्य सुकर होईल असा विश्वास वाटतो.


ता. १७।११।५५

**बा. ग. जगताप**
अध्यक्ष, महाराष्ट्र लोकशिक्षण समिति,
पुणे.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | इंग्लंडमधील लोकशिक्षण | ९ |
| २. | सोव्हिएट रशियातील साक्षरतेची मोहीम | १२ |
| ३. | आस्ट्रेलियाचे पत्र–१ | २० |
| ४. | आस्ट्रेलियाचे पत्र–२ | २३ |
| ५. | आस्ट्रेलियाचे पत्र–३ | २६ |
| ६. | निरक्षरतेच्या समूळ उच्चाटनासाठी अमेरिकेत मोहीम | ३० |
| ७. | कोलंबियातील लोकशिक्षण | ३३ |
| ८. | अमेरिकेतील एक प्रयोग | ३७ |
| ९. | डेन्मार्क देश | ३९ |
| १०. | डेन्मार्कचे पत्र–१ ले | ४१ |
| ११. | डेन्मार्कचे पत्र–२ रे | ४६ |
| १२. | डेन्मार्कचे पत्र–३ रे | ५१ |
| १३. | डेन्मार्कमधील प्रौढशिक्षण | ५८ |
| १४. | स्वीडनमधील लोकशिक्षण | ६४ |
| १५. | युगोस्लाव्हिया | ६९ |
| १६. | चीन देशातील समाजशिक्षण | ७२ |
| १७. | चिनी प्रोफेसर शु-शी-लिंग | ७८ |
| १८. | नवचीन देशातील लोकशिक्षण | ८१ |
| १९. | फिलिपिन्समधील प्रौढशिक्षण | ८७ |
| २०. | थायलंडमधील लोकशिक्षण | ९१ |
| २१. | इजिप्तमधील लोकशिक्षण | ९५ |
| २२. | पाणथळीच्या जागेत भातशेती– आफ्रिकेतील लोकशिक्षण | ९९ |
| २३. | ब्रिटिश टोगोलँड येथील प्रौढशिक्षण | १०२ |

# देशोदेशींची साक्षरता




कांही देशातील साक्षर लोकांचे आकडे वर दिले आहेत. भारताला अद्याप किती पुढे जायचे आहे त्याची कल्पना त्यावरून सहज येईल.

# डॉ. राधाकृष्णन् व साक्षरता प्रसार

भारताचे उपराष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन् यानी मे महिन्यात म्हैसूर येथील प्रौढ शिक्षण परिषदेचे उद्‌घाटन केले. त्यावेळी भाषण करताना ते म्हणाले, " माणसाला साक्षर करणे जरूर आहे, पण लोकशिक्षण म्हणजे केवळ साक्षरता प्रसार नव्हे. लोकाना तुम्ही नुसतेच लिहिण्या-वाचण्यात तरबेज केले; पण त्याना तुम्ही ज्ञानाची गुरुकिल्ली दिली नाही तर त्या माणसांचा देशाला उपयोग होणार नाही. लोकाना तुम्ही केवळ अक्षरांचे ज्ञान दिले व त्यांची नैतिक पातळी वाढवि-ण्याचा प्रयत्न केला नाही तर साक्षर झालेले राक्षस आपण निर्माण करू. देशाला तो एक मोठा शाप दिल्यासारखे होईल. सबंध समाजाला ज्यावेळी शिक्षण द्यावयाचे असते. त्यावेळी त्याना केवळ बौद्धिक शिक्षण देऊन भागत नाही. "

डॉ. राधाकृष्णन् आपल्या भाषणात पुढे म्हणाले,"भारतातील सर्व-साधारण माणूस हा निरक्षर आहे, पण तो संपूर्ण अडाणी नाही. सर्व-साधारणपणे नैतिक गुणाबद्दल पण तो आदर बाळगतो. त्याचा व्याव-हारिक शहाणपणा गेल्या निवडणुकीच्या वेळी स्पष्टपणे दिसून आला."

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८५३०

[ १ ]

# इंग्लंडमधील लोक-शिक्षण

## श्री. खेरांचे पत्र

[ मुंबई प्रांताचे माजी पंतप्रधान मा. बाळासाहेब खेर यानी खालील पत्र महाराष्ट्र प्रादेशिक लोकशिक्षण समितीचे चेअरमन मा. बाबुरावजी जगताप याना पाठविले आहे. ९९ टक्के साक्षर असलेल्या इंग्लंडमध्ये समाज शिक्षणाचे प्रश्न कसे हाताळले जातात याची माहिती खालील पत्रावरून मिळेल. ]

भारत भुवन, लंडन, १९ मार्च १९५२

प्रिय श्री. जगताप,

कांही दिवसापूर्वी मी केंब्रिजशायरचे शिक्षणाधिकारी श्री. हेन्री मॉरिस याना भेटलो. त्यानी मला इंग्लंडमधील ग्रामीण जीवन सुधारण्याचे चालू असलेले प्रयत्न सांगितले. ते प्रयत्न श्री. मॉरिस यांच्या मार्गदर्शनाखाली चालू आहेत. त्यांच्या सांगण्यात असे आले कीं, हिंदुस्थान-

प्रमाणेच इंग्लंडमध्ये दिवसानुदिवस शहरांची बेसुमार वाढ होत आहे. शहरात उद्योगधंदे वाढीला लागले आहेत, त्यामुळें खेड्यातील नवजवान शहरी जीवनाकडे ओढले गेले आहेत. याचा परिणाम सहजच खेड्यावर होत आहे. खेडी ओस पडत चालली आहेत व शहरावर लोकसंख्येचा दाब अधिक वाढत चालला आहे. याला पायबंद घालण्यासाठी खेड्यामधून ग्रामीण विद्यापीठे काढणे जरूर आहे, असे त्यांचे म्हणणे पडले. या विद्यापीठांचा उपयोग दिवसा शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व्हावा व रात्री सर्वांसाठी ( Community Centre ) समुदाय केंद्र म्हणून व्हावा. त्यानी आपली योजना येथील अधिकाऱ्यापुढे मांडली व तिला संमति मिळाल्यानंतर या भागात कितीतरी ग्रामीण विद्यापीठे ( Village Colleges ) सुरू झाली आहेत व फारच चांगल्या प्रकारे चालली आहेत.

मी परवा एका ग्रामीण विद्यापीठाला भेट दिली. तेथील चालू असलेले काम पाहून मला अत्यंत समाधान वाटले. हे विद्यापीठ ७-३० ते ९-३० पर्यंत चालू असते. बरोबर ७-३० वाजता शेकडो शेतकरी व कामकरी, पुरुष व स्त्रिया या कॉलेजमध्ये येतात व गटागटाने शिक्षण घेतात. ते लोक सुतारकामाचे, लोहारकामाचे शिक्षण घेतात. स्त्रिया शिवणे, टिपणे, स्वयंपाक करणे व विणणे इत्यादि गोष्टी शिकतात. शिवाय फ्रेंच भाषा व इतर विषय शिकवतात ते निराळेच. या ठिकाणी शारीरिक शिक्षणाचे शिक्षणही चालू असते. येथे शिकत असलेल्या लोकानी आपणहून सांगितले कीं, आम्हाला हे कॉलेजमधील शिकणे फार फार आवडते. शिक्षणाचा लोकावर चांगला परिणाम होत आहे हे मला देखील पटले.

येथे लोकांच्या करमणुकीचीही सोय आहे. बैठे खेळ खेळण्यास भरपूर जागा आहे. बिलियर्ड, पिंगपांग किंवा बॅडमिन्टन खेळण्यास

प्रशस्त सोय आहे. सार्वजनिक हॉलमध्ये त्यांच्या वारंवार बैठकी भरतात. कॉलेजला जोडूनच स्वस्त दराचे हॉटेल आहे.

या विद्यापीठांचा नजरेत भरणारा भाग म्हणजे “ तरुण शेतकऱ्यांचा संघ ” होय. एका शेतकरी संघाच्या वार्षिक सभेस मी जातीने हजर होतो. त्या ठिकाणी गेल्या वर्षी केलेल्या कामाचा आढावा घेतला जात होता. शेतीविषयक प्रश्नावर बराचसा विचार विनिमय चालू होता. संघाच्या नेत्यानी मला हिंदुस्थान विषयीची माहिती सांगायला सांगितले. मी ती आनंदाने सांगितली. ती माहिती ऐकण्यासाठी उत्सुक झालेले चेहरे अद्याप मला डोळ्यासमोर दिसत आहेत. माझे असे ठाम मत झाले आहे कीं, हे संघ फारच उपयोगी आहेत व हिरिरीने काम करणारे आहेत.

मी येथील चार पांच कॉलेजाना भेटी दिल्या. सर्व ठिकाणी काम चांगले चालू आहे. नॉटिंगॅम येथे चालू असलेल्या कॉलेजला जोडून सुमारे पंचेचाळीस एकर जमीन आहे. त्या ठिकाणी शेतकरी शेतकी-शास्त्र व शेतीस उपयुक्त असे अनेक धंदे शिकतात.

मी स्वतः पत्रासोबत इंपिंग्टन कॉलेजच्या १९५२–५३ सालच्या हिवाळी अधिवेशनाचे माहिती पत्रक पाठविले आहे. तुम्ही ते पत्रक पुरे वाचावे व आपल्या राज्यात व देशात याच तऱ्हेच्या संस्था स्थापन करता येतील का याचा अवश्य विचार करावा.

आपला शुभेच्छु

**बा. गं. खेर**

[illegible] स्वाभत.
अनुक्रम ९८५५५ वि: [illegible]
क्रमांक १०२६ नों: दि: २८/३/५६

# [२]

# सोव्हिएट रशियातील साक्षरतेची मोहीम

भारतामध्ये आज निरक्षरतेचे प्रमाण फार मोठे आहे. रशिया हा देश एके काळी पुष्कळ बाबतीत भारतासारखाच होता. रशियातसुद्धा झारच्या अमदानीत निरक्षरतेचे प्रमाण फार मोठे होते. रशियामधील कांही भागातून साक्षरतेचे प्रमाण शेकडा ५ पेक्षा कमी होते. १९१७ साली रशियामध्ये क्रांति झाली. झारच्या हातून सत्ता लोकांच्या हाती गेली. त्यानंतर साक्षरताप्रसाराची मोहीम जनतेच्या सरकारने हाती घेतली.

१९३२ साली रशियातील कांही प्रांतामध्ये ५० वर्षे वयाच्या खालच्या लोकामध्ये एकही पुरुष किंवा स्त्री, निरक्षर नव्हती. १९४० साली सर्व देशात ५० वर्षाखाली एकही माणूस निरक्षर राहिला नाही. रशियाच्या उत्तरेकडील भागात त्याचप्रमाणे आशिया खंडात असणाऱ्या रशियन विभागात सुद्धा साक्षरतेचे प्रमाण शे. ९५ वर गेले. कझागिस्तान म्हणून रशियातील सर्वात मागासलेला जो भाग होता, त्या ठिकाणी

पण साक्षरतेचे प्रमाण खूपच वाढले. जे कांही निरक्षर होते ते ५० पेक्षा जास्त वयाचे होते व त्यांच्यामध्ये सुद्धा साक्षरतेचे प्रमाण शे. ७० वर गेले.

रशियाने साक्षरताप्रसाराचे काम इतक्या थोड्या वेळात, इतक्या चांगल्या रीतीने केले कसे? रशियाने केलेला प्रयोग आपण समजून घेतला पाहिजे. हा प्रयोग रशियाने पुढारलेल्या भागात कसा केला व मागासलेल्या भागामध्ये कसा केला हे आपण पाहिले पाहिजे.

रशियामध्ये १९१७ सालच्या नोव्हेंबर महिन्यात क्रांति झाली. १९२० साली रशियाने साक्षरताप्रसाराची पहिली मोहीम सुरू केली. त्यावेळी गिरण्या-कारखान्यातून साक्षरतेचे वर्ग सुरू झाले. त्याना लाल कोपरे ( Red Corners ) म्हणत. ज्याप्रमाणे गिरण्यामधून काम सुरू झाले त्याचप्रमाणे शेतकऱ्यासाठी पण वर्ग काढण्यात आले. कामगार व शेतकरी ह्यांचेच भाईबंद लष्करात व तुरुंगात असतात; म्हणून ह्या दोन्ही ठिकाणी पण साक्षरतेची केंद्रे सुरू करण्यात आली. ह्या मोहिमेत प्रथम जर कोणी खूप मदत केली असेल तर ती रशियातील तरुण मुलामुलीनी केली. प्रारंभीच्या ह्या काळात ' निरक्षरतेला मूठमाती द्या ' ह्या नावाची एक संस्था काढण्यात आली. ह्या संस्थेने साक्षरताप्रसाराच्या कार्याची योजना आखली. ती योजना अमलात आणण्याची जबाबदारी पण पत्करली. रशियातील जनतेचा प्यारा पुढारी कॉ. लेनिन ह्यांची पत्नी क्रूपस्काया हिने आपले उरलेले सर्व आयुष्य ह्या कार्याला देण्याचे ठरविले. त्याप्रमाणे ह्या कामाची बरीचशी जबाबदारी तिने उचलली. ह्या मोहिमेला लढाईचे स्वरूप देण्यात आले. मुलांच्या पलटणी तयार करण्यात आल्या. ज्या शिस्तीने व दृढनिश्चयाने सैनिक आपली लढाई जिंकतात, तीच शिस्त व तोच दृढनिश्चय ह्या छोट्या शिपायामध्ये दिसून येत होता.

ही मोहीम ज्या वेळी सुरू झाली, त्या वेळी प्रौढाना शिकायला बसण्यासाठी सोयीच्या जागा नव्हत्या. त्यांच्या हातात देता येतील अशी क्रमिक पुस्तके नव्हती. त्यावेळी रशियाची आर्थिक परिस्थिति फारच गंभीर होती. म्हणून साक्षरता प्रसाराच्या कामासाठी खर्चायला त्यांच्याजवळ पैसा नव्हता. विन पैशाने त्याना हे काम करावयाचे होते. भारतामध्ये ह्या कामासाठी पुढील दोन तीन वर्षांत दरसाल तीन कोटि रुपये खर्चले जाणार आहेत. रशियाजवळ ह्या वेळी ह्या कामासाठी कोणताही खर्च करायला पैसा नव्हता. ह्या सर्व संकटाशी सामना देऊन आपली मोहीम पुढे रेटण्याचा मुलानी निश्चय केला होता. साक्षरतेचे वर्ग शाळामधून अथवा ग्रामपंचायतीच्या कचेऱ्यामधून चालवून जागेची अडचण दूर करण्यात आली. मुलानी स्वतः मूळाक्षरे कागदावर कापून तयार केली. त्यानी स्वतःची क्रमिक पुस्तके बनविली. पुस्तकासाठी व पाट्या-पेन्सिलीसाठी लागणारा पैसा, मुलानी आपले मनोरंजनाचे कार्यक्रम बसवून मिळविला. सुरुवातीला ह्या प्रौढांच्या वर्गात बायकाच खूप आल्या. ह्या बायकांचे वर्ग शाळामध्ये सुरू करण्यात आले. ह्याच शाळेत त्यांची मुलेही शिकत होती. ह्या मुलानी शाळेमध्ये वर्गनायक निवडलेले असत. हेच वर्गनायक, ह्या प्रौढ वर्गातील बायाना शिकवीत होते.

ह्या सर्व कामाची आखणी फारच शास्त्रशुद्ध होती. ज्या विभागात हे वर्ग सुरू व्हायचे असतील त्या विभागाची मुले आधी खानेसुमारी करीत. तेथील निरक्षरांचा नक्की आकडा शोधून काढल्यावर काम सुरू होई. निरक्षर प्रौढांची यादी तयार झाली कीं प्रौढांचा वर्ग निघे. प्रारंभी प्रौढ वर्गात नियमितपणे हजर राहत नसत. ही हजेरी टिकविण्यासाठी मुले नाना प्रकारच्या युक्त्या योजीत. कधी कधी तर मुलाना प्रौढांच्या घरी जाऊन शिकवावे लागे. रशियामध्ये लक्षावधि लोकाना लिहायला

वाचायला शिकविण्याचे काम शाळा-कॉलेजातील मुलामुलीनी केले. शेतकऱ्यांच्या व कामगारांच्या वर्गातून मुले रोजच्या बातम्या प्रौढाना मोठ्याने वाचून दाखवीत. त्याना सोपी सोपी पुस्तके पण वाचून दाखवीत. ह्या काळामध्ये शिकणाऱ्या प्रौढामध्ये, शिकविणाऱ्या मुलामध्ये व गिरण्या–कारखान्यामध्ये साक्षरतेच्या कामाबाबत चढाओढी लागत.

साक्षरतेच्या मोहिमेतील आघाडीवरील फौज मुलांची होती. हळूहळू ह्या मोहिमेत स्थानिक शिक्षणाधिकारी भाग घेऊ लागले. 'निरक्षरतेला मूठमाती द्या;' ह्या संस्थेने निरक्षर व अर्धसाक्षर लोकांच्या याद्या तयार केल्या. ह्या संस्थेने प्रौढांच्या वर्गासाठी जागा, साहित्य, पैसा व विनावेतन काम करणारे शिक्षक मिळविले. ह्या लोकानी साक्षरतेसाठीं जोराने प्रचार चालविला. तसेच शिकविणारे शिक्षक व शिकणारे प्रौढ ह्यानी नियमितपणे वर्गात हजर राहावे म्हणून जरूर ते प्रयत्न केले. थोडक्यात सांगायचे म्हणजे ह्या साक्षरताप्रसाराच्या मोहिमेसाठी योग्य असे वातावरण तयार करण्याचे काम ह्या संस्थेने केले. स्थानिक शिक्षणाधिकाऱ्यानी, शिक्षकाना ट्रेनिंग देण्याचे, पाठ्यपुस्तके पुरविण्याचे, अभ्यासक्रम तयार करण्याचे व प्रौढाना शिकविण्यासाठी पाठ तयार करण्याचे काम केले. त्यानी शिक्षकाना ह्या विषयीचा अभ्यास करण्यासाठी अभ्यासिका तयार केल्या व आदर्श असे प्रौढवर्ग चालविले. गिरण्या, कारखाने, ग्रामपंचायती ह्यांच्या चालकाना भेटून, निरक्षराना साक्षर करण्यासाठी व अर्धसाक्षराना सुशिक्षित करण्यासाठी त्यांची मदत मिळविली.

ही झाली सर्वसाधारण योजना; परंतु ही योजना आखली गेली तरी खेड्यातून काम करायला स्वयंसेवक मिळेनात. जेथे स्वयंसेवक मिळाले नाहीत, तेथे पगारी नोकर नेमण्यात आले. 'निरक्षरतेला मूठमाती द्या;'

ह्या संस्थेने शिक्षणखात्याच्या व स्थानिक शिक्षणाधिकाऱ्यांच्या मदतीने ट्रेनिंगचे वर्ग चालविले. ह्या वर्गामध्ये ७ वी पर्यंत शिकलेले लोक घेण्यात आले. ह्या होतकरू शिक्षकासाठी सेमिनार भरविण्यात आल्या. जे लोक ट्रेंड होते त्यानी ह्या शिकाऊ शिक्षकाना ह्या सेमिनार मधून मार्गदर्शन केले. असे इतराना मार्गदर्शन करणे हे आपले एक सामाजिक कर्तव्य आहे, असे हे ट्रेंड शिक्षक मानीत असत. ह्या सेमिनार मधून प्रौढाना शिकविण्याच्या पद्धति, त्यांच्यासाठी पाठ तयार करणे, शिकविण्याचे साहित्य निर्माण करणे, इत्यादि बाबत नव्या शिक्षकाना भरपूर माहिती दिली जाई. ह्या सेमिनारमधून शिकविण्याचे काम करणाऱ्या शिक्षकाना पण प्रौढ शिक्षणाबाबत खास ट्रेनिंग दिले जाई. इतकेच नव्हे तर प्रौढ शिक्षणाबाबतचे सर्व शिक्षण विषयक साहित्य त्याना उपलब्ध करून दिले जाई. वर सांगितलेल्या संस्थेमार्फत वरचेवर प्रौढ-शिक्षण-क्षेत्रात कार्य करणाऱ्या सर्व लोकाना एकत्र येऊन विचारविनिमय करता यावा, म्हणून प्रौढशिक्षणाबाबत परिषदा भरविल्या जात.

निरक्षरतेविरुद्ध मोहीम ही सर्वत्र राष्ट्रीय चळवळ मानण्यात आली. साक्षरतेच्या वर्गात हजर न राहणे प्रौढाना जवळ जवळ अशक्य वाटू लागले. ज्यानी साक्षरतेच्या वर्गात विशेष प्रगति दाखविली त्याना बक्षिसे देण्यात आली, ज्यानी ह्या वर्गाकडे दुर्लक्ष केले अथवा वर्गाबाबत बेफिकीरी दाखविली त्याना शिक्षा करण्यात आल्या. गिरण्या कारखान्यातून साक्षरता समित्या स्थापण्यात आल्या. जे कामगार वर्गात हजर राहत नसत, त्यांच्यासाठीं कारखान्यात एक फळा ठेविला जाई. त्या फळ्यावर, 'ह्याने आपल्या तोंडाला काळोखी फासली;' असे लिहिलेले असे. जे लोक प्रौढांच्या वर्गात हजर राहत नसत, त्यांची नावे ह्या फळ्यावर लिहिली जात. जे लोक नियमितपणे वर्गात हजर राहत; त्यांची नावे वर्तमान पत्रातून, इतर पत्रकामधून छापली जात, अथवा ती ठिकठिकाणी

फळ्यावर लिहिली जात. ह्या बाबतीत विशेष कष्ट घेणाऱ्याना सिनेमाची नाटकाची व इतर करमणुकीच्या कार्यक्रमाची तिकिटे मोफत दिली जात.

ह्या सर्व प्रयत्नाचे फळ रशियाला १९३२ पर्यंत मिळाले. या वर्षी रशियातील निरक्षरता जवळ जवळ संपूर्णपणे नाहीशी झाली. यानंतर रशियातील प्रौढ शिक्षण चळवळीने आपला पवित्रा बदलला. आता सर्व लोक साक्षर झाल्यामुळें त्यांची साक्षरता टिकविण्यासाठी त्याना अधिक शिक्षण देण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. प्राथमिक शाळेतील दुसऱ्या ते चौथ्या इयत्तेपर्यंत जेवढे शिक्षण मुलाना मिळे, तेवढे शिक्षण प्रौढाना देण्यास सुरुवात झाली. या शिवाय प्रौढाना तांत्रिक शिक्षण देण्याची पण तरतूद करण्यात आली. या मोहिमेत पुढील संस्थांचा उपयोग करून घेण्यात आला : तुरुंग, लष्कर, विश्वविद्यालये, सर्व क्लब, शेतकऱ्यांच्या संस्था, म्युझियम वगैरे. त्याचप्रमाणे कामगारांच्या संस्था व संघटना, माध्यमिक शाळा ह्यांचा पण उपयोग करून घेण्यात आला. ह्या संस्थामार्फत कांहीं शिबिरे भरविण्यात आली. ह्या शिबिरामधून, प्रौढाना, शैक्षणिक व शास्त्रीय माहिती देण्यात आली. तसेच त्यांच्यासाठीं नाटके, गाणी इत्यादि सांस्कृतिक कार्यक्रम करण्यात आले.

निरक्षरता व अज्ञान ह्या विरुद्ध, मागासलेल्या विभागातून रशियाने जी मोहीम चालविली ती तर विशेष प्रशंसनीय होती. या मागासलेल्या लोकांच्या समजुती व कम्युनिस्टांचे तत्त्वज्ञान यामध्ये प्रचंड विरोध होता; परंतु त्यांचे जे सांस्कृतिक वैशिष्ट्य होते त्याला राज्यकर्त्यांनी धक्का लावला नाही. त्यांची भाषा व त्यांच्या चालीरूढी सांभाळण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याना शिक्षणहि त्यांच्या प्रादेशिक भाषेतून देण्यात आले.

ह्या संस्थेने शिक्षणखात्याच्या व स्थानिक शिक्षणाधिकाऱ्यांच्या मदतीने ट्रेनिंगचे वर्ग चालविले. ह्या वर्गामध्ये ७ वी पर्यंत शिकलेले लोक घेण्यात आले. ह्या होतकरू शिक्षकासाठी सेमिनार भरविण्यात आल्या. जे लोक ट्रेंड होते त्यानी ह्या शिकाऊ शिक्षकाना ह्या सेमिनार मधून मार्गदर्शन केले. असे इतराना मार्गदर्शन करणे हे आपले एक सामाजिक कर्तव्य आहे, असे हे ट्रेंड शिक्षक मानीत असत. ह्या सेमिनार मधून प्रौढाना शिकविण्याच्या पद्धति, त्यांच्यासाठी पाठ तयार करणे, शिकविण्याचे साहित्य निर्माण करणे, इत्यादि बाबत नव्या शिक्षकाना भरपूर माहिती दिली जाई. ह्या सेमिनारमधून शिकविण्याचे काम करणाऱ्या शिक्षकाना पण प्रौढ शिक्षणाबाबत खास ट्रेनिंग दिले जाई. इतकेच नव्हे तर प्रौढ शिक्षणाबाबतचे सर्व शिक्षण विषयक साहित्य त्याना उपलब्ध करून दिले जाई. वर सांगितलेल्या संस्थेमार्फत वरचेवर प्रौढ–शिक्षण–क्षेत्रात कार्य करणाऱ्या सर्व लोकाना एकत्र येऊन विचारविनिमय करता यावा, म्हणून प्रौढशिक्षणाबाबत परिषदा भरविल्या जात.

निरक्षरतेविरुद्ध मोहीम ही सर्वत्र राष्ट्रीय चळवळ मानण्यात आली. साक्षरतेच्या वर्गात हजर न राहणे प्रौढाना जवळ जवळ अशक्य वाटू लागले. ज्यानी साक्षरतेच्या वर्गात विशेष प्रगति दाखविली त्याना बक्षिसे देण्यात आली, ज्यानी ह्या वर्गाकडे दुर्लक्ष केले अथवा वर्गाबाबत बेफिकीरी दाखविली त्याना शिक्षा करण्यात आल्या. गिरण्या कारखान्यातून साक्षरता समित्या स्थापण्यात आल्या. जे कामगार वर्गात हजर राहत नसत, त्यांच्यासाठीं कारखान्यात एक फळा ठेविला जाई. त्या फळ्यावर, ' ह्याने आपल्या तोंडाला काळोखी फासली; ' असे लिहिलेले असे. जे लोक प्रौढांच्या वर्गात हजर राहत नसत, त्यांची नावे ह्या फळ्यावर लिहिली जात. जे लोक नियमितपणे वर्गात हजर राहत; त्यांची नावे वर्तमान पत्रातून, इतर पत्रकामधून छापली जात, अथवा ती ठिकठिकाणी

फळ्यावर लिहिली जात. ह्या बाबतीत विशेष कष्ट घेणाऱ्याना सिनेमाची नाटकाची व इतर करमणुकीच्या कार्यक्रमाची तिकिटे मोफत दिली जात.

ह्या सर्व प्रयत्नाचे फळ रशियाला १९३२ पर्यंत मिळाले. या वर्षी रशियातील निरक्षरता जवळ जवळ संपूर्णपणे नाहीशी झाली. यानंतर रशियातील प्रौढ शिक्षण चळवळीने आपला पवित्रा बदलला. आता सर्व लोक साक्षर झाल्यामुळें त्यांची साक्षरता टिकविण्यासाठी त्याना अधिक शिक्षण देण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. प्राथमिक शाळेतील दुसऱ्या ते चौथ्या इयत्तेपर्यंत जेवढे शिक्षण मुलाना मिळे, तेवढे शिक्षण प्रौढाना देण्यास सुरुवात झाली. या शिवाय प्रौढाना तांत्रिक शिक्षण देण्याची पण तरतूद करण्यात आली. या मोहिमेत पुढील संस्थांचा उपयोग करून घेण्यात आला : तुरुंग, लष्कर, विश्वविद्यालये, सर्व क्लब, शेतकऱ्यांच्या संस्था, म्युझियम वगैरे. त्याचप्रमाणे कामगारांच्या संस्था व संघटना, माध्यमिक शाळा ह्यांचा पण उपयोग करून घेण्यात आला. ह्या संस्थामार्फत कांहीं शिबिरे भरविण्यात आली. ह्या शिबिरामधून, प्रौढाना, शैक्षणिक व शास्त्रीय माहिती देण्यात आली. तसेच त्यांच्या-साठीं नाटके, गाणी इत्यादि सांस्कृतिक कार्यक्रम करण्यात आले.

निरक्षरता व अज्ञान ह्या विरुद्ध, मागासलेल्या विभागातून रशियाने जी मोहीम चालविली ती तर विशेष प्रशंसनीय होती. या मागासलेल्या लोकांच्या समजुती व कम्युनिस्टांचे तत्त्वज्ञान यामध्ये प्रचंड विरोध होता; परंतु त्यांचे जे सांस्कृतिक वैशिष्ट्य होते त्याला राज्यकर्त्यांनी धक्का लावला नाही. त्यांची भाषा व त्यांच्या चालीरूढी सांभाळण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याना शिक्षणहि त्यांच्या प्रादेशिक भाषेतून देण्यात आले.

ह्या मागासलेल्या विभागात धर्मगुरूंचे व मुल्लांचे प्रस्थ मोठे होते. ह्या लोकांचा, लोकाना शिक्षण देण्याला विरोध होता. येथे कामाला जी सुरुवात झाली ती अगदीं गरीब लोकापासून. ह्या लोकावर धर्मगुरूंची पकड कमी होती. ह्या लोकाना साक्षर करून, ग्रामपंचायती स्थापन करायला लावण्यात आल्या. जनतेची आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठी सहकारी संस्था व सामुदायिक शेतीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. या प्रकारे शिक्षण व लोकांची आर्थिक सुधारणा याची सांगड घालण्यात आली होती. शिक्षणामुळे आपली आर्थिक परिस्थिति सुधारेल या जाणीवेमुळे लोक शिकायला येऊ लागले.

बायकामध्ये काम करणे महाकठीण होते. सर्व साधारपणे स्त्रिया फारच मागासलेल्या होत्या. समाजात त्याना मानाचे स्थान पण नव्हते. बायका पुरुषाना भिऊन राहत. रशियातील साक्षरतेच्या मोहिमेचे वैशिष्ट्य हे कीं, त्या मोहिमेमुळे स्त्रिया केवळ साक्षरच झाल्या नाहींत तर त्यांची भीतीपासून व भोळ्या समजुतींच्या वर्चस्वापासून कायमची मुक्तता झाली. या मागासलेल्या स्त्रियात लोकशिक्षणाच्या कामाला प्रारंभ केला तरी कसा ? अशा मागासलेल्या विभागातून जर तुम्हाला बायकाना शिकवायचे असेल तर त्याचे एकच प्रभावी तंत्र आहे. या बायकांच्या मुलांच्या आजाराबद्दल व त्यांच्या प्रकृतीबद्दल तुम्ही बोलायला लागा. त्याबाबतींत त्याना थोडी मदत करा. बायका आल्याच तुमच्या ताब्यात. हेच तंत्र रशियाने स्वीकारले. चांगल्या शिकलेल्या रशियन बायानी ठिकठिकाणी आरोग्य केंद्रे काढली. त्यानाच जोडून साक्षरतेचे वर्ग सुरू केले. स्त्रियामध्ये साक्षरतेचे काम करणाऱ्या बायकाना ‘ लोकशिक्षण सैनिक ’ या नांवाने ओळखले जाई. या स्त्रियाना मागासलेल्या वर्गातून काम करताना खूप त्रास झाला. अशिक्षित बायकांच्या प्रतिगामी

नवऱ्यानी त्याना खूप छळले. कांहीं बायकांचे खून पडले, परंतु हा विरोध थोड्या वेळाने मंदावला व बायका साक्षरतेच्या वर्गात येऊन शिकू लागल्या.

१९४० साली, वीस वर्षांच्या वर सांगितलेल्या प्रयत्नामुळे रशियातील मागासलेल्या विभागातील साक्षरता शे. ९५ वर आली. या बायका नुसत्याच साक्षर होऊन थांबल्या नाहीत. त्यांचे शिक्षण पुढे वाढीला लागले. ज्या ठिकाणी पूर्वी शाळा नव्हत्या, त्या भागात तांत्रिक शिक्षण पण मिळण्याची सोय झाली. त्या ठिकाणी निरनिराळ्या शिक्षण संस्था जन्माला आल्या. या सर्व संस्थांचा उपयोग करून घेऊन रशियातील प्रौढ स्त्रीपुरुषानी आपला शैक्षणिक दर्जा आज खूपच वाढवला.

रशियातील हा प्रयोग भारतातील लोकशिक्षण कार्यकर्त्यानी समजून घेतला पाहिजे. जे इतर देशानी केले ते आपणाला करता येईल. या प्रश्नाला इतर देशानी जे महत्त्वाचे स्थान दिले ते आपण दिले आहे का?

[ ३ ]

# आस्ट्रेलियाचे पत्र-१

[ महाराष्ट्र प्रादेशिक लोकशिक्षण समितीचे सेक्रेटरी श्री. वा. ब. कार्णिक हे ऑस्ट्रेलियातील लोकशिक्षणाचा अभ्यास करण्यासाठी १९५२ साली ऑस्ट्रेलियास गेले होते. त्यांनी ऑस्ट्रेलियातून पाठविलेली तीन पत्रे त्या देशातील लोकशिक्षणाची कल्पना देतील. ]

ता. २६-१-१९५२.

आर्नाडस् गेस्ट हाऊस.
९९ पार्क स्ट्रीट.
साऊथ ईरा, मेलबोर्न, आस्ट्रेलिया.

सप्रेम नमस्कार वि. वि.—

ह्या ठिकाणी आपल्याप्रमाणे प्रौढ शिक्षणाचा प्रश्न नाही. कारण येथे साक्षरतेचे प्रमाण शे. ९८ आहे. जे दोन टक्के निरक्षर आहेत ते आदिवासी वगैरे आहेत. परंतु त्यांचा प्रश्न निराळ्या प्रकारे हाताळला जात आहे. येथे ५ ते १४ वयाच्या मुलाना सक्तीचे प्राथमिक शिक्षण

मिळते व प्रौढ शिक्षणाची जरुरी ह्या लोकांच्या करिता त्याना भासते. ज्याना आठच वर्षे शिक्षण मिळाले त्यांचे शिक्षण अपुरे झाले असे इकडे मानण्यात येते व त्याना त्यांचे ज्ञान वाढविण्यासाठीं सर्व प्रकारची साधने मिळवून देण्याची व्यवस्था केली जाते.

काल आम्ही एक स्टोअर्स पहायला गेलो. त्या ठिकाणी ७००० कामगार आहेत. ह्यापैकीं ज्यांचे शिक्षण अपुरे राहिले त्याना त्यांच्या मालकांच्या मार्फत शिक्षण देण्याची व्यवस्था केली आहे. दुकानात विक्री कशी करावी ? माल नीट कसा मांडावा ? गिऱ्हाइकाशी कसे वागावे इ० गोष्टी त्याना शिकविण्यात येतात. हे शिक्षण देण्यासाठी आठवड्यातून त्यांच्या कामाच्या तासापैकीं तीन तास त्याना मोकळे सोडण्यात येते. शिकविण्याची व्यवस्था त्यांच्या दुकानामार्फत केली जाते. ह्याखेरीज नागरिकशास्त्रावर, राजकारणावर, अर्थशास्त्रावर त्यांच्यासाठी व्याख्याने घडवून आणली जातात. त्यासाठी विश्वविद्यालयातील लोकांची पण मदत घेतली जाते. कामगारांची इच्छा असली तर आपल्या फुरसतीच्या वेळापैकीं आठवड्यातून दोन तास त्यानी ह्या कामासाठी द्यायचे असतात. ज्यांचे शालेय शिक्षण अपुरे असते त्याना येथे ते पण देण्याची व्यवस्था केली जाते. ह्याला येथे प्रौढ शिक्षण म्हणतात.

मेलबोर्न, व्हिक्टोरिया प्रांतात येते. येथील सरकारने १९४६ साली प्रौढ शिक्षणाचा कायदा पसार केला व त्या कायद्याने येथे एक प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम आखला. ह्या कायद्याप्रमाणे व्हिक्टोरिया प्रांतातील प्रौढ शिक्षणाचे काम पहाण्याकरिता एक २० लोकांची समिति नेमली व त्या समितीच्या मार्गदर्शनाखाली येथील प्रौढ शिक्षणाचे काम चालते. ह्या समितीने जो प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम आखला आहे तो मी खाली देत आहे. त्यावरून येथील प्रौढ शिक्षणाबाबतच्या कल्पना व आमच्या प्रौढ शिक्षणाविषयीच्या कल्पना ह्यांच्यामध्ये केवढे अंतर आहे

ते दिसेल. आपल्या देशातील ८९ टक्के लोक निरक्षर असल्यामुळें आपल्याकडे प्रौढ शिक्षणाला साहजिकपणेच फार संकुचित अर्थ आला आहे. ह्या कौन्सिलची अशी अपेक्षा आहे की, जास्तीत जास्त लोकानी ह्या योजनेचा फायदा घ्यावा व म्हणून व्याख्यानावर व वादविवाद मंडळावर ह्यानी फारसा भर दिलेला नाही; कारण लोकाना व्याख्यानाला येणे फारसे आवडत नाही. ह्यांचा भर संगीत, नृत्य, कलापथकांचे कार्यक्रम यांच्यावर आहे. लोकाना जे सांगावयाचे किंवा द्यायचे ते त्याना आवडेल अशा रीतीने दिले तर ते अधिक परिणामी होते असा यांचा अनुभव आहे. जनतेच्या अभिरुचीला योग्य वळण लावणे, त्यांची ज्ञानाची पातळी वाढविणे व त्यांच्या जीवनाला चांगले वळण ते स्वतः लावू शकतील अशा प्रकारचे विचार त्यांच्यामध्ये फैलावणे हा प्रौढ शिक्षणाचा हेतु आहे. ह्या कौन्सिलमार्फत निरनिराळ्या ठिकाणी नाटक-मंडळे स्थापण्याला उत्तेजन देण्यात येते या नाटकाचे कार्यक्रम घडवून आणण्यास मदत करण्यात येते. शेक्सपीअरचे नाटक वाचणे व त्याचा अभ्यास करणे प्रौढशिक्षणात येते. तर मग नाटकाचे प्रयोग करणे व पहाणे हा प्रौढ शिक्षणाचा एक भाग का होणार नाही असे ते विचारतात. प्रौढ शिक्षणाच्या कार्यक्रमाचा भाग म्हणून पुढील गोष्टी करण्यात येतातः—

१. नाटके बसविणे व नाटकांचे कार्यक्रम करणे, २. संगीताचे कार्यक्रम घडवून आणणे, ३. नृत्याचे व कलापथकांचे कार्यक्रम करणे, ४. ठिकठिकाणी ग्रामोफोनचे रेकॉर्ड पुरविणे व रेकॉर्ड ऐकण्याचे कार्यक्रम आखणे, ५. प्रदर्शने भरविणे, ६. फिल्म दाखविणे, ७. निर-निराळ्या विषयावर व्याख्याने घडवून आणणे. ८. लोकाना उपयुक्त असे विषय शिकविण्याकरिता कांही वर्गाची योजना करणे इत्यादि. मला वाटते, त्यावरून त्यांच्या प्रौढ शिक्षणाची कल्पना येईल. अजून येथे पुष्कळ पाहावयाचे आहे. तेव्हा पुढील पत्रात कांही अधिक लिहीन.

आपला

**वा. ब. कर्णिक**

# [४]

## आस्ट्रेलियाचे पत्र--२

ता. १५-२-५२

आर्नाडस् गेस्ट हाऊस,
९९ पार्क स्ट्रीट,
साऊथईरा, मेलबोर्न, आस्ट्रेलिया.

सप्रेम नमस्कार वि. वि.—

येथील प्रौढशिक्षणाच्या प्रांतिक कचेरीला भेट दिली. सकाळी ९ वाजल्यापासून १२ वाजेपर्यंत त्यांचे कार्यक्रम पाहिले व जरूर ती सर्व माहिती गोळा केली. आपण ज्याप्रमाणे प्रौढ येत नाहीत अशी तक्रार करतो त्याप्रमाणे हे लोक पण तक्रार करतात. ज्याना खरोखर प्रौढ शिक्षणाची गरज आहे ते कामगार व तशा दर्जाचे लोक वर्गांना यायला फार नाखूष असतात. ते विचारतात, शिकलो तर आम्हाला त्यापासून काय मिळणार ? संध्याकाळच्या वेळेला वर्गात येऊन बसण्यापेक्षा इतर गोष्टी करणे त्याना जास्त बरे वाटते. त्यामुळे ह्या लोकाना शिक्षण

देण्याचा सरकारने नवीनच मार्ग शोधून काढला आहे. लोकाना करमणूक हवी व म्हणून करमणुकीच्या मार्फत शिक्षण देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. याना निरनिराळे बोलपट दाखविण्यात येतात. त्याकरिता एक स्वतंत्र खातेच आहे. तेथे पण आम्ही एक दिवस घालविला. चांगल्या फिल्मस् लोक पाहतात. पण लोकाना फिल्मस्पेक्षा नाटके फार आवडतात. म्हणून येथील समिति चांगल्या चांगल्या नाटक कंपन्याशी करार करून त्यांचे खेळ ठिकठिकाणी करविते. ही नाटके कधी ऐतिहासिक, कधी सामाजिक असतात. अशी चांगल्या प्रकारची एक दोन नाटके लोकाना दाखवली म्हणजे त्या लोकाना त्यांचे स्वतःचे नाट्यमंडळ स्थापन करायला उत्तेजन देण्यात येते. आपल्या गावात नाटक करायचे आहे. ते आपणाला करायचे आहे असे लोकाना एकदा पटवून दिले कीं लोक नाटकाच्या पाठीमागे लागतात. एक नाट्यमंडळ ते स्थापन करतात. मग नाटक कोणते करायचे त्याचा ते विचार करू लागतात. मग समितीचा ते सल्ला घेतात. समिती-मार्फत त्याना कांही नाटकाची पुस्तके पाठविण्यात येतात व लोक ती पुस्तके वाचून काढतात. लोक मागतील तितक्या एका पुस्तकाच्या प्रती ३०-४० पर्यंत त्याना पाठविण्यात येतात. कोणाचे पत्र आले की त्याना सभासदत्वाचा एक फॉर्म पाठविला जातो व मग त्याना पुस्तकाची पेटी पाठविण्यात येते. स्थानिक कार्यकर्ता त्यांना या बाबत मार्गदर्शन करतो व मग सर्व मिळून एखादे नाटक करायचे ठरवितात व त्याच्या तालमी सुरू होतात व त्यामुळे गावात प्रौढ शिक्षणाचे कार्य होते. एकदा लोक जमले कीं, त्यापैकी नाटकात ज्याना काम नाही त्याना वाचायला इतर पुस्तके हवी असल्यास ती मागवून देण्यात येतात. लोकाना पुस्तके वाचाव-याची नसल्यास त्याना ग्रामोफोनवर गाणी ऐकविण्यात येतात. गाण्याच्या रेकॉर्ड पण समितीमार्फत पाठविण्यात येतात. लायब्ररी म्हणजे पुस्तके

डोळ्यासमोर येतात. पण, येथे फिल्म व रेकॉर्ड यांच्या पण लायब्रऱ्या आहेत. येथील लोकाना गाणी व नाटके फार आवडतात. त्यामुळे गाणे ऐकायला, गाणे शिकायला पुष्कळ लोक तयार असल्याने नाटकाना अधिक गर्दी असते. आम्ही या समितीने बसविलेल्या एका नाटकाला गेलो होतो. नाटक जरी प्रौढाकरिता होते तरी पुष्कळ चांगली चांगली माणसे नाटकाला आली होती. कारण नाटक फार चांगले बसविले होते व ते फार उत्कृष्ट वठले. ही जी नाटके केली जातात त्या नाटकात कांही विशेष प्रश्न हाताळला गेला पाहिजे अशी मुळीच अपेक्षा नसते. लोकांची करमणूक करणे व करमणुकीच्या निमित्ताने लोकाना एके ठिकाणी आणणे हा प्रधान हेतु असतो. आम्हाला असे सांगण्यात आले कीं, ज्या ठिकाणी नाटकांचे चांगले कार्यक्रम झाले, त्या ठिकाणी नाट्यमंडळ स्थापन होऊन स्थानिक लोक नाटके तर करू लागलेच; पण त्यापेक्षा त्या ठिकाणी नाटकाच्या पुस्तकांचे वाचन चांगल्या रीतीने सुरू झाले आहे. म्हणजे लोक जास्त प्रमाणात नाटकाची पुस्तके वाचू लागले आहेतच, पण त्याच्याही पुढे जाऊन नाटकाच्या पुस्तकावर चर्चा करू लागले आहेत. त्यामुळे त्या ठिकाणी चर्चामंडळे सुरू होऊ लागली आहेत. खेड्यामध्ये चर्चामंडळ स्थापन व्हायला अडचण पडते. त्याचप्रमाणे कामगार विभागात वगैरे लोक प्रारंभी यायला तयार होत नाहीत. पण वर सांगितल्याप्रमाणें नाटकाचा उपयोग चर्चामंडळ स्थापन करण्याला होऊ शकतो. शिकायला या म्हटले तर लोक येत नाहीत, पण लोकाना हवे ते जर आपण त्याना दिले तर लोक कसे खेचले जातात हे यावरून दिसून येईल. मला वाटते आपण ह्या नाटकाचा व नाट्यप्रवेशांचा कसा उपयोग करून घ्यायचा ते ठरवू या व एखाद्या गावी नमुन्यादाखल नाट्यमंडळ स्थापन करून पाहू या. प्रौढ शिक्षणाच्या येथील इतर कामाबद्दल पुढे लिहू.

आपला

वा. ब. कर्णिक

## [५]

# आस्ट्रेलियाचे पत्र ३

## न्यूझिलंडमधील लोकशिक्षण

तारीख २२।३।५२

वाल्डाफ हॉटेल, सीडनी,
आस्ट्रेलिया

सप्रेम नमस्कार वि. वि.—

मी १४ दिवस न्यूझिलंडमध्ये जाऊन आलो. न्यूझिलंड हा लहान देश आहे. पण तेथे अत्यंत सुबत्ता आहे. लोक खूपच सुखी आहेत. येथील जवळ जवळ १०० टक्के लोक साक्षर आहेत. पण त्याना जास्त चांगले नागरिक बनविण्यासाठी व त्यांची कर्तृत्वशक्ति व ज्ञान वाढविण्यासाठी प्रौढशिक्षणाचा फार चांगला कार्यक्रम आखलेला आहे. येथें मावरी नावाचे काळे लोक राहतात. गोऱ्या लोकापेक्षा ह्या लोकांच्या प्रौढशिक्षणाच्या प्रश्नांची जर चांगली माहिती मिळविली तर

आपणास अधिक उपयोगी पडेल, असे वाटल्यावरून, ह्या मावरी लोकांचा प्रौढशिक्षणाचा प्रश्न कसा हाताळला जातो ते समजून घेतले.

प्रौढशिक्षणाचा कार्यक्रम जर यशस्वी करायचा असेल तर प्रौढांचे शिक्षण हे प्रौढांच्या जीवनाशी निगडित झाले पाहिजे. जे शिक्षण प्रौढांच्या गरजा पुऱ्या पाडण्याच्या कामी मदतरूप होऊ शकत नाही; ते शिक्षण आकर्षक व टिकाऊ होणार नाही. सबब प्रौढांच्या शिक्षणाचा प्रश्न हाताळताना, प्रौढांच्या निकटच्या गरजा समजून घेऊन त्या गरजा पुऱ्या पाडण्यास ज्या ज्या गोष्टीची मदत होईल त्या त्या गोष्टींचा प्रौढ शिक्षणाच्या कार्यक्रमात समावेश झाला पाहिजे. जीवन व शिक्षण यांची फारकत झाली तर शिक्षणाचा कार्यक्रम यशस्वी होत नाही. सबब ज्या प्रौढाना शिक्षण द्यावयाचे आहे, त्यांचे जीवन समृद्ध होऊ शकेल असे शिक्षण त्याना दिले पाहिजे व त्या दृष्टीने त्या त्या प्रौढांच्या मूलभूत गरजा पुऱ्या पाडण्यास मदत होईल, असे प्रौढ शिक्षणाचे कार्यक्रम आखले पाहिजेत, असे येथे मानण्यात येते. ह्या दृष्टीने प्रौढशिक्षणाचा येथे चालू असलेला एक कार्यक्रम आम्ही पाहिला. त्याचे स्वरूप पुढील प्रमाणेः—

ह्या मंडळीना राहण्यास चांगली घरे नाहीत. येथे घरे लाकडाची बांधतात. पण लाकूड फार महाग आहे. तयार लाकूड विकत घेऊन घर बांधणे परवडत नाही. ह्यापैकी कांही लोकांच्या जमिनीवर मोठी झाडे आहेत. ह्या लोकांचा प्रौढ वर्ग सुरू झाला व त्यानी हा प्रश्न सोडवण्याचे ठरविले. एक लाकूड वेरण्याची ( कापण्याची ) गिरणी चालू करण्याचे ठरले. सर्वांनी थोडे भांडवल दिले. प्रत्येकाने शनिवारी काम करून गिरणी उभारण्याचे ठरविले. कांही इतर मदत मिळविली. दर शनिवारी, रविवारी हा प्रौढशिक्षणाचा वर्ग चालू लागला. ह्या वर्गातून पुढील गोष्टींची चर्चा होऊ लागली-( १ )गिरणीला लागणारे

भांडवल कसे गोळा करावे ? ( २ ) गिरणीला लागणारा लाकडाचा पुरवठा कसा करावा ? ( ३ ) ह्या गिरणीचा व आपल्या जमातीचा संबंध कोणता असावा ? ( ४ ) गिरणी उभी करताना कोणकोणत्या सरकारी खात्याची मदत लागेल व त्या त्या खात्याचे काम कोणते असते ? ( ५ ) कारखान्यात तयार झालेला माल आपल्या गरजेपेक्षां जास्त निघेल तर त्याची विक्री कशी करावी ? त्याची वाहतूक कशी करावी ? ( ६ ) गिरणी उभी झाल्यावर केवळ लाकूड कापण्याऐवजी त्यापासून दुसरे काय निर्माण करता येईल ? ( ७ ) ही गिरणी विजेने चालणार आहे, सबब दुसरे जोडधंदे येथे कोणते काढता येतील ?

दर शनिवारी–रविवारी निरनिराळ्या खात्यांचे माहितगार लोक येऊन गिरणी चांगली कशी चालवावी ते सांगत. वकील, सहकारी खात्याची मंडळी, जंगल खात्याची मंडळी, हिशेब कसे ठेवावे त्याची माहिती देणारे असे निरनिराळे लोक येऊन त्यांच्याशी बोलत व ही माणसे त्यांना शंका विचारून घेत. आपले लाकूड गिरणी चालविण्यास अपुरे पडेल तर इतर जंगलातून लाकूड घ्यावे लागेल; सबब लाकडाच्या निरनिराळ्या जाती कोणत्या ते समजून घेऊन, कारण पडले तर त्या प्रकारचे लाकूड स्वस्त भावात कोठे मिळेल ह्याची पहाणी करण्याच्या हेतूने ह्या वर्गाने जंगलाच्या कांही सफरी काढल्या. त्याचप्रमाणे युरोपियन लोक ह्या गिरण्या कशा रीतीने चालवितात ह्याची पाहणी करण्याच्या हेतूने निरनिराळ्या कारखान्याना त्यानी भेटी दिल्या. सर्व कार्यक्रम प्रौढ शिक्षण अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली चालला होता. ही गिरणी तयार झाली व आम्ही ती पहायला गेलो. तेंव्हां तेथील वर्गातील प्रौढाशी त्या गिरणी बाबत खूप बोललो. मोठ्या उत्साहाने आपल्या कामाची माहिती त्यानी दिली. गिरणीचा उद्‌घाटन समारंभ एका आठवड्याने होणार होता.

प्रौढ शिक्षणाचा प्रश्न हाताळताना हा एक अभिनव प्रकार मी पाहिला. आपल्या प्रौढ शिक्षणाच्या वर्गाला लोक जमत नाहीत अशी आपली तक्रार असते. आपले प्रौढ शिक्षण जर जनतेच्या जीवन विषयक प्रश्नांची पकड घेऊ शकले व जनतेच्या मूलभूत गरजा पुऱ्या करण्याच्या कामी मदतरूप होऊ शकेल तर मला वाटते, आपल्या वर्गाला लोकांची खूप गर्दी होईल. हे कसे करायचे तेच आपणास ठरवावे लागेल. प्रयत्न केला तर मार्ग सापडू शकेल.

आपला

**वा. ब. कर्णिक.**

[ ६ ]

# निरक्षरतेच्या समूळ उच्चाटनासाठी अमेरिकेत मोहीम

( संग्राहक—श्री. शं. ल. थोरात )

निरक्षरता समूळ नाहीशी करण्यासाठी अमेरिकेसारख्या पहिल्या प्रतीच्या राष्ट्रात हिरीरीने यत्न चालला आहे. विमानगतीने धावणाऱ्या अमेरिकन राष्ट्राशी तुलना करता भारताची गोगलगाय, समाज-शिक्षणाने सर्वच्या सर्व भारत साक्षर करण्याचे ध्येय कधी गाठणार ? कसे गाठणार ?

अमेरिकेत निरक्षरता फार कमी आहे, पण जी थोडी निरक्षरता आहे ती दूर करण्यासाठी अमेरिकन फेडरल सरकारच्या शिक्षण खात्याकडून प्रयत्न होत आहे. न्यूयार्क शहराचे कार्नेजी कार्पोरेशन आणि विविध शिक्षण संस्था यांच्या सहकार्याने त्या प्रयत्नाना

आर्थिक मदत मिळत आहे. १९४७ पासून शिक्षण खात्याने साक्षरतेची योजना अमलात आणली आहे. त्या योजनेप्रमाणे निरक्षर प्रौढाना लिहिणे-वाचणे शिकविले जाते.

अमेरिकेतील सर्व राज्यात सक्तीच्या शिक्षणाचे कायदे आहेत. साधारणपणे १६ वर्षे वयापर्यंतच्या मुलाला सक्तीने शाळेत जावेच लागते. त्यामुळे अमेरिकेत १३ वर्षे वयावरील लोकापैकी ९७ टक्क्यापेक्षा अधिक लोकाना लिहिता-वाचता येते.

तथापि, सक्तीचे शिक्षण सुरू होण्यापूर्वी दूरच्या भागात लहानाचे मोठे झालेले कांही प्रौढ लोक अजून निरक्षर आहेत. स्वतःची सही करण्यापलीकडे त्याना अक्षर ओळख नाही.

## अमेरिकन सैन्याचे प्रयत्न

१९४३ साली अमेरिकन सैन्याने साक्षरतेचा जो कार्यक्रम यशस्वी करून दाखविला होता, त्याच्या आधारावर सध्याचा साक्षरता कार्यक्रम तयार केलेला आहे. चार वर्षांच्या अभ्यासक्रमात शाळेतील मुले जेवढे ज्ञान आत्मसात करतात, तेवढे ज्ञान निरक्षर सैनिकाना ८ ते १६ आठवड्यांच्या मुदतीत दिले जात असे. सैन्याच्या अधिकाऱ्याना त्या वेळी असे आढळून आले कीं, निरक्षर लोकापैकी बरेच जण बुद्धिमान असतात; चटकन् शिकतात आणि शिक्षणाचा उपयोग त्याना पटला तर ते शिकण्यास उत्सुक असतात.

## रोजच्या जीवनातील उदाहरणे

प्रौढ शिक्षणाच्या पुस्तकात रोजच्या व्यवहारातील प्रसंगाच्या आधाराने धडे दिलेले असतात. गणित शिकविण्यासाठी दुधाचे पाईंट, क्वार्ट आणि गॅलन यांची उदाहरणे दिलेली असतात. एका

माणसाचा शर्टचा खर्च किती, एका दिवसात ट्रक-मोटारीने किती मैल जाता येईल, सिगारेटच्या एका पाकिटाला किती किंमत पडेल अशी उदाहरणे घेऊन गणित शिकविले जाते.

विद्यार्थी ज्या कुटुंबातील असेल तसल्याच कुटुंबाच्या रोजच्या जीवनातील प्रसंग घेऊन त्यांच्या आधाराने वाचनाचे मनोरंजक धडे तयार केलेले असतात. आई स्वयंपाक करीत आहे, बाप कामावर जात आहे आणि दिवसभर काम करून परत घरी येत आहे, असे प्रसंग वाचनाच्या धड्यात दिलेले असतात.

प्रौढ साक्षरतेच्या अभ्यासक्रमाला मुदतीचे बंधन नाही. विद्यार्थी वर्गात दाखल झाला कीं शिक्षण सुरू होते आणि आपले उद्दिष्ट साध्य झाले असे त्याला वाटले कीं शिक्षण पूर्ण होते. त्याला लिहिता व वाचता येण्याची इच्छा असते आणि रोजच्या जीवनात व कामकाजात जेवढे गणित लागते तेवढे आपल्याला यावे असे त्याला वाटत असते. इतके ज्ञान आपल्याला मिळाले आहे अशी त्याची खात्री झाली म्हणजे त्याचे शिक्षण पूर्ण झाले असे समजतात.

शिक्षणखात्याकडून चार पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. चार वाचन पुस्तके, एक गणिताच्या उदाहरणाचे पुस्तक, एक भाषा शिकण्याचे पुस्तक, एक शब्दसंग्रह, इतकी पुस्तके अभ्यासक्रमात आहेत. आणखी तीन पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत, ती शिक्षकासाठी आहेत.

प्रौढ शिक्षणाच्या साधनाचा दोन वर्षे अनुभव आला आहे. आता या कार्यक्रमाची सूत्रे शिक्षणखात्याकडून निरनिराळ्या राज्याकडे व गावाकडे दिली जात आहेत.

शैक्षणिक, धार्मिक, लष्करी, व्यापारी, कामगार, सामाजिक आणि शेतकरी संघटनाकडून हे प्रौढ शिक्षणाचे वर्ग चालविले जातील. ते वर्ग सायंकाळी भरतील. सार्वजनिक शाळा, मंदिरे, क्लब, अशा ठिकाणी हे वर्ग चालविले जातील.

—मन्वन्तर

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रमांक १९५५५ वि: 
क्रमांक १०२५ नों: दि: २८/३/५६

# [ ७ ]

# कोलंबियातील लोकशिक्षण

( आकाशवाणीच्या साहाय्याने लोकशिक्षणाचा प्रयोग )

**लेखक—श्री. व्ही. बी. कर्णिक**

डॅनियल बेहर्मन ह्या नावाच्या गृहस्थाने, 'जेव्हां पर्वत हालू लागतात ( When Mountains Move ) या नावाचे एक पुस्तक प्रसिद्ध केले आहे. हे पुस्तक युनेस्कोने नुकतेच प्रसिद्ध केले आहे. सदर पुस्तकात, आकाशवाणीच्या साह्याने प्रौढशिक्षण देण्याचा एक अभिनव प्रयोग, लॅटिन अमेरिकेतील कोलंबिया नावाच्या भागात चालू आहे, त्याची हकीकत देण्यात आली आहे.

कोलंबियन अँडीस हा भाग पर्वतामध्ये आहे. ह्या पर्वताच्या उष्ण खोऱ्यात कॉफीची पैदास होते तर वरच्या भागात मेंढ्यांची पैदास होते. या भागात निरक्षरतेचे प्रमाण खूप मोठे होते. निरक्षरतेच्या जोडीला आणखी दोन शत्रु होते. येथील लोकांत दारूचे व्यसन फार मोठे होते. त्यांचे दुसरे व्यसन म्हणजे कज्जेदलाली करण्याचे.

ह्या भागात एक ख्रिश्चन मिशनरी काम करण्याकरिता आला. त्याचे नाव फादर जोस सालकॅदो. त्याने येताना आपल्याबरोबर एक रेडिओ ट्रॅन्समिटर आणला होता. येथील लोकांची परिस्थिति, सर्व प्रकारे सुधारण्याच्या तळमळीने तो आला होता. स्थानिक लोकांच्या मदतीने त्याने पहिले आकाशवाणी केंद्र येथे सुरू केले. हे पहिले केंद्र बांधण्यासाठी ज्यानी ज्यानी मदत केली, त्याना त्याना या केंद्रावरून बोलण्याची संधि, त्या मिशनऱ्याने दिली. याचा परिणाम असा झाला कीं, लोक त्याच्याकडे येऊ लागले. दहा महिन्याच्या आतच त्याने लोकांच्या मदतीने तीन ठिकाणी बॅटरीवर चालणारे रेडिओ सेट बसविले. लोकाना पुढे रेडिओची चटक लागली. फादर सालकॅदोने यानंतर रेडिओचे वर्ग सुरू केले व या वर्गातून सरकार जनतेच्या हितासाठी काय काय करते, ते सांगण्यास सुरवात केली. विकास योजनेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या लोकशिक्षण अधिकाऱ्यानी करून पहाण्यासारखा हा प्रयोग आहे.

हा प्रयोग त्या मिशनऱ्याने चिकाटीने सात वर्षेपर्यंत चालविला. आकाशवाणीच्या मार्फत, प्रौढशिक्षणाचे काम जगातील कोणत्याही भागात याप्रमाणे चालू नव्हते. साऱ्या जगातील प्रौढशिक्षणाच्या क्षेत्रात होणारा एक अभिनव प्रयोग म्हणून सर्वांचे इकडे लक्ष लागले. आज या आकाशवाणी केंद्रामार्फत दोन लाख लोकाना रोज सहा तासाप्रमाणे शिक्षण देण्यात येते. या रेडिओच्या द्वारे शिक्षण देणाऱ्या शाळासाठी सहा हजार खास तयार केलेले रेडिओ सेट वापरले जातात. या प्रयोगाला तेथील सरकार खूप ग्रँट देऊन मदत करते. आता युनेस्कोने पण या प्रयोगाला आर्थिक मदत देण्याचे ठरविले आहे.

ह्या रेडिओ शाळाना जोडून एक प्रकाशन विभाग चालू करण्यात आला आहे. या प्रकाशन विभागामार्फत, वरील शाळाना मार्गदर्श

करण्यासाठी एक मासिक चालविण्यात येते व असंख्य पत्रके पण छापली जातात. यापैकी एका पत्रकात, रेडिओचा सेट कसा बसवावा व त्याची काळजी कशी घ्यावी, याविषयी माहिती देण्यात आली आहे.

ह्या आकाशवाणीच्या कार्यक्रमाना सकाळी ५ ला सुरवात होते. ५ ते ७॥ हा कार्यक्रम चालतो. या वेळात वाचन, लेखन, आरोग्य शास्त्र, नागरिक शास्त्र, इतिहास इत्यादि विषय शिकविले जातात. धार्मिक माहिती दिली जाते. कार्यक्रमाचा शेवट करण्यापूर्वी रोजची ताजी बातमी सांगितली जाते. हा सर्व कार्यक्रम टेप रेकॉर्डच्या साह्याने मुद्रित केला जातो. सकाळी बायका कामात असतात त्याना तो सकाळी ऐकायला वेळ नसतो. सकाळी ध्वनीमुद्रित केलेला कार्यक्रम बायकाना दुपारी ऐकविण्यात येतो. संध्याकाळी पाच वाजता हाच कार्यक्रम पुन्हा सुरू होतो. ज्या पुरुषाना सकाळी कांही कामामुळे हा कार्यक्रम ऐकायला मिळाला नसेल, त्याना तो या वेळी-पाच वाजता ऐकायला मिळतो.

संध्याकाळचा दुसरा कार्यक्रम ५॥ ते ९ पर्यंत चालतो. ह्या वेळी करमणुकीच्या कार्यक्रमावर भर असतो. खानदानी व लोकांच्या आवडीची गाणी, ताज्या बातम्या, वेगवेगळे मनोरंजक कार्यक्रम, धर्मा-वरील व्याख्यानें, ऐतिहासिक व इतर नाटके इत्यादि कार्यक्रम त्यावेळी लोकासाठी आखलेला असतो. येथील शेतकऱ्यांच्या जीवनावर आधार-लेली नाटके, कोलंबियातील प्रवासाची वर्णने, हे पण कार्यक्रम मधून मधून ठेविले जातात. कज्जे दलालीसंबंधाची नाटके व नाट्यप्रवेश तर लोकाना खूपच आवडतात. कारण येथील लोकाना कोर्टात खटले भरण्याचे मोठे व्यसन आहे.

रेडिओच्या मदतीने लेखन वाचन शिकविण्याचे जे कार्यक्रम चाल-

तात, त्या कार्यक्रमाना जोड देण्यासाठी निरनिराळ्या प्रकारची भित्ति-चित्रे ( पोस्टर्स ) तयार करण्यात येतात. ही चित्रे प्रौढाना सहज समजावीत या हेतूने खूप काळजी घेऊन ती तयार केली जातात. त्यात कोणत्याही प्रकारचा अस्पष्टपणा रहाणार नाही याची काळजी घेतली जाते.

शेतीची सुधारणा व्हावी, लोकांचे आरोग्य सुधारावे, त्यांच्या घर बांधण्याच्या व राहणीच्या पद्धतीत सुधारणा व्हावी, या हेतूने कांहीं खास कार्यक्रम रेडिओमार्फत घडवून आणले जातात. शेतकऱ्याना बी-बियाणे, अवजारे इत्यादि वस्तू विकत घेण्यासाठी व त्यांच्या घरात सुधारणा घडवून आणण्यासाठी शेतकऱ्याना कर्ज देणारी एक संघटना आहे. ह्या संघटनेची मदत आकाशवाणीचे चालक घेतात व शेतीतील सुधारणांचे लोण खेडोपाडी पोहोचविण्याची ते काळजी घेतात. शेत-कऱ्याला कर्ज देणाऱ्या ह्या सोसायटीला क्रेडिट सोसायटी म्हणतात. ह्या सोसायटीमार्फत रेडिओ शाळाना, त्या शाळात शिकणाऱ्या शेत-कऱ्याना हरएक प्रकारची मदत करण्यात येते. तात्पर्य काय कीं, आकाशवाणीच्या मार्फत लोकशिक्षण देण्याचा तर उपक्रम येथे चालू आहेच; पण लोकांचे अज्ञान, दारिद्र्य व रोगराई ह्या तिन्ही शत्रूवर एकदमच हल्ला करण्याचे तंत्र पण येथे स्वीकारलेले आहे. शेतीविषयक व आरोग्यविषयक माहिती ह्या शाळातून पुरविली जातेच; पण जना-वराच्या व माणसाच्या रोगावर उपाय करणारी औषधे, बी-बियाणे व इतर अवजारेही ह्या केंद्रामार्फत पुरविली जातात. लोकशिक्षणाच्या क्षेत्रात केवढे प्रचंड व किती वेगवेगळ्या प्रकारचे प्रयोग आज जगात चालू आहेत. यावरून ह्याची कल्पना कार्यकर्त्यांना येईल.

---

[ ८ ]

# अमेरिकेतील एक प्रयोग

अमेरिकेतील आल्बामा नावाच्या गावात ही गोष्ट घडली. तेथील ९० टक्के लोकाना कृमीपासून त्रास होत होता. सरकारी आरोग्य खात्यापुढे मोठा पेचप्रसंग निर्माण झाला. या सरकारी अधिकाऱ्यानी रोगाला पायबंद घालण्याचे उपाय सुरू केले. तेथील लोकाना शास्त्रीय ज्ञान मुळीच नसल्यामुळे त्यानी सरकारच्या प्रयत्नाना जोराचा विरोध केला. लोकाजवळून जरूर ती माहिती गोळा करणे व त्याना हवी अशी शास्त्रीय माहिती देणे, ही अधिकाऱ्याना मोठी कठीण गोष्ट वाटू लागली. त्यावेळी येथील एका संस्थेने या परिस्थितीतून मार्ग सुचविला. लोकाना जी माहिती सांगावयाची होती ती त्यानी शाळेतील मुलांच्यामार्फत लोकाकडे पोहोचविण्याचे ठरविले. सुदैवाने येथील प्रौढाना पण लिहिता वाचता येत होते. परंतु जे कांही लिखाण या संस्थेने तयार केले होते ते मुलाना वाचता येईल इतके सोपे तयार केले होते.

या संस्थेने ' टॉमीला झालेले कृमी ' या नावाने गोष्ट तयार केली.

ही गोष्ट छापून ३ री ४ थीच्या मुलाना ती खात्यातर्फे वाटण्यात आली. मुलानी ती गोष्ट मोठ्या उत्साहाने वाचली, शिक्षकानी या गोष्टीबद्दल दोन शब्द मुलाना सांगितले. मुलांच्या तोंडून ती हकिकत त्यांच्या पालकाना समजली. गोष्टीतील टॉमीने कृमींवर विजय मिळविला होता. ह्या रोगापासून आपले रक्षण कसे करिता येईल याची माहिती आता लोक विचारायला येऊ लागले. गोष्टीतील टॉमीने एक नव्या पद्धतीचा पायखाना बांधला होता, त्यामुळे त्याच्या भागातील आरोग्य सुधारले व कृमीचा आजार कमी झाला. आता लोक आरोग्य खात्याच्या अधिकाऱ्याना येऊन विचारू लागले. 'हा नव्या पद्धतीचा पायखाना कसा तयार करावयाचा ?' आरोग्य खात्याच्या अधिकाऱ्यानी लागलीच या संधीचा फायदा घेतला. त्यानी दुसरे एक पत्रक छापले. त्या पत्रकाचे नाव 'जॉन्ने बांधलेला नवा पायखाना,' या पत्रकात जॉन नावाच्या शेतकऱ्याने हा नव्या धर्तीचा पायखाना कसा बांधला त्याची तपशीलवार माहिती दिली होती. या पत्रकाचा परिणाम फारच चांगला झाला. मुलाकडून घरात आलेले हे पत्रक त्यांच्या पालकानी काळजीपूर्वक वाचले व त्याप्रमाणे त्या गावात ८००० नव्या पद्धतीचे संडास बांधण्यात आले व ३५०० नव्या पद्धतीच्या घाण साचविणाऱ्या टाक्या बांधण्यात आल्या. या सर्वांचा येथील लोकांच्या आरोग्यावर चांगला परिणाम झाला. लोकांची हळू हळू कृमीपासून सुटका झाली.

या सर्व गोष्टींचा आणखी एक चांगला परिणाम झाला. पूर्वी जे लोक आरोग्य खात्याच्या अधिकाऱ्यांचे बोलणेसुद्धा ऐकून घ्यायला तयार नव्हते, ते आता त्यांच्या योजना समजून घेण्यास धडपडू लागले. आल्बामामध्ये कार्यकर्त्यांना असा अनुभव आला कीं, जी माहिती लोकाना हवी असते ती छापून तुम्ही लोकापर्यंत पोहोचविलीत कीं, ती लोक जाणून घेण्याचा प्रयत्न करितात. व्याख्यानाने जे काम होत नाही, ते या मार्गाने चांगले होते. लोकशिक्षणाचा उद्देश लोकांचे जीवन समृद्ध करणे तो या मार्गाने चांगला सिद्धीला जातो.

[ ९ ]

# डेन्मार्क देश

लेखकः—श्री. व्ही. बी. कर्णिक

डेन्मार्क हा एक लहान देश आहे. त्याचे क्षेत्रफळ १५५०९ चौरस मैल आहे. तेथील लोकांचा मुख्य धंदा शेती. एकूण लोकांपैकीं शेकडा २५ टक्के लोक शेतीवर जगत आहेत. डेन्मार्कमधून परदेशी जाणाऱ्या एकूण मालापैकी तीन पंचमांश माल, शेतीच्या उत्पादनापैकी आहे. डेन्मार्कचे वैशिष्ट्य म्हणजे तेथे फार श्रीमंत असे लोक नाहीत. आपल्या देशात कांही लोक कोट्याधीश आहेत तर कांही कवडीकंगाल आहेत. डेन्मार्कमध्ये तशी परिस्थिति नाही. श्रीमंत व गरीब माणसामध्ये अंतर फार कमी आहे. गरीबातील गरीबाला सुद्धा सरकारी मदतीमुळे कांही गोष्टी निश्चित मिळू शकतात.

डेन्मार्क हे खऱ्याखुऱ्या अर्थाने कल्याणकारी राज्य आहे. देशातील प्रत्येक व्यक्तीला अन्न, वस्त्र व राहायला घर मिळालेच पाहिजे अशी

सरकारची दृष्टि आहे व त्या दिशेने सरकारने चांगली व्यवस्था केली आहे. ह्या सर्व व्यवस्थेबाबत स्वतंत्र लेख लिहावे लागतील; तेव्हांच तेथील व्यवस्थेची खरी कल्पना आपल्या वाचकाना येईल. अन्न, वस्त्र व आसरा ह्या तीन मुख्य गरजाप्रमाणेच, आजाराच्या वेळी वैद्यकीय मदत मिळणे व मुला-बाळाना शिक्षण मिळणे ह्यासुद्धा आजच्या काळातील आवश्यक अशा बाबी आहेत. त्या दिशेने पण डेन्मार्कमध्ये जनतेला मिळणारी मदत खूपच चांगली आहे.

१८१४ सालापासून ह्या देशात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत आहे. प्रत्येकाला ७ ते १४ वयाच्या मुदतीत सरकारी खर्चाने प्राथमिक शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. जवळ जवळ गेली १५० वर्षे प्राथमिक शिक्षण सक्तीचे असल्यामुळे डेन्मार्कमध्ये कोणी-सुद्धा आज निरक्षर नसला तर त्यात आश्चर्य करण्यासारखे कांही नाही. ह्या देशाची लोक संख्या ४२ ते ४३ लाख इतकीच आहे. ह्या सर्व लोकाना ७ वर्षांचे शिक्षण मिळण्याची व्यवस्था झाली आहे.

डेन्मार्कची राज्यव्यवस्था लोकशाही पद्धतीने चालते. १८४९ सालापासून त्या देशात लोकशाही राज्यव्यवस्था चालू झाली. लोक-शाही राष्ट्रात लोकाना फार महत्त्वाचे स्थान असते. लोक शहाणे झाले तरच लोकशाही राज्यव्यवस्था यशस्वी होते. डेन्मार्कची आजची भर-भराट ही डेन्मार्कच्या जनतेच्या प्रयत्नांचे फळ आहे. हा डेन्मार्क इतका चांगला बनविण्यासाठी लोकानी प्रयत्न केले. शिक्षणामुळेच लोकाना आपली जबाबदारी समजली व ती त्यानी पार पाडली.

# [१०]

## डेन्मार्कचे पत्र १ ले

[ श्री. वा. ब. कर्णिक, महाराष्ट्राचे लोकशिक्षणाधिकारी हे चार महिन्याकरिता डेन्मार्कला सरकारतर्फे गेले होते. त्यांची आलेली पत्रे आम्ही येथे देत आहोत. ]

इन्टरनॅशनल पीपल्स कॉलेज,
एल्सिनोर, डेन्मार्क
ता. २१-६-१९५४

डेन्मार्क येथील लोक-शाळा जगात प्रसिद्ध आहेत. त्या शाळांची संपूर्ण माहिती असलेले व त्याविषयी ज्यानी पुस्तके लिहिली आहेत, असे एक गृहस्थ, थोड्याच दिवसापूर्वी, भारतात येऊन गेले. त्यांचे नाव पीटर मॅनिकी. त्यानी भारतातून प्रवास केला. भारतातील खेड्यामधील लोक फार मोठ्या प्रमाणात शहरात जात आहेत, खेड्यात उपजीविकेची साधने नसल्यामुळे खेडी ओस पडत चालली आहेत.

खेड्यात दारिद्र्य, रोगराई व निरक्षरता फार आहे. अशा गोष्टी त्यानी पाहिल्या. भारताची सुधारणा म्हणजे भारतातील शेतकऱ्यांची—खेडुतांची–सुधारणा, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत आली. डेन्मार्कमध्ये आज जी प्रगति झाली, तिची सुरुवात शे-दीडशे वर्षांपूर्वीपासून झाली. डेन्मार्कच्या शेतकऱ्यांची सुधारणा झाली व डेन्मार्क सुधारवयाचे बरेचसे श्रेय येथील ' लोकशाळाना ' व त्या चालविणाऱ्या शिक्षकाना आहे. ग्रामीण शिक्षणाचा हा डेन्मार्कमध्ये झालेला व आज चालू असलेला प्रयोग भारतातील शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्यानी पहावा व त्याप्रमाणे भारतातील ग्रामीण शिक्षणाचा कार्यक्रम आखावा; अशी सूचना डॉ. मॅनिकी यानी भारत सरकारला केली. त्याप्रमाणे भारत सरकारने, त्याच इंटर नॅशनल पीपल्स् कॉलेज नावाच्या संस्थेत त्यांच्या मार्गदर्शनाखाली एक भारतीय शिक्षणतज्ज्ञांची तुकडी पाठविण्याचे ठरविले व त्या योजनेप्रमाणे आम्ही येथे आलो.

आलेल्या मंडळीत बंगाल ४, बिहार ४, सौराष्ट्र २, राजस्थान व बिकानेर २, मुंबई २, दिल्ली १, मद्रास १, म्हैसूर १, मध्यप्रदेश १, अशी प्रांतवार विभागणी आहे. ह्यापैकी कांही सरकारी नोकर आहेत व कांही खाजगी संस्थांचे –विशेषतः मूलोद्योगी शिक्षण संस्थांचे–चालक अथवा मुख्याध्यापक आहेत. मराठी भाषा बोलणारे तीन आहेत. मुंबईहून आलेल्या दोघापैकी गारगोटी-कोल्हापूरचे श्री. सावे हे खाजगी विद्यालयातर्फे व मी स्वतः सरकारी अधिकाऱ्यातर्फे असे दोघे आहोत. दिल्लीहून निघण्यापूर्वी या सर्वांची एक सभा दिल्लीत झाली. त्या सभेत मौ. आझाद, श्री. सैयादिनसाहेब व मध्यवर्ति शिक्षणखात्याचे इतर अधिकारी हजर होते. त्यानी ह्या योजनेमागील भारतसरकारचा हेतु स्पष्ट करून सांगितला. ते म्हणाले, " केवळ शिक्षणाचा विचार करण्यासाठी सरकारतर्फे जाणारी ही पहिलीच मोठी तुकडी होय.

तुमच्या येण्याकडे आमचे डोळे लागून रहातील, कारण तुम्ही जी माहिती आणाल. ती आमच्या ग्रामीण शिक्षणाच्या योजना आखताना, आम्हाला फार उपयोगी व मार्गदर्शक ठरेल. या संधीचा तुम्ही जास्तीत जास्त फायदा करून घ्यावा. ”

आम्ही विमानाने येथे आलो आहोत. कराची, कैरो, जिनेव्हा, पॅरिस व लंडन ही स्टेशने लागली. लंडनला एक रात्र काढली. सकाळी लंडनचे धावते दर्शन घेतले. लंडनहून विमानाने ‘ कोपनहेगन ’ ला आलो. ‘कोपनहेगन’ हे डेन्मार्कचे राजधानीचे शहर. तेथून आगगाडीने त्याच रात्री एल्सिनोरला आलो. एल्सिनोर हे लहान शहर आहे. वस्ती वीस हजारांची. इंटरनॅशनल पीपल्स कॉलेजमुळे येथे पाहुण्यांची सारखी ये जा चालू असते. आता त्यांचा दुसरा कोर्स चालू आहे. त्या ठिकाणी स्वीडन, नॉर्वे, डेन्मार्क वगैरे देशातील मुले व मुली आली आहेत. ही शाळा खऱ्याखुऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय आहे. परवा जर्मनीतील मुलामुलींची एक तुकडी येथे येऊन गेली.

या कॉलेजच्या जवळच एक दुसरी शाळा आहे. तेथे आम्ही राहतो. ही एका श्रीमंत बाईने बांधली आहे. तिच्या वडिलाना त्यांच्या वयाच्या ८० व्या वर्षी कॅन्सर झाला. बाईने कॅन्सर का होतो याचा अभ्यास करायला सुरुवात केली. तिला असे आढळून आले कीं, जर माणसाने कच्च्या भाज्या, कच्ची फळे, कच्चा दाणा (वाटाणा वगैरे)खाल्ले तर कॅन्सर होईल, तिने वडिलाना त्याप्रमाणे समजाविण्याचा प्रयत्न केला, पण त्यानी ते ऐकले नाही. थोड्याच दिवसानी ते वारले. मरताना आपल्या मुलीसाठी त्यानी खूप पैसा मागे ठेवला. ह्या पैशातून त्या बाईने ही शाळा चालविली आहे. येथे शाकाहारांचा व कच्च्या अन्नांचा प्रचार केला जातो. हें अन्न व त्याविषयी माहिती घेण्यासाठी निरनिराळ्या देशातून येथे लोक येतात. त्यापैकी बऱ्याच बाया असतात. त्याना

योग्य ते व्यायाम पण शिकवितात. ह्या शाळेचे नाव ' डन्स्क राकोस्ट स्कोल ' असून बाईंचे नाव ' अग्नेस ॲन्डरसन् जूनल्. ' ह्याच शाळेत आहाराचा प्रयोग आमच्यावर पण झाला.

येथे दिवस फार लवकर उजाडतो. ३॥–४ ला सकाळ होते. रात्री दहापर्यंत उजेड रहातो. आम्ही सहाचे सुमारास उठतो व सातला आमची प्रार्थना होते. आश्रम-भजनावलीतून संस्कृत श्लोक आम्ही म्हणतो. नंतर थोडा कुराणातील भाग. त्यानंतर भजन, गुरुदेवाबरोबर ज्याना काम करण्याची संधि मिळाली असे शांतिनिकेतनमधील श्री. ' धार ' नावाचे गृहस्थ भजने चांगली म्हणतात. आठला व्याख्याने सुरू होतात, ती चांगली ११॥–१२ पर्यंत चालतात, पुढे पुन्हा तीन, ते पाचपर्यंत व्याख्याने चालतात. ज्यावेळी आम्ही बाहेर एकादी संस्था पाहावयास जातो त्यावेळी ह्या कार्यक्रमात थोडा बदल होतो.

आतापर्यंत डेन्मार्कमधील जीवन, येथील शेतकऱ्यांच्या प्रगतीचा इतिहास, येथील शिक्षण पद्धति, येथील लोकशाळांचे कार्य व त्यांची फलनिष्पत्ति इत्यादि विषयावर व्याख्याने झाली. आता आंतरराष्ट्रीय राजकारण व पूर्वेकडील देश—विशेषतः आशिया व भारत, या विषयावर सहा व्याख्याने होणार आहेत. ह्यानंतर आम्ही १८ लोक १८ शेतकरी कुटुंबात रहायला जाणार आहोत. शेतकऱ्यांच्या घरी एक पंधरवडा आम्ही राहू. आम्हाला घरी ठेवून घेण्याबाबत नजीकच्या शेतकऱ्याशी पत्रव्यवहार चालू आहे.

एल्सिनोरपासून स्वीडन अवघ्या ६० मैलावर आहे. आम्ही स्वीडनला जाऊन तेथील लोकशाळा व इतर शाळा पहाणार आहोत. पुढील महिना ह्या दोन कामासाठीं राखून ठेवला आहे. जे पाहायला मिळेल ते नीट पाहून घेण्याचे काम चालू आहे. ह्या लोकशाळा, डेन्मार्कची

शिक्षणपद्धति इत्यादि विषयावर पुस्तके वाचून पण माहिती मिळवीत आहोत.

पुढील पत्रातून डेन्मार्कमधील प्रौढ शिक्षणाबाबत लिहायला सुरुवात करीन. डेन्मार्कमधील प्रौढ शिक्षण हे येथील लोकशाळापुरतेच मर्यादित झालेले नाही. ह्या लोकशाळेतून प्रौढाना शिक्षण मिळतेच, पण ह्या-खेरीज प्रौढशिक्षणाचा एक वेगळा कार्यक्रम आखलेला आहे. ह्या दृष्टीने पहाता डेन्मार्कमध्ये पुष्कळच जाणून घेण्यासारखे आहे. डेन्मार्कमध्ये साक्षरता १०० टक्के आहे. १८१४ सालापासून येथे प्राथमिक शिक्षण सक्तीचे आहे. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाला १४० वर्षे झाली, म निरक्षर कोण व कसा राहणार !

[११]

# डेन्मार्कचे पत्र २ रे

## लोकशाळा

इन्टर नॅशनल पीपल्स कॉलेज,
एल्सिनोर, डेन्मार्क
ता. १९-७-१९४५

आज येथे येऊन जवळ जवळ दीड महिना झाला. ह्या दीड महिन्यात येथील प्रौढ शिक्षणाच्या चळवळीची खूप माहिती मिळविली. डेन्मार्कमध्ये लोक-शाळा ( Folk-Schools ) व रात्रीच्या शाळा ( Evening Schools ) ह्यांच्या मार्फत प्रौढांना शिक्षण दिले जाते. आम्ही पाच सहा ‘ लोक-शाळा ’ पाहिल्या. रात्रीच्या शाळेत शिकविणाऱ्या शिक्षकांचा एक ट्रेनिंग कोर्स पाहिला. येथील शिक्षकांच्या बरोबर चर्चा केली. त्यांच्याबरोबर जेवलो. आजच्या पत्रातून ह्या लोकशाळांची तोंड ओळख करून देणार आहे. ह्या विषयावर सविस्तर पुढे लिहीन. डेन्मार्कमध्ये आज जी प्रगति झाली आहे, त्याचे सारे श्रेय

येथील प्रौढशिक्षणाच्या चळवळीला—लोकशाळाना देण्यात येते. ही माहिती उपयोगी वाटेल अशी आशा आहे.

ही ‘ लोकशाळांची ’ मूळ कल्पना मिस्टर एन्. एफ्. ग्रुंड्ट्विग ह्यांची आहे. हा एक मोठा कवि, साहित्यकार, शिक्षणशास्त्रज्ञ व तत्त्वज्ञानी होता. तो बिशप ग्रुंड्ट्विग ह्या नावाने प्रसिद्ध होता; परंतु आज त्याला ‘ लोकशाळांचा जनक ’ म्हणून ओळखले जाते. ग्रुंड्ट्विग हा १७८३ मध्ये जन्मला व १८७२ मध्ये मरण पावला.

डेन्मार्कमधील पहिली ‘ लोकशाळा ’ १८४४ साली स्थापन झाली. ह्या वेळी डेन्मार्कमधील परिस्थिति फारच चमत्कारिक होती. १८ व्या शतकाच्या शेवटी शेतकऱ्यांची स्थिति सुधारली होती. जमिनीबाबत कांही चांगले कायदे करण्यात आले होते. शेतकरी गुलामगिरीतून सुटला होता. त्याच्या हाती दोन पैसे खेळत होते. गुलामगिरी संपली होती; वेठ-बिगार बंद झाली होती. जमीन कसणारे मजूर जमिनीचे मालक झाले होते. लोक आपल्या मगदुराप्रमाणे जमीन कसू लागले; माल परदेशी जाऊ लागला. मालाला किंमत येऊ लागली. शेतकरी श्रीमंत झाला. सबंध देशाची भरभराट झाली.

युरोपचा इतिहास पाहिला तर १८३० साली जुलै महिन्यात फ्रान्समध्ये राज्यक्रांति झाली. याचा परिणाम साऱ्या युरोपवर झाला. डेन्मार्कचे दिवस फिरले. इंग्लंडने कोपनहेगनवर स्वारी केली. सात वर्षे लढाई चालली होती. देशाची धूळधाण झाली. आलेल्या संकटांना तोंड देण्यास लोकामध्ये त्राण राहिला नाही. लोक हवालदील झाले. जो तो आळशासारखा स्वस्थ बसू लागला. पोट भरण्याच्या चिंतेने सारे व्याकूळ होऊ लागले. युद्धामुळे त्यांचे धैर्य खचले होते. कोणत्याही नव्या कामाला हात घालण्याचा उत्साह किंवा हिम्मत त्यांच्याजवळ शिल्लक राहिली नव्हती. जे थोडेबहुत धडपडे

लोक होते ते आपला वेळ दारुबाजीत व चैनीत घालवू लागले. डेन्मार्कची चिता भडकत असताना ज्याना चैन सुचली त्याचा ग्रुंड्दविगने कडक शब्दात धिक्कार केला.

ह्या दुःखात आणखी एक भर पडली. चारशे वर्षे डेन्मार्कशी एकरूप झालेला नॉर्वे देश डेन्मार्कपासून निराळा झाला. त्यामुळे आधीच मंदीच्या खाईत पडलेल्या डेन्मार्कवर प्रेतकळा पसरली. एकाद्या वादळात सापडलेल्या एका मोठ्या महासागरातील छोट्या बेटासारखी डेन्मार्कची परिस्थिति झाली. आणखी जर एकादे वादळ झाले, तर ह्या उसळणाऱ्या लाटा हे बेट गिळंकृत करून टाकतील, अशी धास्ती वाटू लागली. आणखी एकादे संकट आले तर डेन्मार्क जिवंत पण रहाणार नाही, अशी लोकांची खात्री झाली. अशा या हीन दीन झालेल्या लोकाना उद्देशून एकाद्या भविष्यवाद्याप्रमाणे ग्रुंड्दविगने पुढील उद्‌गार काढले. ‘ लोकहो ! आपला शोक आवरा. आनंदी रहा. परमेश्वराचा तुम्हाला हुकूम आहे कीं, तुम्ही आनंदात राहिले पाहिजे. ’

ह्यावेळी ग्रुंड्दविगला एक नवा दृष्टांत झाला. ज्या लोकांचे धैर्य खचले आहे, ज्यांचा जिवंतपणा नाहीसा झाला आहे त्यांच्यामध्ये जर जागृति करावयाची असेल तर ती पुस्तकाने–लिहिण्यावाचण्यामार्फत होणार नाही. ‘ जिवंत शब्द ’ त्याना खडबडून जागे करतील. त्यांच्या मातृभाषेतून त्याच्याशी बोलले पाहिजे. त्यांच्या वाडवडिलांचे पराक्रम सोप्या भाषेत त्याना सांगितले पाहिजेत. कामाला सुरुवात तरुणापासून केली पाहिजे. तरुणच उद्याचे पुढारी आहेत. लोकाना मन मोकळे करायला वाव दिला पाहिजे. त्यांच्या मातृभाषेतून त्याना आपल्या मनातील भाव व्यक्त करता येतील. येथूनच लोकशाळांच्या कल्पनेचा जन्म झाला.

पहिली लोकशाळा १८४४ साली स्थापन झाली, हे वर सांगितलेच

आहे. ह्यानंतर जसे जसे दिवस जाऊ लागले, तसतशी ह्या शाळांची संख्या वाढू लागली. ह्या शाळांतील विद्यार्थी बहुतेक खेड्यातूनच येतात. दहा ते पंधरा टक्के विद्यार्थी शहरातील असतात. आज ह्या शाळातून भाषा, भूगोल, यासारखे शाळातून शिकविले जाणारे विषय शिकविले जातात. पण खरी भिस्त लोकाना स्वतःचे व देशाचे प्रश्न समजावून देण्यावर असते. कांही शाळातून इतिहास, भाषा हे विषय शिकविले जातात. पुरुषाना शेती विषयक शिक्षण दिले जाते. स्त्रियाना त्यांच्या जीवनात उपयोगी पडणारे विषय शिकविले जातात. व्यायामाच्या शिक्षणावर फारच भर दिला जातो. ह्या शाळातून बाहेर पडणारी मुले व मुली गावी गेल्यावर तेथील मुलांचे पुढारी बनतात. मुलाना एके ठिकाणी आणण्याचे मुख्य साधन म्हणजे खेळ व व्यायाम. ह्या दृष्टीने लोक-शाळातील विद्यार्थी व्यायामाचे शिक्षण घेतात.

ह्या लोकशाळात, अठरा वर्षे वयाच्या खालील विद्यार्थ्यांना घेण्यात येत नाही. कारण त्यांच्यामध्ये जबाबदारीची जाणीव पुरेशी झालेली नसते. ज्यांची वाढ पूर्ण झालेली नाही अशाना हे शिक्षण देणे योग्य नाही. त्यांच्यासाठी निराळी व्यवस्था केली पाहिजे असे ग्रुंड्टविगचे मत होते. ह्या लोकशाळा हिवाळ्यात पाच महिने चालतात. त्या वेळी पुरुष शिक्षण घेतात. ह्या काळात शेतकऱ्याना शेतीचे काम कमी असते. उन्हाळ्यात शाळा तीन महिने चालतात व त्यावेळी स्त्रिया शिक्षण घेतात. आज आम्ही उन्हाळ्यात डेन्मार्कमध्ये आहोत म्हणून आम्हाला स्त्रियांच्याच शाळा पाहायला मिळतात. ह्या सर्व विद्यार्थ्यांना शाळेतच रहावे लागते. एक महिन्याला १४० ते १५० क्रोनर (अंदाजे १०० रुपये) प्रत्येक विद्यार्थ्याला फी द्यावी लागते. या फीखेरीज ह्या शाळाना सरकारी मदत मिळते. ज्या विद्यार्थ्यांना फी देता येत नाही त्याना सरकार मदत करते. ह्या शाळातून विद्यार्थ्यांना शेती-

विषयक व सहकारी चळवळीविषयक सर्व माहिती मिळते. डेन्मार्कमध्ये सहकारी चळवळीचे जाळे पसरलेले आहे. ही माहिती घेऊन शेतकरी बाहेर पडतात व आपल्या शिक्षणाचा ते उपयोग करतात. जीवन व शिक्षण यांचे इतके चांगले साहचर्य कोठेच पहावयास मिळणार नाही. आज डेन्मार्कमधलि एक तृतीयांश लोकानी कधी ना कधी तरी, 'लोक-शाळेत' शिक्षण घेतलेले आहे. याशिवाय केवळ शेतीचे शिक्षण देणाऱ्या शाळा आहेतच. १९४८ साली अशा ५५ लोकशाळा होत्या. त्यातून ३००० पुरुषानी व ४३०० स्त्रियानी शिक्षण घेतले. सरकारने ५३०० विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी पैशांची मदत केली. या वर्षी अशा शाळाना एकूण सरकारी मदत १७,००,००० क्रोनर ( ११॥ लाख रुपये ) देण्यात आली. आज देखील या शाळांचे काम जोरात चालू आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 48930


# [१२]

## डेन्मार्कचे पत्र ३ रे

### युनेस्को सेमिनार

फ्रेडरिस्कबर्ग, डेन्मार्क
युनेस्को सेमिनार
ता. २४-८-५४

आज ज्या परिषदेला मी हजर राहिलो आहे. त्या युनेस्को परिषदे-विषयी लिहीत आहे.

ही परिषद ग्रामीण विभागातील प्रौढ शिक्षणाच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी भरली आहे. प्रौढ शिक्षणाच्या प्रश्नाच्या विचारासाठी ह्यापूर्वी चार सेमिनार भरल्या होत्या. १ ली सेमिनार आस्ट्रियामध्ये १९५० साली झाली. २ री १९५२ साली फ्रान्समध्ये भरली होती. ३ री व ४ थी १९५३ साली 'ला ब्रेव्हरे' नांवाच्या गावी फ्रान्समध्ये झाली. ह्या सेमिनारमधून प्रौढ शिक्षणाबाबतचे सर्वसाधारण प्रश्न चर्चिले गेले. शेवटच्या ४ थ्या सेमिनारने ग्रामीण विभागातील प्रौढशिक्षणाचा

थोडा विचार केला. त्या वेळी सदर परिषदेने असा निर्णय घेतला होता कीं, हा प्रश्न खूपच महत्त्वाचा आहे. ह्या प्रश्नाचा नीट रीतीने विचार होण्यासाठी एक खास सेमिनार भरविली जावी.

त्या निर्णयाप्रमाणे ही ५ वी सेमिनार सध्या डेन्मार्कमध्ये भरली जात आहे. सदर सेमिनार ह्या महिन्याच्या १४ तारखेला सुरू झाली व ती पुढील महिन्याच्या ४ तारखेपर्यंत चालेल. परिषदेसाठी जी जागा शोधली आहे, तीत बरेच औचित्य आहे. डेन्मार्कमध्ये ग्रामीण प्रौढांच्या शिक्षणाचा प्रश्न ज्यानी यशस्वीपणे हाताळला त्या फादर ग्रुंड्ट्विगच्या नावाने फ्रेडरिस्कबर्ग येथे एक लोकशाळा चालू आहे. ह्या प्रसिद्ध लोक-शाळेत ही सेमिनार भरविली जात आहे.

सेमिनारसाठी एकूण ६५ प्रतिनिधि आले आहेत. ते जगातील ३३ देशातून आले आहेत. अजून दोन देशांचे प्रतिनिधि येतील अशी अपेक्षा आहे. कारण त्यांची नावे येथे आली आहेत. ह्या प्रतिनिधि-मध्ये अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स इत्यादि पुढारलेल्या देशाचे जसे प्रति-निधि आहेत तसे भारत, इंडोनेशिया, आफ्रिका इत्यादि मागासलेल्या देशांचे प्रतिनिधि आहेत, पूर्ण गोरे लोक तसेच काळे निग्रो पण आहेत. हिंदु, ख्रिश्चन, बौद्ध, मुसलमान, ज्यू इत्यादि सर्व धर्मांचे लोक आहेत. पुरुष आहेत, स्त्रिया आहेत. पाकिस्तानचा प्रतिनिधि नाही. भारतीय चार आहेत. त्यापैकीं भारत सरकारचे प्रतिनिधि दोन—एक श्री. माधये गौडा ( म्हैसूरच्या प्रौढशिक्षण समितीचे अध्यक्ष व भारतीय लोक सभेचे सभासद) व दुसरे श्री. व्ही. बी. कर्णिक (महाराष्ट्राचे लोकशिक्षणा-धिकारी ) बाकीच्या दोन भारतीयांपैकी एक श्री. दत्ता ( कलकत्ता विश्वविद्यालयाचे प्राध्यापक, एका मजूर संघटनेमार्फत ) व दुसऱ्या कु. थॉमस (अलीगड येथील प्राध्यापक व त्रावणकोरच्या रहिवाशी—एका स्त्री संघटनेमार्फत ) ह्या आहेत.

सेमिनारचे काम दोन भाषातून चालते. इंग्रजी व फ्रेंच ज्याना मुळीच येत नाही असे किती तरी मोठे लोक येथे आहेत. ज्याला इंग्रजी येत नाहीं त्याला आपल्या देशात आपण गावंढळ मानतो. तेथे तसे मानले जात नाहीं. इंग्रजीतून भाषण चालले की त्याच वेळी त्याचे भाषांतर करून ते हेडफोनमार्फत इंग्रजी न जाणणाऱ्याना ऐकविण्यात येते. तसेच फ्रेंचच्या बाबतीत. फ्रेंचमध्ये भाषणे सुरू झाली कीं, आम्हीं आपले हेडफोन चढवितो.

सभेच्या मुख्य ठिकाणी ज्या ज्या राष्ट्रानी परिषदेमध्ये भाग घेतला आहे, त्या त्या राष्ट्रांचे ध्वज लाविलेले आहेत. जगातील मोठमोठ्या राष्ट्रांच्या झेंड्याबरोबर भारताचा तिरंगी झेंडा मोठ्या डौलाने फडकत असलेला पाहून आमची छाती फुलून जाते. त्या ध्वजावरील अशोकचक्र ह्या प्रतिनिधीना जणू काय समजावून सांगते कीं, विश्वशांतीचा संदेश जगाला देण्याचे काम आम्ही पूर्वीपासून करीत आलेले आहोत.

सेमिनारचे काम सभा-परिषदेच्या कामापासून वेगळ्या पद्धतीने चालते. ६५ प्रतिनिधींचे तीन गट पाडले आहेत व प्रत्येक गटाकडे ह्या चर्चिल्या जाणाऱ्या प्रश्नांचा एक भाग सोपविण्यात आला आहे. कांहीं काळ हे गट स्वतंत्रपणे कांही प्रश्नांचा विचार करतात व त्याविषयी आपले मत बनवितात; व नंतर हे निर्णय सर्व प्रतिनिधींच्या पुढे मांडण्यात येतात व त्या निर्णयावर सर्व मिळून चर्चा करतात. ह्या चर्चेमध्ये त्या गटाने केलेल्या चर्चेमध्ये राहिलेल्या उणीवा भरून काढण्याची दृष्टि व वृत्ति असते. टीका करण्याची वृत्ति मुळीच नसते.

परिषदेच्या कामाला जास्तीत जास्त वेळ मिळावा व आलेल्या प्रतिनिधीमध्ये आपुलकीची नाती निर्माण व्हावी म्हणून प्रतिनिधींची राहण्याची व जेवणाची व्यवस्था एके ठिकाणी करण्यात येते. सर्वांना एके ठिकाणी राहणे सोयीचे व्हावे; खर्चाच्या किंवा त्यासारख्या इतर

अडचणीमुळे प्रतिनिधि पांगले जाऊ नयेत म्हणून राहण्याजेवण्याचा खर्च युनेस्को ( Unesco ) मार्फत केला जात आहे.

परिषदेचे काम सकाळी ९ ते १२॥ व रात्रीं ७॥ ते ११॥ पर्यंत चालते. दुपारच्या वेळीं इतर कांही छोट्या समित्या असतात, त्यांच्या बैठका चालू असतात. त्याखेरीज प्रतिनिधींना स्वतःची टिपणे वगैरे करायला वेळ लागतोच. १॥-२ तासांच्या कामानंतर थकवा जाण्यासाठीं चहा-कॉफीची व्यवस्था केली जाते. सभा चालू असताना धूम्रपान जोरात चालू असते.

ह्या वेळी चर्चेचा विषय ग्रामीण विभागातील प्रौढ शिक्षण हा आहे. ह्या प्रश्नांचा विचार करताना, ग्रामीण विभागातील विशिष्ट परिस्थिति व तेथील जनतेच्या खऱ्या गरजा ह्यांचा विचार करण्याचे काम एका गटाकडे सोपविले आहे. दुसऱ्या गटाकडे प्रौढांच्या शिक्षणाचा कार्यक्रम कोणता असावा, त्याच्या पद्धति कोणत्या असाव्यात व त्या पद्धति हाताळताना कोणती तंत्रे स्वीकारली जावीत, ह्याचा विचार करण्याचें काम सोपविले आहे. तिसरा गट खेड्यामध्ये प्रौढ शिक्षणाची संघटना कशी उभारावी, वेगवेगळ्या विद्यमान संस्थांचा कसा उपयोग करून घ्यावा, ह्याचा विचार करीत आहे.

प्रत्येक गटाचा एक नेता आहे. त्याला गटप्रमुख म्हणतात. १ल्या गटाचे नेतेपण प्रा. दत्ताकडे आहे. दुसऱ्या गटाचे प्रमुख एक फ्रेंच गृहस्थ आहेत, तर तिसऱ्या गटाचे पुढारीपण एका इंग्रजी गृहस्थाकडे आहे. श्री. दत्ता पहिल्या गटात आहेत; दुसऱ्या गटात मी आहे व तिसऱ्या गटात श्री. गौडा आहेत. ह्या तिन्ही गटामधून भारतीय प्रतिनिधि आपले अनुभव व आपला दृष्टीकोन चांगल्या प्रकारे समजावून सांगत आहेत, ही अभिमानाची गोष्ट आहे.

सभेचे डायरेक्टर डेन्मार्कमधील प्रा. मिल्थर्स ह्या नावाचे गृहस्थ आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ९eees वि: नि.वां.धे
क्रमांक (५५) १०२५ नों: दि: २८।३।५८

डेन्मार्कमधील सरकारी शेती कॉलेजचे ते एक प्राध्यापक आहेत. त्यांचे शेतीविषयक व ग्रामीण प्रश्नाबाबतचे ज्ञान व अनुभव ह्यांचा चांगला फायदा मिळत आहे. मनुष्य अत्यंत मनमोकळा, निगर्वी व विनोदी वृत्तीचा आहे; त्यामुळे सभेचे काम अत्यंत हासत खेळत चालते.

परंतु सेमिनारचे काम सुसूत्रपणे चालविण्याची जबाबदारी संभाळणारे एका कोपऱ्यात शांतपणे बसून हरणासारख्या डोळ्यानी भोवताली सारखी आपली नजर फिरवीत राहाणारे डॉस नांवाचे (Unasco)चे एक अधिकारी आहेत. त्यानी आपला कांही अधिकारवर्ग आणला आहे व ह्या लोकाना भरपूर काम पडते. ह्याना मदतनीस म्हणून तेथील शिक्षणखात्याचे एक मोठे अधिकारी व त्यांची तीनचार नोकर-मंडळी सारखी काम करीत असतात.

ह्या ज्यां चर्चा चालू आहेत. त्या ऐकिल्यावर, आजच्या जगाचे स्थूलमानाने दोन भाग पडले असल्याची जाणीव होते. एक भाग पुढारलेल्या देशांचा ( Developed countries ) व दुसरा मागासलेल्या देशांचा ( Underdeveloped countries ) ह्या दोन विभागामध्ये फारच मोठे अंतर, सर्व बाबतीत, दिसून येते. त्यामुळे प्रत्येक प्रश्नाचा विचार करताना ह्या दोन दृष्टिकोनातून त्या प्रश्नाकडे पहावे लागते व त्याप्रमाणे पाहण्याचा प्रयत्न होतो.

पुढारलेल्या बहुतेक देशातून जवळ जवळ सर्व जनता साक्षर झालेली आहे; इतकेच नव्हे, तर ह्यापैकी बहुतेक देशातून सात आठ वर्षांचे प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीने देण्याची व्यवस्था झालेली आहे. ह्याच्या उलट मागासलेल्या देशात प्राथमिक शिक्षणाचा प्रसार झालेला नाही व साक्षरतेचे प्रमाण ह्या देशामध्ये फारच कमी आहे. त्यामुळे या देशांतील प्रौढांच्या शिक्षणाच्या कार्यक्रमात साक्षरता प्रसाराला एक महत्त्वाचे स्थान आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे वाहतुकीची सोय. पुढारलेल्या भागात रस्ते चांगले आहेत, त्यामुळे वाहतुकीची सोय चांगली आहे; त्यामुळे ज्ञानाची साधने खेडोपाडी पोहोचविणे सोयीचे होते. बोलपट, मूकपट घेऊन मोटारगाड्या देशांच्या कानाकोपऱ्यातून हिंडून प्रौढाना शिक्षण देऊ शकतात. त्याना वाचता येतील अशी पुस्तके त्यांच्या दारात पोहोचविण्याची सोय केली जाते. दळणवळणाची साधने आपल्यासारख्या देशातून फार कमी असल्यामुळे शहरातील ज्ञानाचा ओघ खेड्याकडे जाऊ शकत नाही.

तिसरी गोष्ट म्हणजे मागासलेल्या लोकांची आर्थिक परिस्थिति. पोटात रोटी पडली तर बाकीच्या गोष्टी. मागासलेल्या देशात दारिद्य खूप आहे. वेळी लोकाना खायला मिळत नाही. जीवनकलह तीव्र झाला आहे. दोन घास मिळविण्याच्या सारख्या विवंचनेत सापडलेल्या लोकाना शिक्षणाचा विचार करायला वेळ नाही; शिक्षण घेण्याला लागणारी जी मनाची अनुकूल परिस्थिति ती त्यांच्याजवळ नाही; बेकारी व उपासमार ह्या दोन शत्रूशी त्याना नित्य झगडावे लागते. ह्यामुळे त्याना शिकविण्याचा प्रश्न बिकट झाला आहे.

याच्या उलट परिस्थिति पुढारलेल्या राष्ट्रांत आहे. किमान वेतन मिळण्याची सोय आहे; बेकारीचा भत्ता आहे; मुलांच्या शिक्षणाची सोय चांगली झालेली आहे. आजारीपणात मदत मिळण्याची व्यवस्था झालेली आहे; इत्यादि सर्व परिस्थिति अनुकूल असल्यामुळे ह्या देशातील प्रौढाना शिक्षण देण्याचा प्रश्न खूपच सोपा झाला आहे.

आणखी एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. पुढारलेल्या प्रत्येक देशाची लोकसंख्या मर्यादित आहे, तर मागासलेल्या देशात लोकसंख्या खूप मोठी आहे. एवढ्या संख्येच्या लोकाना एवढ्या गोष्टी शिकविणे फार कठीण व खर्चाचे काम आहे.

ह्या सर्व गोष्टींचा विचार ह्या सेमिनारमध्ये केला जात आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. मागासलेल्या देशातील पुढारी आपल्या अडचणी स्पष्टपणे मांडीत आहेत. परंतु त्यांच्या बोलण्यात रडवेपणा, लाचारी किंवा निराशावाद दिसत नाही, ही गोष्ट विशेष लक्षात ठेवण्यासारखी आहे. ही परिस्थिति आहे खरी, ती बदलण्याची हिंमत व आत्मविश्वास आमच्याजवळ आहे, असेच ते सांगत असल्यासारखे वाटतात. ह्या परिस्थितीची आम्हाला लाज वाटत नाही, कारण साम्राज्यवादाला बळी पडलेल्या देशाना हा वारसा घेऊनच कामाला लागावे लागते, असेच प्रत्येकाच्या मनाला पटल्यासारखे, त्यांची भाषणे ऐकताना दिसून येते. दुसरी एक महत्त्वाची गोष्ट सर्वजण वेळोवेळी पुढे मांडीत आहेत; आम्हाला नुसती तात्त्विक चर्चा नको. प्रत्यक्ष व्यवहारात उतरविता येतील असेच निर्णय आपण घेऊ या. प्रतिनिधींची ही तळमळ पाहिल्यावर ह्या परिषदेपासून कांही तरी भरीव हाती पडेल अशी आशा बाळगायला हरकत वाटत नाही.

[१३]

# डेन्मार्कमधील प्रौढशिक्षण

लेखकः—श्री. व्ही. बी. कर्णिक

डेन्मार्कमधून पाठविलेल्या पत्रातून तेथील प्रौढशिक्षणाच्या चळवळीची तोंडओळख करून देण्यात आली. प्रौढशिक्षणाचा प्रश्न पुढारलेल्या देशामध्ये किती महत्त्वाचा मानला जातो व तो कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जनता व सरकार एकत्र येऊन कसे संघटित प्रयत्न करतात, ह्याची पूर्ण कल्पना या लेखात दिली आहे.

इंग्लंड व अमेरिका ह्या देशामध्ये प्रौढशिक्षणाचा अर्थ १८ वर्षांवरील लोकांचे शिक्षण असा केला जातो. परंतु डेन्मार्कमधील प्रौढशिक्षणाच्या कक्षेत, १८ वर्षांवरील लोक जसे येतात; तसेच १४ते१८वर्षांची तरुण मुले पण येतात. ७ते१४ वयाच्या मुलासाठी तेथे सक्तीचे प्राथमिक शिक्षण आहे. बरीचशी मुले १४ वर्षांनंतर शाळा सोडतात. ती गिरण्या कारखान्यातून कामाला राहतात, किंवा उमेदवार म्हणून एकाद्या शेतकऱ्याकडे

कामाला राहतात; तेथे शेतीचे प्रत्यक्ष शिक्षण घेतात. १४ व्या वर्षापर्यंत, केवळ सातच वर्षांचे जे शिक्षण त्याना मिळते तेवढे शिक्षण, लोकशाही प्रधान देशातील नागरिकाला पुरेसे नाही. लोकशाही जर यशस्वी व्हायची असेल तर नागरिकांची शैक्षणिक पातळी खूपच चांगली असली पाहिजे, असे येथे मानण्यात येते; व म्हणूनच १४ व्या वर्षी मुलांचे शिक्षण थांबविले जात नाही; तर त्याला पुढील शिक्षण देण्याची तरतूद केली जाते. डेन्मार्कमधील प्रौढ शिक्षणाच्या कक्षेत १४ ते १८ वयाच्या मुलांचा पण समावेश केला जातो.

डेन्मार्कमध्ये प्रौढाना शिक्षण देण्याचा हेतु त्याना एकाद्या परीक्षेसाठी तयार करणे हा नसतो. इतकेच नव्हे तर डेन्मार्कमधील लोकशाळातून अथवा रात्रीच्या प्रौढांच्या वर्गातून सुद्धा परीक्षेला मुळीच स्थान नाही. प्रौढाना शिक्षण देण्याचा मुख्य हेतु म्हणजे त्याना चांगले समृद्ध जीवन जगता येईल अशी त्यांची तयारी करणे. परीक्षासाठी शिक्षण नसून जीवनासाठी शिक्षण, हे त्यांच्या प्रौढशिक्षण चळवळीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या देशातील प्रौढ शिकायला तयार नसतात. त्याना खेचून वर्गात आणावे लागते. हे ज्यावेळी शक्य होत नाही, त्यावेळी कार्यकर्ते हताश होतात व मग प्रौढावर शिकण्याबाबत कायद्याने सक्ती करावी, अशी मागणी करतात, ह्याच्या उलट परिस्थिति डेन्मार्कमध्ये आहे. तेथील जनता जागी झालेली असल्यामुळे तेथील प्रौढ स्वतःच्या खुषीने प्रौढांच्या वर्गात दाखल होतात; इतकेच नव्हे तर पदरचे पैसे खर्चून फी भरून लोकशाळामध्ये जाऊन शिक्षण घेतात. तेथील चळवळीचे हे पण एक वैशिष्ट्य आहे.

डेन्मार्कमधील लोकशिक्षणाचे काम सरकारी यंत्रणेमार्फत होत नाही. लोकशाळा ह्या लोकानी, खाजगी शिक्षकानी चालविलेल्या असतात.

# [१३]

# डेन्मार्कमधील प्रौढशिक्षण

लेखकः—श्री. व्ही. बी. कर्णिक

डेन्मार्कमधून पाठविलेल्या पत्रातून तेथील प्रौढशिक्षणाच्या चळवळीची तोंडओळख करून देण्यात आली. प्रौढशिक्षणाचा प्रश्न पुढारलेल्या देशामध्ये किती महत्त्वाचा मानला जातो व तो कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जनता व सरकार एकत्र येऊन कसे संघटित प्रयत्न करतात, ह्याची पूर्ण कल्पना या लेखात दिली आहे.

इंग्लंड व अमेरिका ह्या देशामध्ये प्रौढशिक्षणाचा अर्थ १८ वर्षावरील लोकांचे शिक्षण असा केला जातो. परंतु डेन्मार्कमधील प्रौढशिक्षणाच्या कक्षेत, १८ वर्षावरील लोक जसे येतात; तसेच १४ते१८वर्षांची तरुण मुले पण येतात. ७ते१४ वयाच्या मुलासाठी तेथे सक्तीचे प्राथमिक शिक्षण आहे. बरीचशी मुले १४ वर्षानंतर शाळा सोडतात. ती गिरण्या कारखान्यातून कामाला राहतात, किंवा उमेदवार म्हणून एकाद्या शेतकऱ्याकडे

कामाला राहतात; तेथे शेतीचे प्रत्यक्ष शिक्षण घेतात. १४ व्या वर्षापर्यंत, केवळ सातच वर्षांचे जे शिक्षण त्याना मिळते तेवढे शिक्षण, लोकशाही प्रधान देशातील नागरिकाला पुरेसे नाही. लोकशाही जर यशस्वी व्हायची असेल तर नागरिकांची शैक्षणिक पातळी खूपच चांगली असली पाहिजे, असे येथे मानण्यात येते; व म्हणूनच १४ व्या वर्षी मुलांचे शिक्षण थांबविले जात नाही; तर त्याला पुढील शिक्षण देण्याची तरतूद केली जाते. डेन्मार्कमधील प्रौढ शिक्षणाच्या कक्षेत १४ ते १८ वयाच्या मुलांचा पण समावेश केला जातो.

डेन्मार्कमध्ये प्रौढाना शिक्षण देण्याचा हेतु त्याना एकाद्या परीक्षेसाठी तयार करणे हा नसतो. इतकेच नव्हे तर डेन्मार्कमधील लोकशाळातून अथवा रात्रीच्या प्रौढांच्या वर्गातून सुद्धा परीक्षेला मुळीच स्थान नाही. प्रौढाना शिक्षण देण्याचा मुख्य हेतु म्हणजे त्याना चांगले समृद्ध जीवन जगता येईल अशी त्यांची तयारी करणे. परीक्षासाठी शिक्षण नसून जीवनासाठी शिक्षण, हे त्यांच्या प्रौढशिक्षण चळवळीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या देशातील प्रौढ शिकायला तयार नसतात. त्याना खेचून वर्गात आणावे लागते. हे ज्यावेळी शक्य होत नाही, त्यावेळी कार्यकर्ते हताश होतात व मग प्रौढावर शिकण्या-बाबत कायद्याने सक्ती करावी, अशी मागणी करतात, ह्याच्या उलट परिस्थिति डेन्मार्कमध्ये आहे. तेथील जनता जागी झालेली असल्यामुळे तेथील प्रौढ स्वतःच्या खुषीने प्रौढांच्या वर्गात दाखल होतात; इतकेच नव्हे तर पदरचे पैसे खर्चून फी भरून लोकशाळामध्ये जाऊन शिक्षण घेतात. तेथील चळवळीचे हे पण एक वैशिष्ट्य आहे.

डेन्मार्कमधील लोकशिक्षणाचे काम सरकारी यंत्रणेमार्फत होत नाही. लोकशाळा ह्या लोकानी, खाजगी शिक्षकानी चालविलेल्या असतात.

प्रौढांचे रात्रीचे अथवा सायंकाळचे वर्गपण खाजगी व्यक्ति ( शिक्षक ) चालवितात. सरकार फक्त आर्थिक मदत देण्याचे काम करते.

परदेशातील लोकानी डेन्मार्कमधील लोकशाळा विषयी खूप ऐकलेले आहे. त्यांचा समज असा झालेला आढळतो कीं, डेन्मार्कमधील प्रौढ-शिक्षणाची चळवळ तेथील लोकशाळा पुरतीच मर्यादित झालेली आहे. हा सर्वस्वी गैरसमज आहे. डेन्मार्कमध्ये लोकशाळाव्यतिरिक्त कितीतरी निराळ्या संस्था व संघटना आहेत. त्यांच्यामार्फत तेथील प्रौढशिक्षणाचा कार्यक्रम हाताळला जातो; परंतु गेल्या शंभर वर्षात डेन्मार्कला समृद्ध करण्याच्या कामी व तेथील लोकशाही स्थिर करण्याच्या कामी, तेथील लोकशाळानी ध्यानात ठेवण्यासारखे अत्यंत महत्त्वाचे कार्य केले आहे.

प्रारंभी ह्या लोकशाळा यशस्वी करण्याच्या कामी शेतकरी वर्गाची खूप मदत झाली, परंतु आज लोकशाळेच्या चळवळीला शहरी कामगारांचा पण पाठिंबा मिळालेला आढळतो. डेन्मार्कमधील लोकशाहीचा इतिहास व तेथील लोकशाळाचा इतिहास एकाच वेळी लिहिला जात होता. ग्रुंड्ट्विग नेहमी म्हणत असे कीं, लोकशाळांची चळवळ जर यशस्वी झाली तरच डेन्मार्कमध्ये लोकशाही यशस्वी होईल. ह्याचा अर्थ असा कीं, लोक जोपर्यंत शहाणे नाहीत तोपर्यंत लोकशाही स्थिर होत नाही.

आज डेन्मार्कमध्ये प्रौढ शिक्षण चळवळीची दोन अंगे दृष्टीस पडतात. एक 'लोकशाळा' Folk High Schools. व दुसरे 'सायंशाळा' Evening Schools सायंशाळा ह्या लोकशाळापेक्षा जुन्या आहेत. १८१४ साली डेन्मार्कमध्ये सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा जारी झाला. त्याच वेळी तेथील शिक्षकाना सांगण्यात आले होते कीं, जे विद्यार्थी तुमच्या शाळातून शिकून बाहेर जातील, त्यांच्याशी तुम्ही

चांगले संबंध ठेवा व त्याना मिळालेले शिक्षण फुकट जाणार नाही, ह्याची काळजी घ्या. डेन्मार्कमधील सायंशाळांचा जन्म ह्याच काळात झाला; म्हणजे गेली १४० वर्षे तेथे सायंशाळा चालू आहेत. गेली १४० वर्षे तेथे प्रौढशिक्षणाचा कार्यक्रम किती पद्धतशीरपणे हाताळला जात आहे ह्याची ह्यावरून वाचकाना कल्पना येईल. लोकशाहीचा जन्म मात्र तीस वर्षांनी झाला. ग्रुंड्ट्विगच्या कल्पनेप्रमाणे पहिली लोकशाळा १८४४ साली सॉडिंग नावाच्या गावी स्थापन करण्यात आली. लोकशाळा व सायंशाळा ह्या दोन्ही संस्था जरी प्रौढशिक्षणाचे काम करीत असल्या तरी त्या दोघांच्या कार्यपद्धतीत त्यांच्या अभ्यासक्रमात वगैरे फार अंतर आहे. असे जरी असले तरी त्या दोन्ही संस्था एकमेकाना पूरक म्हणूनच कार्य करीत आल्या आहेत.

१८१४ साली डेन्मार्कमध्ये सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा जारी करण्यात आला. ह्या कायद्याप्रमाणे त्या देशातील प्रत्येक नागरिकाला ७ वर्षांचे प्राथमिक शिक्षण मिळण्याची सोय झाली. ह्या कायद्यामध्ये शिक्षकाना असा सल्ला देण्यात आला होता कीं, त्यानी आपल्या शाळेतील माजी विद्यार्थ्यांशी चांगला संबंध ठेवावा व त्यांचे थांबलेले शिक्षण पुढे चालू ठेवण्यासाठी रात्रीच्या शाळा उघडून त्याना अधिक शिक्षण देण्याची व्यवस्था करावी. ही सूचना जरी १८१४ साली शिक्षकाना करण्यात आली होती व जरी त्याप्रमाणे शिक्षकानी प्रौढासाठी रात्रीच्या शाळा चालवावयाला सुरवात केली तरी ह्या चळवळीला खरा जोर यायला कांही वर्षे जावी लागली. ग्रुंड्ट्विग व क्रिश्चन कोल्ड ह्यानी लोकशाळांची (Folk High Schools) चळवळ जशी जोरानें चालवायला केली तशी सायंशाळाची ( Evening Schools ) चळवळ पण जोरावत चालली. आश्चर्याची व समाधानाची गोष्ट ही कीं, डेन्मार्कमधील प्रौढ शिक्षणाची व सायंशाळांची सर्व चळवळ तेथील प्रौढांच्या प्रयत्नाने

वाढीला लागली. आमच्याकडे प्रौढ वर्गाला येत नाहीत म्हणून त्यांच्या-वर सक्ती केली पाहिजे अशी भाषा कार्यकर्ते बोलतात; तर डेन्मार्क-मध्ये ' आम्हाला अधिक शिक्षण द्या; ' अशी हाकाटी करणारे प्रौढ होते व आहेत. त्यानी नुसती ओरडच केली नाही तर ह्या चळवळीला जेवढी मदत लागेल तेवढी मदत त्यानी दिली व त्यांच्याच प्रयत्नामुळे तेथील चळवळ फोफावली.

डेन्मार्कच्या प्रौढ शिक्षण चळवळीचे आणखी एक ध्यानात ठेवण्या-सारखे वैशिष्टय आहे. तेथील प्रौढ शिक्षणाच्या चळवळीचे सर्व यश तेथील शिक्षकांच्या–प्राथमिक शिक्षकांच्या–प्रयत्नाना देण्यात येते. प्रारंभीची कित्येक वर्षे हे काम करण्यासाठी तेथील शिक्षकानी प्रय-त्नांची पराकाष्ठा केली. खूप स्वार्थत्याग केला. प्रारंभीच्या काळात हे काम करण्यासाठी त्याना कोणी एक पैसा पण दिला नाही. ह्यावेळी तेथील शिक्षकांचा पगार पण अपुरा होता; परंतु देशप्रेमाने भारावलेल्या शिक्षकानी हे काम हसत केले. त्यांच्या ह्या सेवेचे कौतुक आज सुद्धा डेन्मार्कची जनता मोठ्या कृतज्ञेने करीत असताना आढळते. स्वतंत्र देशाचा शिक्षक हा असा असावा लागतो. १९ व्या शतकाच्या शेवटी डेन्मार्कमध्ये, २००० खेड्यासाठी सुमारे ८०० रात्रीच्या शाळा होत्या.

१९३० साली डेन्मार्कमधील रात्रीच्या शाळाचे काम व्यवस्थित चालविण्यासाठी एक खास कायदा करण्यात आला. ह्यानंतर तेथील रात्रीच्या वर्गाची लोकप्रियता सारखी वाढू लागली. खालील आकड्या-वरून ह्या गोष्टीची सत्यता पटेल.

| वर्ष | वर्गातील प्रौढांची संख्या |
| --- | --- |
| १९३० | २५००० |
| १९४२ | १९५००० |
| १९४५ | १४५००० |
| १९५२ | ३०४००० |

१९३० साली पास झालेल्या ह्या रात्रीच्या शाळेच्या कायद्यात १९४८ साली व १९५४ साली पुन्हा सुधारणा करण्यात आली. डेन्मार्कमधील ह्या कायद्याला ' रात्रीच्या शाळांचा कायदा ' Evening Schools Act ह्या नावाने ओळखण्यात येते. आपल्या देशात प्राथमिक शिक्षणाचा कायदा जारी झालेला ठिकठिकाणी दिसून येतो, परंतु ८५ टक्के निरक्षर लोकांच्या शिक्षणाचा प्रश्न सोडविण्यासाठी कायदा आपण अद्यापि केलेला नाही. ह्या कायद्याप्रमाणे तेथील सायंशाळांचे काम चालविले जाते. ह्या कायद्याबद्दल सविस्तर माहिती पुढील लेखातून देऊ.

डेन्मार्कमध्ये प्रौढ शिक्षणाची चळवळ जी जोराने चालली आहे ह्याचे मुख्य कारण असे आहे कीं, तेथील सर्व जाणत्या लोकाना हे पटले आहे कीं, जर आपल्या देशातील लोकशाहीचा कारभार यशस्वीपणे चालावयाचा असेल, तर देशातील लोक शहाणे झाले पाहिजेत. लोकशाही कारभारात सर्वसाधारण प्रौढाना जे महत्त्वाचे स्थान प्राप्त होते त्याची दखल घेऊन त्या प्रौढाला त्याच्यावर पडलेली जबाबदारी, चांगल्या प्रकारे पार पाडण्यासाठी त्याला चांगले शिक्षण देऊन तयार केले पाहिजे. ही गोष्ट डेन्मार्कमधील जनतेला विशेषतः तेथील पुढाऱ्याना पटली व म्हणून त्यानी हिरीरीने त्या चळवळीत भाग घेतला व घेत आहेत. आमच्या देशातील जाणती मंडळी अद्याप ह्या प्रश्नाकडे वळलेली दिसत नाहीत. शिकलेल्या लोकानी ही चळवळ उचलून धरायला पाहिजे.

———

[१४]

# स्वीडनमधील लोकशिक्षण

लोकशिक्षणाचे काम ज्याप्रमाणे आपल्या देशात चालू आहे त्याचप्रमाणे ते परदेशात पण चालू आहे. आपल्या देशात निरक्षरतेचे प्रमाण फार असल्यामुळे आपल्या देशात लोकशिक्षणाच्या कामाला साक्षरता प्रसारापासून आरंभ करावा लागतो. पण ज्या देशांत साक्षरतेचे प्रमाण खूपच चांगले आहे त्या देशातसुद्धा लोकशिक्षणाचा कार्यक्रम हाती घेणे जरुरीचे वाटू लागले आहे. इंग्लंडसारख्या पुढारलेल्या देशातसुद्धा Educate your Master (आपल्या धन्याला शिकवा) ही मोहीम हाती घ्यावी लागत आहे. तेथील विचारवंत पुढाऱ्यांचे म्हणणे असे आहे कीं, केवळ ७ च वर्षांचे अपुरे शिक्षण घेऊन बाहेर पडलेले हे मतदार, लोकशाहीचा कारभार नीटपणे चालवू शकणार नाहीत. लोकशाही जर यशस्वी व्हावयाची असेल तर मतदारांची बौद्धिक व वैचारिक पातळी उंचावणे जरुरीचे आहे. ह्या हेतूने परदेशातसुद्धा आज लोकशिक्षणाच्या किंवा प्रौढांच्या शिक्षणाच्या प्रश्नाला फार मह-

त्वाचे स्थान मिळाले आहे व जगातील मोठमोठे देश प्रौढशिक्षणाचा कार्यक्रम आपआपल्यापरी हाताळीत आहेत. स्वीडनमध्ये ह्या बाबतीत कसे प्रयत्न केले जातात त्यांची अगदी थोडक्यात कल्पना देण्याचा प्रयत्न केला आहे.

इतर पुष्कळशा देशामध्ये प्रौढशिक्षणाच्या कार्यक्रमाला प्रारंभ करण्याचा मान तेथील धार्मिक संस्थानी मिळविला आहे. लोकाना धार्मिक शिक्षण देण्यासाठी त्याना बायबलच्या अभ्यासाला मदत करण्यासाठी पुष्कळशा ठिकाणी ह्या मिशनरी संस्थानी प्रौढांचे वर्ग चालविले. एथूनच बऱ्याचशा देशातील प्रौढशिक्षणाच्या कार्यक्रमाला सुरुवात होत होती. परंतु स्वीडनमधील प्रौढशिक्षणाचा इतिहास जरा वेगळा आहे. ह्या देशातील प्रौढशिक्षणाच्या कार्यक्रमाला प्रारंभ लोकानी केला आणि लोकानी व लोकांच्या संघटनानी त्याला योग्य वळण देण्याचा प्रयत्न केला.

१९०२ साली स्वीडनमध्ये ' इंटर नॅशनल ऑर्डर ऑफ गर्ड टेंपल ' ह्या संस्थेमार्फत त्याचप्रमाणे मजुरांच्या संघटनेमार्फत कांही अभ्यासवर्ग काढण्यात आले. हा त्यांचा उपक्रम पाहून इतर संस्थानीसुद्धा ह्या क्षेत्रात पदार्पण करण्यास प्रारंभ केला. शेतकऱ्यांच्या संघटना, मिशनरी संस्था व कांही राजकीय संस्थानी पण हे काम करायचे ठरवून त्या संस्था कामाला लागल्या. लोकशिक्षणाच्या कामाला स्वीडनमध्ये ह्या प्रमाणे प्रारंभ झाला. वेगवेगळ्या प्रकारच्या संस्थानी व संघटनानी हे काम आपल्या हाती घेतल्यामुळे, नागरिकांचा संबंध ज्या ज्या संस्थाशी होता त्या त्या संस्थानी सुरू केलेल्या अभ्यास मंडळात जाऊन ते शिक्षण घेऊ लागले. धंद्याच्या निमित्ताने अथवा राजकीय कारणामुळे लोकांचा ह्या ना त्या संस्थाशी संबंध येत होताच व जेथे जेथे लोक अशाप्रकारे एकत्र येत होते, तेथे तेथे त्या त्या संस्थानी त्यांच्या पुढील शिक्षणाची सोय केली. अशा प्रकारे स्वीडनच्या लोकशिक्षण कार्यक्रमाचा उठाव लोकांच्या संघटनामार्फत झाला.

स्वीडनमध्ये हे प्रौढशिक्षणाचे काम तीन प्रकारे करण्यात आले. त्यानी ठिकठिकाणी वाचनालये काढली. निरनिराळ्या विषयावर व्याख्याने घडवून आणली व अभ्यासमंडळे स्थापन केली. १९४४ साली स्वीडनमध्ये १५२४ नगरपालिकामार्फत चाललेली वाचनालये होती. ह्या वाचनालयात ५,५०,००० पुस्तके होती व ही सर्व पुस्तके लोकाकडून नीटपणे वाचली जात होती. ह्याखेरीज १९४५ साली निरनिराळ्या संस्थामार्फत चालविलेली ४९१८ वाचनालये चालू होती व ह्या वाचनालयात २० लाख पुस्तके होती.

त्यानंतर प्रौढशिक्षण देण्याचे दुसरे साधन म्हणजे व्याख्यानमाला. ह्या व्याख्यानमाला दोन स्वरूपाच्या चालू असत. इतिहास, अर्थशास्त्र, राजकारण इत्यादि लोकोपयोगी शास्त्रीय विषयावर एक एक व्याख्यान घडवून आणण्यात येत असे; अथवा एकादा विशिष्ट विषय निवडून त्या विषयावर एक व्याख्यानमालाच गुंफण्यात येई व अशा मालेतून ह्या विषयावर पाच सहा व्याख्याने दिली जात. १९४५ साली, ५८९ संस्थानी अशी व्याख्याने घडवून आणली व त्यानी एका विषयावर एक ह्या प्रमाणे ५९३१ व्याख्याने करविली व ५५४ व्याख्यानमाला गुंफल्या. लोकशिक्षणाचा अर्थ, लोकाना बहुश्रुत करणे हा असल्यामुळे त्या दृष्टीने हे व्याख्यानाचे कार्यक्रम घडवून आणले जातात.

ह्याखेरीज त्या देशात ‘ जनता विद्यालये ’ ह्या नावाच्या प्रौढशिक्षण देणाऱ्या संस्था चालविण्याची पद्धति आहे. ह्या विद्यालयातून प्रौढ स्त्री-पुरुषाना शिक्षण देण्यासाठी ४ ते ५ आठवड्यांचे वर्ग चालविण्यात येतात. हिवाळ्यातील वर्गाना स्त्री व पुरुष ह्या दोघाना घेतले जाते; पण उन्हाळी वर्ग फक्त बायकाकरिताच असतात. ह्या वर्गाना सरकारी मदत मिळते. हे वर्ग चालविण्यात मुख्य उद्देश खेडोपाडी पसरलेल्या ज्या लोकाना माध्यमिक शाळामध्ये जाऊन शिक्षण घेण्याचा योग आला

नाही त्याना गेलेली संधि पुनः मिळवून देऊन, आपले शिक्षण वाढविण्याचा पुनः एक मोका त्याना मिळवून देणे हा आहे. सांपत्तिक परिस्थितीमुळे अथवा इतर कांही कारणामुळे जर एकाद्याचे शिक्षण थांबले असेल तर त्याला शिक्षण घेण्याची संधि देणे हा, ही योजना आखण्यात हेतु आहे. अशा तऱ्हेची सरकारच्या मदतीने चालणारी जवळजवळ ७० विद्यालये ह्या छोट्याशा देशात आहेत.

ह्याशिवाय वर सांगितल्याप्रमाणे अभ्यासमंडळामार्फत हे काम केले जाते. कमीत कमी पाच व जास्तीत जास्त तीस पुरुष अथवा स्त्रिया एके ठिकाणी येऊन एक अभ्यासमंडळ चालवितात. ही मंडळी एखादा विशिष्ट विषय अभ्यासासाठी किंवा चर्चेसाठी घेतात. कांही लोक स्वतःच एखादा विषय निवडून त्याचा अभ्यास करतात; आपल्या अभ्यासाची योजना पण तेच आखतात; तर कांही एखाद्या मार्गदर्शकाच्या नेतृत्वाखाली आपले काम करतात. त्यांच्या अभ्यासाची योजना पण त्यांच्याकरिता एकाद्या संस्थेने आखून तयार केलेली असते. १९४५ साली स्वीडनमध्यें अशा प्रकारची २५३४० अभ्यास मंडळे चालू होती व त्यामधून ३०८५५९ लोक दाखल झाले होते आणि ते आपले शिक्षण ह्या मंडळामार्फत वाढविण्याचा प्रयत्न करीत होते.

ह्याखेरीज टपालामार्फत सुद्धा प्रौढाना शिक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात येतो. प्रतिवर्षी जवळजवळ तीन लाख लोक अशा प्रकारे ( Correspondence School ) टपालामार्फत शिक्षण घेतात. स्वीडन मधील आकाशवाणीमार्फत पण प्रौढ शिक्षणाचे काम केले जाते. अशा आकाशवाणीमार्फत शिक्षण घेणाऱ्या लोकांच्यासाठी मार्गदर्शिका छापून त्या विकल्या जातात. १९४६ साली इंग्रजी व रशियन भाषेत छापलेल्या अशा प्रकारच्या ७०००० मार्गदर्शिका विकल्या गेल्या.

स्वीडनमधील प्रौढ शिक्षण चळवळीचा व तेथील विश्वविद्यालयाचा संबंध नाही; परंतु जे कार्य विश्वविद्यालय करू शकले असते ते जनता विद्यालयामार्फत केले जाते. सरकार प्रौढ शिक्षणाच्या खर्चापैकी जवळ जवळ निम्मा खर्च करते. स्वीडनमधील प्रौढ शिक्षणाला अधिक व्यापक स्वरूप देऊन नॉर्वे व डेन्मार्क ह्या दोन देशांचे सहकार्य घेऊन आपला प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम अधिक प्रभावी बनविण्याची येथील लोकांची मनीषा आहे. स्वीडनसारख्या पुढारलेल्या देशाला प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम हाती घेण्याची गरज भासते.

[१५]

# युगोस्लाव्हिया

संग्राहक—श्री. शं. ल. थोरात

[ राष्ट्रसेवा दलाच्या प्रमुख कार्यकर्त्या श्री. अनुताई लिमये आहेत. त्या गतसाली युगोस्लाव्हिया देशाला गेल्या होत्या. शहराप्रमाणेच त्या देशातील खेडीही त्यानी पाहिली. तेथील मागासलेल्या डोंगराळ भागातील लाझरा-पल्ली हे एक खेडे आहे. दुसऱ्या महायुद्धाचे वणव्यात हे खेडे ओस पडले होते. पण पुढे युगोस्लाव्हिया देश स्वतंत्र झाल्यावर सर्व खेडूत पुनः आपल्या खेड्यात परत आले. त्यानी त्या खेड्याची सहकारी पद्धतीने कशी सुधारणा केली हे "साधना" साप्ताहिकात श्री. अनुताई यानी एका लेखात दिले आहे. त्या लेखातून खालील माहिती दिली आहे. हेतु हा की, नवभारताची उभारणी करताना सहकारी पद्धतीचे त्यांचे अनुभव आपल्या उपयोगी पडावेत.]

युगोस्लाव्हियात मॅसिडोनिया या नावाचे एक लहान राज्य आहे. त्या राज्याची राजधानी स्कोपलेग शहर आहे. त्या शहरापासून

१००।१२५ मैलावर डोंगराळ भागांत लाझरापल्ली हे एक खेडे आहे. सहकारी जीवनावर आधारलेले नमुनेदार खेडे म्हणून त्याला ओळखतात. या खेड्यास जाताना डोंगरातून वळणावर गिरक्या घेत मोटार जाते. एका बाजूला उंच डोंगर व दुसरीकडे खोल दरी असलेल्या अरुंद वाटेने गेल्यावर लाझरापल्ली हे खेडे लागते. त्या खेड्यातील तब्रेलेवजा हॉटेलात आम्ही जरा थांबलो. दारू आणि मटणाच्या पदार्थांची रेलचेल होती. तेथे आम्ही फक्त सोडा घेतला. ग्रामपंचायतीच्या कचेरीत गावच्या प्रमुख मंडळींशीं ओळख झाली. अंधार झाल्याने गाव पहाणीचे काम दुसऱ्या दिवशी करावयाचे ठरले.

आमची संध्याकाळची जेवणाची व झोपण्याची व्यवस्था ग्रामपंचायतीच्या प्रमुखाकडेच केली होती. तेवढ्या अवधीत खेड्याचे थोडेसे निरीक्षण करता आले. आमच्याकडील खेडेगावासारखीच विरळ वस्ती होती. रस्ते बांधीव नव्हते. पावसाने सर्वत्र चिखल झाला होता. ड्रेनेजची व्यवस्था झालेली नव्हती. सांस्कृतिक प्रगतीही विशेष नव्हती. लोक खेडवळ वाटत होते. पण हिंदुस्थानच्या खेड्याशी तुलना करता इतर कांही गोष्टी तितक्याच उठावदारपणें दिसत होत्या. शहरापासून १००-१२५ मैल लांब इतक्या डोंगरात वसलेल्या या खेड्यात सर्वत्र वीज आलेली होती. शेतकऱ्याच्या घरातून रेडिओ दिसत होते. घरेही पुष्कळच आधुनिक पद्धतीची होती.

लाझरापल्लीची वस्ती ११०० आहे. त्यात ५०० लोक काम करण्याच्या कुवतीचे आहेत. ते सर्व काम करतात. गावात १००० मेंढ्या व २५५ इतर गुरे आहेत. शेतीबरोबर गावात शिवाय ५० पोट उद्योग चालवले जातात. त्यात प्रमुख म्हणजे कापड, गालिचे विणणे; मधमाशा पाळून मध तयार करणे; ससे पाळणे, लोणी, दुधदुभते, फळफळावळ यांची विक्री. सारी आर्थिक उभारणी स्वतंत्र पण सहकारी पायावर

केली आहे. सरकारच्या समाजवादी तत्त्वाना धरून कामगारांच्या वेतनाची व विम्याची योजना केलेली आहे. दिवसाचे काम व नफा पाहूनच पगार ठरवला जातो. स्त्रियाना बाळंतपणाची ३ महिने रजा मिळते. प्रत्येक मुलाच्या जन्माबरोबर आईबापाना भत्ता मिळतो. मुलांच्या संगोपनाकरता जादा कपडे व लोकर दिली जाते. शिवाय आईबापांच्या कामाच्या प्रमाणात जादा भत्ता मिळतो. बालसंगोपन-गृहांची व्यवस्था अद्याप झालेली नाही. १–२ वर्षांत ती होईल. तोपर्यंत लहान मुलांच्या आयाना घरी काम दिले जाते. मुलांच्या शाळेची व व्यायामशाळेची व्यवस्था सहकारी पंचायतीमार्फतच केली असल्याने शिक्षण मोफत मिळते. उच्च, शालेय वा धंद्याच्या शिक्षणा-करता मुलाना बाहेर पाठविले जाते. त्यांचा खर्च पंचायत करते. म्हातारपणाच्या विम्याची व्यवस्थाही केलेली आहे.

गावच्या सामुदायिक श्रमातून झालेल्या निर्मितीतून प्रथम गावच्या गरजा भागवल्या जातात. ठराविक हिस्सा राज्य सरकारला द्यावा लागतो. ग्रामसुधारणेकरिता यातूनच खर्च केला जातो. आज लाझरापल्लीत वाचनालय व सांस्कृतिक कलामंडळ आहे. गावचे लोक लोककलेत मोठे निपुण आहेत. लंडनला भरलेल्या एका जागतिक लोकनृत्याच्या स्पर्धेत त्याना बक्षीस मिळाल्याचे ते मोठ्या अभिमानाने सांगतात. गावात औषधोपचाराचे एक प्राथमिक केंद्र आहे. डॉक्टरीचा अभ्यास करण्याकरिता दोन माणसाना शहरात पाठवलेले आहे.

सहकारी शेतीची सुरुवात झाल्यानंतर सामान्यतः पूर्वीपेक्षा २० ते २५ टक्क्यानी गावचे उत्पन्न वाढल्याचा सर्वसाधारण युगोस्लाव्हियाचा अनुभव आहे. लाझरापल्ली गावची पुनर्रचना सहकारी पायावर झाल्यापासून अवघ्या दोन वर्षांत प्रत्येक शेतकऱ्याजवळ १५००० दिनार [ रुपयासारखे नाणे ] शिल्लक पडले. शिलकेचा साठा प्रमाणाबाहेर वाढू नये म्हणून त्यानी बाहेरून फर्निचर मागवले आहे !

[१६]

# चीन देशातील समाज शिक्षण

लेखकः—श्री. ना. गो. शुक्ल, एम्. एड्.

आपला भारतदेश जसा फार मोठा व फार जुना आहे तसाच चीन देश हाही मोठा व जुना आहे. आजकाल आपल्या देशात समाजातील सर्वांना शिक्षण देण्याबद्दल लोकशिक्षणाचा जसा उठाव झाला आहे, तसाच उठाव चीनमध्येही झाला होता. या उठावाची माहिती करून घेणे मोठे गमतीचे आहे.

कांही दिवसापूर्वी चीनचा उद्धारक जनरल चँग-कै-शेक याने त्या देशातील सर्वात मोठा कार्यकर्ता 'जेमी येन' याला राजधानीत बोलावले. त्या दोघांची सुमारे तीन दिवस बोलणी चालली होती. त्यासंबंधीं चँग-कै-शेकच्या पत्नीने असे उद्‌गार काढले कीं, 'जेमीच्या कार्याचा, तळमळीचा, निष्ठेचा चँग-कै-शेकच्या मनावर इतका परिणाम झाला कीं, त्याना तीनही दिवस रात्री झोप येऊ शकली नाही.'

जेमी म्हणजे चीन देशाची उत्साहमूर्ति. तो एक जिव्हाळ्याने लोकशिक्षणाचे काम करणारा जातिवंत शिक्षक होता. जगातील शिक्षण-क्षेत्रात ज्याचे नाव सोन्याच्या अक्षराने लिहावे असा तो एक महान कार्यकर्ता होता.

त्याचा लहानपणचा काळ मोठ्याशा सुधारक वातावरणात गेला होता असे नाही. बालपणीचे शिक्षण अगदी सनातनी पद्धतीनेच झाले होते. स्वताच्या शेंडीच्या सहा वेण्या घालून व बापाच्या पायाशेजारी बसून तो पाठांतर करीत असे. त्याचे कांही शिक्षण मिशनऱ्यांच्या शाळेत झाले. तेथे तो इंग्रजी, इतिहास, भूगोल, रसायन शास्त्र इत्यादि विषय शिकला.

पुढे त्यास अमेरिका देशात उच्च दर्जाचे शिक्षण घेण्यास जाण्याची संधि मिळाली. तो 'टोल' येथे गेला व तेथेच पदवीधर झाला.

पहिल्या महायुद्धाच्या काळात त्याला पश्चिम आघाडीवर जावे लागले. तेथे अमेरिकेतर्फे दोन लाख मजूर कामावर होते. त्या सर्वांचा तो पुढारी होता. मजुरांची कामे ती काय असणार? कोठे रस्ते तयार करणे, चर खणणे इत्यादि. त्यांचे शिक्षण ते काय झालेले असणार? चिनी मजुरात अज्ञान अगदी पिढीजात असते. कारण चिनी भाषाही लिहिण्यास व वाचण्यास अत्यंत कठीण आहे. अशिक्षित व अडाणी अशा दोन लाख मजुरांचा तो नियंत्रक होता. 'जेमी येन' हा अत्यंत कळकळीने काम करीत असे. त्याच्याकडे अनेक मजूर अनेक कामा-करिता येत असत. त्यांच्या अडचणी जेमी समजून घेत असे व त्यांचे निराकरण तो करीत असे. बहुतेकांची मुख्य अडचण म्हणजे त्याना आलेली पत्रे वाचून दाखविणे व त्यांची पत्रे लिहिणे. जेमीला हे काम करावे लागे. परंतु त्याचेवर या कामाचा बोजा दिवसें दिवस वाढू लागला. अनेकांची पत्रे लिहिणे व वाचणे हे एक त्याचे कामच होऊन बसले

होते. शिवाय रात्रीचे वेळी तो सर्व मजुराना एकत्र बोलावून त्याना वर्तमानपत्रे वाचून दाखवीत असे. कांही महत्त्वाच्या गोष्टी समजून सांगत असे. त्याने जर कामचुकारपणा करावयाचा म्हटले असते, तर त्याला ते शक्य होते. परंतु जेमी हे काम मन लावून व अंतःकरणाच्या कळकळीने करीत असल्यामुळे त्याचे स्वतःचे काम वाढत चालले. एके दिवशी त्याला असे वाटले कीं, आपण हे सर्व काम करण्यापेक्षा हेच काम जर इतराना शिकविले तर अधिक फायदा होईल. इतर मजुरात सुधारणा होईल व स्वतःचे कामही वाचेल. असा विचार करून त्याने सुमारे ४० लोकांची मदत घेऊन त्या मजुरांच्या छावणीत अडाणी मजुराना शिक्षण देण्यास सुरवात केली. अर्थात सर्वच मजूर शिक्षण घेण्यास तयार झाले असे नाही. जे तयार झाले, त्यांच्या शिक्षणास सुरवात झाली. कित्येक मजुरास असे वाटे कीं, आता या वयात इतक्या म्हातारपणी आपणास लिहावयास व वाचावयास कसे येईल? परंतु जेमीच्या कल्पनेस व शिकावयास येणाऱ्या मजुरांच्या प्रयत्नास यश आले. थोड्याच दिवसात अंधारात चाचपडणाऱ्या या मजुराना शिक्षणाचे डोळे आले. त्याना पत्रे लिहिता येऊ लागली. कांही वर्तमानपत्रातील बातम्या ते वाचू लागले. छोटी पुस्तकेही कांहीजण वाचू लागले. वाचलेल्या गोष्टी इतराना सांगू लागले. शिक्षणाचे तेज त्यांचे चेहऱ्यावर दिसू लागले. ज्ञानाचा अमोल खजिना उघडा झाला. नवीन कांहीतरी मिळविल्याचा आनंद त्याना मिळू लागला. देशोदेशी काय चालले आहे हे त्याना कळू लागले. आपल्या चीनची माहिती जर वर्तमानपत्रात आली तर ते अत्यंत आपुलकीने वाचीत असत. अशा रीतीने त्यांच्या संपूर्ण जीवनातच फरक झाल्याप्रमाणे त्याना वाटले. नवसाक्षर झाल्यामुळे त्याना पुनर्जन्म झाला असे वाटले.

या नवसाक्षर मजुरांच्या बदललेल्या जीवनाचा परिणाम इतर

मजुरावर दिसून येऊ लागला. त्या छावणीतील अनेक अडाणी मजुराना असे वाटू लागले कीं आपणही शिकावे. ज्याना शिक्षण घेणे अशक्य वाटत होते तेच लोक आपणास शिक्षण घेता येईल, या कल्पनेने भारले गेले. त्या छावणींचे वातावरण शिक्षणाने भारून गेलें. मजुरांच्या शिक्षणाची तेथे एक प्रचंड लाटच उसळली. सर्व परिस्थितीचा फायदा जेमीने घेण्याचा विचार केला.

जे पूर्वी अडाणी होते परंतु नवसाक्षर झाले, असेच कांही मजूर त्याने हाताशी धरले होतेंच. पूर्वीचे कांही मदतनीस होतेंच. अशा सर्वांनी ती छावणी सुशिक्षित करण्याचा चंग बांधला. त्या सर्वांनी आपआपले काम अत्यंत काळजीपूर्वक व उत्साहाने केले. प्रयत्नाच्या मागे परमेश्वर नेहमीच यश घेऊन उभा असतो.

पुढे जेमी फ्रान्स नावाच्या देशात गेला. त्या देशाची राजधानी पॅरिस येथील विश्वविद्यालयातील विद्यार्थ्यांना आपल्या कार्याची संपूर्ण माहिती त्याने दिली. त्यांच्या मनात ही गोष्ट भरवून दिली कीं, निव्वळ दोन लाख मजुरांच्या छावणीतच हे काम यशस्वी होईल असे नव्हे तर चीनच्या ४० कोटी लोकात सुद्धा लोकशिक्षण यशस्वी होईल. परंतु शाळा कॉलेजात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी आजच्या लोकशिक्षणाचे काम करणे आवश्यक आहे. एका पिढीने आपल्या आयुष्यात लोकशिक्षणाचे काम हेच महत्त्वाचे काम आहे असे समजून काम केले, तरच लोकांची उन्नति होणे शक्य आहे व आपले राष्ट्र वर येण्याची शक्यता आहे. जेमीच्या भाषणाचा परिणाम विद्यार्थ्यांवर झाला. या विद्यार्थ्यांनी इतर समंजस लोकांचे मदतीने सबंध चीनभर शिक्षणाची लाट उसळून दिली. या शिक्षणाच्या लाटेत आंघोळ करून अनेक लोक शिक्षणाने पवित्र झाले.

जे लोक साक्षर झाले त्यांची साक्षरता टिकविण्यासाठी ' चिनी

मजूर ' नावाचे साप्ताहिक त्याने काढले. तसेच साक्षरतेबरोबर राजकीय व सामाजिक शिक्षणही दिले.

चीनमध्ये शिक्षणाची सुरवात प्रथम चँगशा या ठिकाणी झाली. तो एक प्रयोगच होता. मजुरांचे करिता अत्यंत सोपे असे एकच पुस्तक लिहिले होते. सुमारे १४०० लोकापैकी ९४५ लोकानी हे पुस्तक फारच लवकर संपविले. अधिक उत्साहास व नेटास फळ लवकर मिळते. सर्वच चीनभर केंद्रे व उपकेंद्र यांचे जाळे विणले गेले. अनेक वेळी अनेक अडचणी आल्या. पैशाची अडचण तर नेहमीच भासे. एवढे मोठे काम अंगावर घेतल्यामुळे जेमीला फारच त्रास होत असे.

इ. स. १९३८ मध्यें जेमी पुन्हा अमेरिकेस गेला व तेथे अमेरिकन लोकाकडून त्याने बराच पैसा गोळा केला. त्या पैशाचा उपयोग चिनी जनतेकरिता केला. जेमीच्या मनाने ही गोष्ट घेतलीच होती कीं आपला चीन गरीब आहे. आपण पैसा कोठून गोळा करणार ? त्याला जेव्हां अमेरिकेसारख्या श्रीमंत देशात जाण्याची संधी आली, तेंव्हां त्यानें तेथील पैसा गोळा करून देशबांधवांचे उन्नतीकरिता खर्च केला.

कांही दिवसानंतर पेकीन येथे एक शिक्षण परिषद भरली होती. तेथे शिक्षणतज्ज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, शेतकीतज्ज्ञ, अशी चीनमधील विविध खात्यातील मोठी माणसे जमली होती. या सर्वांना जेमीने ' टिंगसेन ' या खेड्यात नेले व सर्वांना शेतकऱ्यांचे व सर्व मजुरांचे जीवन कसे असते ते समजून दिले. कांही दिवस सर्वांना ते उपभोगावयास लावले. या सर्व मोठ्या माणसाना अगदी सामान्य माणसाचे जिणें कांही दिवस जगावे लागले व त्यामुळे त्याना योग्य ती कल्पना आली. या सर्व अनुभवाचा उपयोग तेथील कामाच्या दृष्टीनें अनुकूलच झाला.

जेमी येनने टिंगसन येथील अनुभवासंबंधी असें लिहिले आहे

कीं, निरक्षर शिकविणे सोपे आहे परंतु जे तथाकथित सुशिक्षित आहेत त्याना ग्रामीण जीवनाशी समरस होऊन त्यांच्या उद्धारासाठी कार्य करण्यास प्रवृत्त करणे फारच कठीण आहे.

शेतकऱ्यांच्या शिक्षणाचा विचार करीत असता त्याना जेमीने शेतकीचे, जनावरांच्या पैदाशीचेच शिक्षण दिले. त्याना बाजार, बाजार पेठा व त्यातील व्यवहारी कल्पना दिली. शेतकऱ्यांच्या शिक्षणाचा प्रयोग त्याने ' टिंगसेन ' येथेच केला. तेथील लोक सुशिक्षित झाले व त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या शेतकीवरही झाला. १९३२ मध्ये लोक अडाणी होते. त्यावेळी ४ लाख रुपयांचा कापूस पिकला, तर १९३७ मध्ये लोक सुशिक्षित झाले त्यावेळी ७ लाखांचा कापूस लोकानी पिकविला. चीनवर जपानच्या स्वाऱ्या झाल्या. टिंगसेन भागातही स्वारी झालीच. परंतु टिंगसेन भागात जपानी लोकानी ४७२ खेडी जिंकली, त्यातील फक्त ३८ खेडीच जपानच्या ताब्यात राहिली. बाकीची सर्व सुशिक्षित चिनी खेडुतानी परत घेतली. अशा रितीने शिक्षणाचा परिणाम लोकांचे जीवनावर झालेला सहज आढळून आला.

अमेरिकेत न्यूयॉर्क या शहरी १९४९ च्या मे महिन्यात एक मोठी परिषद भरली होती. जगातील मोठी माणसे तेथे जमली होती. त्या-ठिकाणी चीन देशातील चिनी खेडुताचा उद्धारक जेमी येन याचा मोठा गौरव केला. जगाच्या शिक्षणाचा इतिहास लिहिला जात असता जेमी येनचे नाव प्रामुख्याने लिहिले जाईल. ज्या देशात ' जेमी येन ' सारखी स्वार्थत्यागी, निष्ठावंत, कर्तव्यतत्पर व कार्यकुशल माणसे जन्माला येतात तो देश धन्य होय. आज जेमी येन फिलिपाइन्समध्ये हेच काम नेटाने करीत आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रमांक ९८५५५ वि: निबंध
क्रमांक १०२५ नों: दि: २८/३/५२

[१७]

# चिनी प्रोफेसर शु-शी-लिंग

लेखक—श्री. शं. ल. थोरात

ऑगस्ट १९५१ महिन्याच्या पहिल्या आठवड्यात चिनी प्रो. लिंग हे महाराष्ट्रातील लोकशिक्षणाचे काम पाहण्यासाठी आले होते. प्रो. लिंग यांची थोडीशी माहिती अशी—

प्रो. लिंग हे भारतात येण्यापूर्वी जगातील विशेषतः युरोप खंडातील नार्वे, स्वीडन, इंग्लंड, फ्रान्स, इटली, बेल्जम, स्वित्झर्लंड इत्यादि देशातून समाजशिक्षणाची पाहणी करून आले होते. जवळजवळ १ वर्ष ते प्रवासातच होते. भारतात त्यानी बंगाल, बिहार, मध्यप्रांत, मुंबईप्रांत यात प्रवास केला आणि या देशात चालू असलेल्या लोकशिक्षण कार्याची पाहणी केली. माहितीही मिळविली. इकडील लोकाना चीनमधील लोकशिक्षणाची कल्पना दिली. महाराष्ट्र लोकशिक्षण समितीच्या सभासदाशी समाजशिक्षणावर त्यांची चर्चा झाली, तेव्हां त्यानी सांगितले कीं,

चीनमध्ये शेकडा ४० लोक साक्षर झालेले आहेत. तिकडे साक्षरतेचा प्रसार मुख्यतः धर्म ग्रंथाच्या वाचनासाठी धर्म मंदिरातून, धर्म मठातून फार झपाट्याने झाला. हे खरे असले तरी, चीन देशातील विद्यार्थ्यांनी आणि जनतेने फार मोठ्या प्रमाणात साक्षरता प्रसाराचे कामात भाग घेतला. स्त्रियामध्ये शिक्षणाचा प्रसार तिकडे जास्त झालेला आहे. याचे कारण, समाजशिक्षण आघाडीवर स्त्रियाच प्रामुख्याने कामे करतात; हे विशेष होय. भारताप्रमाणेच चीनचा वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न जसा अवघड झालेला आहे, तसाच आर्थिक प्रश्नही कठीणच आहे. या अडचणी लक्षात घेऊन त्या पैकी वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न समाज-शिक्षणाने सोडविण्याचा त्यांचा यत्न आहे. तथापि सामान्य जनतेत आपल्याप्रमाणेच या प्रश्नाबद्दल उदासीनता आहे.

प्रोफेसर लिंग यांची जीवन कथा अशी आहे. त्यांचा जन्म २२।३।१९०४ रोजी झाला. १९२३ ते २७ पर्यंत त्यानी कॉलेजचा कोर्स घेतला. सन्मानाची बक्षिसे मिळवून ते पदवीधर झाले. त्यानंतर सन्यत्सेन युनिव्हर्सिटीमध्ये संशोधनकार्य केले. पुढे त्यानी असि. प्रोफेसर ऑफ एज्यु. आणि प्रोफेसर ऑफ एज्युकेशन म्हणून निरनिराळ्या विश्वविद्यालयात काम केले. समाजशिक्षणाच्या कार्याची त्याना विशेष आवड दिसते. म्हणून त्यानी प्राध्यापकाचे काम सांभाळून चीन देशा-तील अनेक प्रमुख समाजशिक्षण समित्यावर काम केले. त्यात चीनची राष्ट्रीय समाज शिक्षण संघटना; डोंगरी किंवा वन्य अशा मूळच्या लोकासाठी शिक्षण मंडळ; कॅंबग्टन आणि कांटनची नाटक व सिनेमाची सेन्सारशिप कमेटी या मुख्य होत. तसेच कंतान आणि हॉंगकॉंग येथील १० मिशनरी शिक्षण संस्थांचे ते २ वर्षे प्रमुख होते.

१९४८ साली "शिक्षणाच्या विशाल क्षेत्रात अमोल भर घातली." असा त्यांचा गौरव नांकिन येथे राष्ट्रीय सरकारच्या शिक्षणखात्याने

केला. कारण युद्धानंतर त्यानी कंतान येथे १६,३६९ लोक साक्षर केले, शिवाय उत्तर पुनाय प्रांतात प्रायोगिक ग्रामीण शिक्षण संस्थांची वाढ केली.

१९४७ च्या उन्हाळ्यात, हाँगकाँग येथे भरलेल्या, प्राथमिक शिक्षकांच्या रिफ्रेशर कोर्सच्या डायरेक्टरच्या मानाच्या जागी त्यांची निवड झाली होती.

अशा रीतीने मायदेशात म्हणजे चीनमध्ये त्यानी शिक्षण विषयक भरपूर सेवा केली. विविध अनुभव मिळविला. नंतर ते परदेशात प्रवासाला बाहेर पडले.

लंडनला त्यानी प्रौढशिक्षणाचा विशेष अभ्यास केला आणि फेब्रुवारी १९५० पासून युनेस्कोने त्यांची "मूलभूत शिक्षणाचे" फेलो म्हणून निवड केली आहे.

त्यांनी शिक्षण क्षेत्रात बहुमोल ग्रंथांची भर घातली असून त्यापैकी—

(१) चीनचा साक्षरतेचा प्रश्न. (२) लोकशिक्षणाची सामान्य तत्त्वे. (३) चिनी प्रौढांची जीवन वाचनमाला. (४) समाजशिक्षणावर निवडक निबंध. (५) चीन मधील समाज शिक्षणाची उत्क्रांति. हे प्रमुख ग्रंथ आहेत.

समाज शिक्षण क्षेत्रात व शास्त्रात पारंगत अशा या चिनी पंडिताने स्वतंत्र भारताच्या नव्या उभारणीत चालू असलेले समाजशिक्षण कार्य पाहिले. महाराष्ट्र समाजशिक्षण समितीच्या सन्मान्य सभासदाबरोबर चर्चा केली. त्यामुळे जवळ जवळच्या या दोन देशातील समाजशिक्षणाचा प्रश्न कसा हाताळला जातो याची माहिती दोन्ही देशातील लोकाना झाली. देशाच्या स्वातंत्र्य काळात आता परदेशचे अनेक विद्वान पंडित भारताची शिक्षण विषयक आणि समाजशिक्षणाची प्रगति पाहाण्यास येतील. परदेशीय पंडितासाठी नव्हे, आपल्या भवितव्यासाठी आता आपण आपली शिक्षणविषयक प्रगति वाढविली पाहिजे.

प्रोफेसर शु-शी-लिंग हे येथून जाताना, देशातील बदलत्या राजवटीत आपण हे कार्य कसे चालवावे याचा विचार करीत होते.

[१८]

# नवचीन देशातील लोकशिक्षण

लेखकः—श्री. ना. गो. शुक्ल, एम्. एड्.

१ ऑक्टोबर १९४९ पासून चीनमध्ये लोकसत्ताक राज्य सुरू झाले ही गोष्ट सर्वांना माहीत आहे. या नवीन घटनेने आशियातील अनेक देशावर परिणाम झाला. नवचीन या देशाला कोणता दर्जा द्यावा यासंबंधी जगातील अनेक राष्ट्रात मतभेद निर्माण झाले. इंग्लंड, अमेरिका ही राष्ट्रे नवचीनला मान्यता देण्याचे विरुद्ध होती तर जगात भारतासारखी नवीनच उदयाला आलेली लोकशाही राष्ट्रे, नवचीनला योग्य दर्जा दिला जावा, या मताची होती; परंतु इतर देशानी कांहीही म्हटले तरी नवचीन त्यासाठी अडून बसलेला नव्हता. त्याने सर्व आघाडीवर आपली प्रगति करायला सुरवात केली व शिक्षणाच्या आघाडीवरही चीनने आपली पावले पुढे टाकली आहेत.

नव्या चीनमधील आजचे शिक्षण हे खऱ्या अर्थाने लोकशिक्षण

आहे. कारण लोकांचे भले करणे हेच त्यांचे ध्येय आहे. कारण चीनमधील बहुजन समाजाच्या जुन्या इच्छा, आकांक्षा, समजुती, चालीरीती व जीवन बदलून त्याना नवे शिक्षण देणे हेच त्यांचे साध्य होते. लोकांचे जीवन सुखी, समाधानी व समृद्ध करण्यासाठी त्यानी नवशिक्षणाचे ( Re-education ) काम हाती घेतले. विशेषतः राष्ट्राचे आधारभूत जे किसान कामगार त्यांचे शिक्षण झाल्याशिवाय लोकसत्ता यशस्वी होणार नाही हे त्यानी ओळखले व आपल्या शिक्षणाची योजना आखली.

शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी लोक जागृतीचे काम चीनने प्रथम हाती घेतले. ' आपण शिकले पाहिजे, समजून घेतले पाहिजे ' असे अगदी सामान्य माणसालाहि वाटले पाहिजे, तरच लोकशिक्षण यशस्वी होते. याचा विचार करून नवचीनने लोकाना पुढील पांच गोष्टी शिकविल्या. ( १ ) आपल्या देशावर प्रेम करा. ( २ ) समाजावर प्रेम करा. ( ३ ) कष्ट करणाऱ्याचा व कष्टाचा मान राखा. ( ४ ) शास्त्राची उपासना करा. ( ५ ) सामाजिक संपत्तीचे संरक्षण करा. हे शिक्षण लोकापर्यंत पोहोचावे यासाठी त्यानी निरनिराळ्या मार्गांनी उठाव केला व त्याचा परिणाम म्हणजे आज चीनची पावले पुढे पुढे पडत चालली आहेत.

नवचीन निर्माण करण्यासाठी जे लोक शीर हातावर घेऊन लढले त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था चीनने केली आहे. चीन ' स्वतंत्र ' करण्यासाठी ज्याना आपले दिवस घालवावे लागले, त्याना पद्धतशीर शिक्षण मिळाले नाही. राष्ट्र-मोचनाच्या श्रेष्ठ कार्यात ते गुंतले असल्यामुळे शिक्षणासारख्या बाबीकडे त्यांचे दुर्लक्ष होणे सहजच होते. परंतु देश ' मुक्त ' झाल्यानंतर त्यांच्या शिक्षणाची सोय करणे जरूर असल्यामुळे नवचीनमधील सैन्यात शिक्षणाचा प्रसार जारीने

करण्यात आला. याचा परिणाम म्हणजे आजच्या चीनमधील सैनिक हा जाणता सुशिक्षित होत आहे.

चीनमधील कामगार हा अधिक कार्यक्षम, कर्तव्य दक्ष व उत्पादनास मदत करणारा व्हावा यासाठी चीनमध्ये ' फुरसतीच्या वेळच्या शाळा ' ( Spare time Schools ) काढण्यात आल्या. कामगारांच्या शिक्षणासाठी देशातील कामगार संघटनेतील कार्यकर्ते व शैक्षणिक कार्य करणारी माणसे एकत्र आली व त्यानी सहकार्याने हा भाग हाती घेतला. चीनमधील लाखो कामगार या शाळांचा उपयोग करून घेतात. कामगाराना या शाळा आवडतात व दिवसें दिवस या शाळात शिकणाऱ्या कामगारांची भरच पडत चालली आहे.

खेड्यात राहणाऱ्या लोकांच्यासाठीही अशा शाळा काढल्या आहेत. या शाळात शिक्षण घेत असलेली ग्रामीण जनता संख्येने फारच मोठी आहे. आशियातील कोणत्याही प्रदेशात ग्रामीण लोक जास्त आहेत. लोकांचे शिक्षण हेच खरे देशाचे शिक्षण आहे. चीनमध्ये ग्रामीण भागात ' हिवाळी शाळा' ( Winter schools ) सुरू आहेत. खेड्यात राहणाऱ्या शेतकऱ्याना लिहिण्या वाचण्याबरोबरच देशातील राजकारणाचे धडे दिले जातात. लोकांचे जीवन सुधारावे म्हणून त्यांच्या जीवनाशी निकट संबंधित असलेल्या समस्या सुटाव्यात हाच प्रयत्न केला जातो. तेथील शिक्षणाचा किसानांच्या जीवनाशी संबंध जोडल्यामुळे किसानानाही ते आवडते व उत्साहाने ते आपली प्रगति करीत आहेत. चीनमधील शेतकरी आता जुन्याला चिकटून राहिलेला नाही. आपल्या शेतकामाकडे तो नव्या नजरेने पाहू लागला आहे. त्याला लोकासाठी जास्तीत जास्त अन्नधान्य पिकविण्यात आनंद वाटत आहे. इतर जनतेशी आपले काय संबंध आहेत हे तो जाणतो व त्यामुळे आपल्या कामात तो अधिक लक्ष घालतो. नवचीनमधील शेती,

कसणाऱ्यांच्याच हातात गेली आहे. त्यामुळे त्याना शेतीबद्दल आपुलकी वाटू लागली आहे.

साक्षरता प्रसार हा एक लोकशिक्षणाचा कार्यक्रम आहे. मावो-त्से-तुंग याबाबत म्हणाला कीं, " माझ्या देशातील निरक्षरता धुवून टाकणे म्हणजेच चीनला उजळून काढणे होय. " या देशात ८० टक्के लोकात बहुतेक किसान कामगारच आहेत व त्यांच्या जिवावरच चीन सुधारत आहे; म्हणून ते अज्ञानात खिचपत पडता कामा नये. साक्षरता प्रसाराचे काम सोपे होण्यासाठी चीनने लिपी शुद्धीचे काम हाती घेतले. चिनी भाषेत मुळाक्षरे जास्त आहेत. त्यांची लिपी ही चित्र लिपी आहे. त्यात तीन हजाराहून अधिक वर्ण आहेत. नवी लिपी निर्माण केली. नव्या लिपीतून नव्या जीवनाचे संदेश त्याना वाचायला मिळाले.

शेतकरी व कामकरी वर्गातून नेते निर्माण व्हावेत, त्यांच्यामधील हुशार लोकांच्या शहाणपणाचा विकास व्हावा यासाठी नवचीनने लहान मुदतीच्या माध्यमिक शाळा सुरू केल्या. शेतकरी व कामगार वर्गातील बुद्धिमत्ता संधीच्या अभावी पडून राहिली व कुजून गेली असे होऊ नये, हाच या शाळा उघडण्यामागील हेतु होता. देशातील पूर्वीच्या काळात मध्यमवर्ग व धनवान वर्ग यांचा विकास होण्याला वाव मिळाला, कारण त्यांच्याजवळ चार पैसे होते. कामगाराजवळ पैसा नव्हता व त्यामुळे शिक्षणाची संधि त्याला मिळाली नाही. किसान कामगारातून निर्माण झालेले नेते हे लोकांचे हित जाणणारे असतात व ते खऱ्या लोकशाहीला पोषक ठरतात, हे जाणूनच त्याना शिकविण्या-साठी या माध्यमिक शाळा ( Middle Schools ) सुरू केल्या आहेत.

शिवाय देशातील सर्व शिक्षणसंस्थांची दारे बहुजन समाजासाठी उघडी केली. निव्वळ पैसा नाही एवढ्या कारणाने लोकांचे शिक्षण झाले नाही असे होऊ नये हीच या पाठीमागची भूमिका होय. ज्याना

जे शिक्षण घेण्याची इच्छा असेल त्यानी ते जरूर घ्यावे व आपट आणि देशाची प्रगति करून समाजाच्या प्रतिष्ठेत भर घालावी, यासाट शिक्षणाला लोकशाहीची बैठक दिली.

श्री. र. के. खाडीलकर १९५२ मध्ये चीनला गेले होते. त्यानी चीनमध्ये काय बदल झाला आहे याचे वर्णन केले आहे. ते असेः "चीनमधील रेल्वे स्टेशनच्या आवारात मी येऊन दाखल झालो. तेथील दृश्य पाहून हे स्टेशन आहे कीं, लोकशिक्षणाचे केंद्र आहे असा संभ्रम मला निर्माण झाला. कारण स्वागतासाठी तांबड्या पताकानी व फलकानी आवार सुशोभित केले होते. परंतु त्यामध्ये एका बाजूला पुस्तकांची कांही कपाटे होती. जरा पुढे उंच मेजावर कॅरम बोर्डपाशी लोक कॅरम खेळत होते. पलीकडच्या बाकावर बरेच लोक वाचीत होते. एका काळ्या फळयावर कांही लिहिलेले होते. जिकडे तिकडे स्वच्छता व टापटीप दिसत होती. मधेच एका बाजूला स्टॉलवर पुस्तके व मासिके विक्रीसाठी ठेवलेली होती. या सर्वाला रेडिओची साथ होती. या सर्व वातावरणामुळें, ही एक लहानशी शाळाच असावी असा भास प्रथम झाला. मी या सर्वासंबंधी एका दुभाष्याला विचारले, तेव्हां तो म्हणाला, 'या स्टेशनवर प्रवाशांची रहदारी बरीच आहे. त्या सर्वांनी तेथे केवळ माशा मारीत न बसता येथील वाचनालयाचा उपयोग करावा, वाटल्यास खेळावे. त्यांच्यासाठी ही सोय आहे, येथेच नव्हे तर प्रत्येक स्टेशनावर करण्यात आली आहे. काम नसेल त्यावेळी स्टेशनातील कामगारानाही याचा उपयोग होतो. आगगाडीतही लहानसे वाचनालय असते. प्रवाशाने तेथून पुस्तक आणावे, वाचावे व तेथे परत नेऊन ठेवावे." नव्या राजवटीत लोक-शिक्षणाचे लोण आम जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी नवचीनने रेल्वे स्टेशनांचे लोकशाळेत रूपांतर केले आहे.

शिक्षणाचा म्हणजेच सुसंस्कारांचा सर्व जनतेत प्रसार होण्यासाठी चीनमध्यें संस्कृति प्रासादाची ( Culture Palaces ) योजना करण्यात आली आहे. त्यात चीनचा इतिहास, चित्रांच्या व वस्तूंच्या सहाय्याने लोकांच्या नजरेत भरेल असा मांडलेला आहे. कामगारांच्या चळवळीची रूपरेषा, कामगारांचे जीवन, कामगारानी केलेल्या लढ्याची हकीगत, कामगारानी औद्योगिक क्षेत्रात केलेले संशोधन या सर्वांची कल्पना या संस्कृति प्रासादात येते. यात लहान मुलांची व मोठ्या लोकांच्या शिक्षणाची व करमणुकीची सोय असते. वाचनालय, प्रदर्शन, नाटकगृह, मत्स्यालय व इतर लोकरंजनाची साधने या प्रासादात असतात. अर्थात् या प्रकारच्या लोकरंजनातून लोकशिक्षणही साधले जाते हे सांगावयास पाहिजे काय ?

———

# [१९]

# फिलिपिन्समधील प्रौढ शिक्षण

लेखकः—श्री. व्ही. बी. कर्णिक

ह्या देशातील बहुसंख्य लोक कधीच शाळेत गेले नव्हते. जे लहानपणी शाळेत गेले, त्यांचे शिक्षण ३–४ इयत्तांच्या पुढे गेले नाही. ह्या ३–४ वर्षात त्याना मिळालेली साक्षरता टिकाऊ होऊ शकली नाही. शाळेमध्ये मिळालेले शिक्षण पण केवळ पुस्तकी स्वरूपाचेच होते. अशा या परिस्थितीतच ह्या देशाला स्वातंत्र्य मिळाले. नव्या काळात आपणावर पडलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी लोकशिक्षणाची गरज, जाणत्या माणसाना पटू लागली.

दुसऱ्या महायुद्धापूर्वी ह्या देशात प्रौढ शिक्षणाचे काम सुरू झाले होते. १९४१ साली येथें ५०५३ प्रौढ शिक्षणाच्या शाळा होत्या. ह्या शाळामधून जवळ जवळ तीन लक्ष प्रौढ शिकत होते. सबंध देशाची लोकसंख्या जवळ जवळ दोन कोटी होती. लोकसंख्येच्या मानाने प्रौढ वर्गात येणाऱ्यांची संख्या फारच कमी होती.

शिक्षणाचा म्हणजेच सुसंस्कारांचा सर्व जनतेत प्रसार होण्यासाठी चीनमध्यें संस्कृति प्रासादाची ( Culture Palaces ) योजना करण्यात आली आहे. त्यात चीनचा इतिहास, चित्रांच्या व वस्तूंच्या सहाय्याने लोकांच्या नजरेत भरेल असा मांडलेला आहे. कामगारांच्या चळवळीची रूपरेषा, कामगारांचे जीवन, कामगारानी केलेल्या लढयाची हकीगत, कामगारानी औद्योगिक क्षेत्रात केलेले संशोधन या सर्वांची कल्पना या संस्कृति प्रासादात येते. यात लहान मुलांची व मोठ्या लोकांच्या शिक्षणाची व करमणुकीची सोय असते. वाचनालय, प्रदर्शन, नाटकगृह, मत्स्यालय व इतर लोकरंजनाची साधने या प्रासादात असतात. अर्थात् या प्रकारच्या लोकरंजनातून लोकशिक्षणही साधले जाते हे सांगावयास पाहिजे काय ?

———

[१९]

# फिलिपिन्समधील प्रौढ शिक्षण

लेखकः—श्री. व्ही. वी. कर्णिक

ह्या देशातील बहुसंख्य लोक कधीच शाळेत गेले नव्हते. जे लहानपणी शाळेत गेले, त्यांचे शिक्षण ३–४ इयत्तांच्या पुढे गेले नाही. ह्या ३–४ वर्षांत त्याना मिळालेली साक्षरता टिकाऊ होऊ शकली नाही. शाळेमध्ये मिळालेले शिक्षण पण केवळ पुस्तकी स्वरूपाचेच होते. अशा या परिस्थितीतच ह्या देशाला स्वातंत्र्य मिळाले. नव्या काळात आपणावर पडलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी लोकशिक्षणाची गरज, जाणत्या माणसाना पटू लागली.

दुसऱ्या महायुद्धापूर्वी ह्या देशात प्रौढ शिक्षणाचे काम सुरू झाले होते. १९४१ साली येथें ५०५२ प्रौढ शिक्षणाच्या शाळा होत्या. ह्या शाळामधून जवळ जवळ तीन लक्ष प्रौढ शिकत होते. सबंध देशाची लोकसंख्या जवळ जवळ दोन कोटी होती. लोकसंख्येच्या मानाने प्रौढ वर्गात येणाऱ्यांची संख्या फारच कमी होती.

स्वातंत्र्य मिळाल्यावर मात्र ह्या देशाने प्रौढ शिक्षणाचे काम जोराने चालवायचे ठरविले. १९४७ साली प्राथमिक शाळा व प्रौढांच्या शाळा, ह्यांचा संबंध अधिक घनिष्ट असावा असे ठरले. प्राथमिक शिक्षकावर प्रौढांच्या शिक्षणाची जबाबदारी टाकल्यावाचून हे काम वाढीला लागणार नाही, असे सरकारला दिसून आले. त्यामुळे प्राथमिक शिक्षकांच्याकडे ह्या कामाची जबाबदारी सोपविण्यात आली. ह्याचा परिणाम असा झाला कीं देशातील साठ हजार प्राथमिक शिक्षकांचे हात या कामाला लागले. प्रत्येक विद्यार्थ्याने कमीत कमी एका तरी माणसाला शिकवावे, असे पण सांगण्यात आले. त्यामुळे दोन लाख माध्यमिक शाळांचे विद्यार्थी हे काम करायला पुढे आले. प्राथमिक शाळातील वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांकडे पण हे काम सोपविण्यात आले. त्यामुळे हजारो छोटे शिक्षक प्रौढाना शिकवायला पुढे आले. शिक्षक व विद्यार्थी ह्यानी आपली स्वतंत्र फौज निर्माण केली व देशातील निरक्षरतेविरुद्ध त्यानी लढाईची आघाडी उभारली. सर्व शाळांच्या इमारती प्रौढांचे वर्ग चालविण्याकरिता उपयोगात आणल्या गेल्या. ह्या सर्व उपायामुळे ह्या देशातील प्रौढ शिक्षणाची चळवळ फोफावली.

१९४८-१९४९ ह्या काळात जवळ जवळ ८५ हजार छोटे बडे शिक्षक, साक्षरता प्रसाराच्या कामी लक्ष घालू लागले. नव्या स्वतंत्र झालेल्या ह्या देशात, एवढ्या मोठ्या प्रमाणात ही चळवळ चालवायला पैसा नव्हता. कमीत कमी वेळात आपला सारा देश साक्षर झाला पाहिजे, ह्याची जाणीव व तळमळ सर्वत्र दिसून येत होती. एकप्रकारचे उत्साहाचे वातावरण निर्माण झालेले होते. ह्या ८५ हजार प्रौढ शिक्षण कार्यकर्त्यांपैकी ५४३० शिक्षक व बाकीचे ७९३२४ विद्यार्थी कार्यकर्ते ह्यानी कोणत्याही प्रकारचा आर्थिक मोबदला न घेता, हे काम केले. शिक्षक विद्यार्थ्यांनी जो देशाभिमान दाखवून त्याग केला त्याचमुळे ह्या

देशातील साक्षरता वाढीला लागू शकली, एरव्ही पैसे खर्चून हे काम करवून घेणे, ह्या देशाला परवडले नसते.

ह्या साक्षरता प्रसाराच्या कामाला जोडून दुसरा एक कार्यक्रम आखण्यात आला. आरोग्य, सफाई, नागरिकशास्त्र, शेती, उद्योगधंदे, इत्यादि विषयावर व्याख्याने तयार करण्यात आली व त्यांच्या ध्वनि-मुद्रिका घेण्यात आल्या व त्यांच्या मदतीने ती लोकाना ऐकविण्याची व्यवस्था करण्यात आली.

ह्याच्या जोडीला बोलपट, मूकपट, रेडिओ, ग्रामोफोन इत्यादि साधनांची मदत घेण्यात आली. प्रौढांची वादविवाद मंडळे स्थापून त्याना स्वतंत्रपणे विचार करण्याची संधी देण्यात आली. ह्या सर्व योजनामुळे प्रौढ पण शिकायला पुढे येऊ लागले.

लोकशिक्षणाचे कार्यक्रम म्हणून लोकाना सफाईचे कार्यक्रम घेण्यास व नव्या पद्धतीचे संडास बांधण्यास उत्तेजन देण्यात आले. कोंबड्यांची, डुकरांची सुधारलेल्या पद्धतीने जोपासना करण्याची माहिती त्याना देण्यात येऊ लागली. अधिक भाजीपाला पिकविण्याबाबत त्याना मार्गदर्शन मिळू लागले. प्रौढानी आपली घरे स्वच्छ व आकर्षक ठेवावी म्हणून त्यांच्या चढाओढी लावल्या गेल्या. देशभर शिक्षक-पालक संघ स्थापण्यात आले. प्रत्येक शाळेला जोडून असा एक संघ स्थापण्यात आला. ह्या संघामार्फत शाळेतून बाहेर गेलेल्या विद्यार्थ्यांसाठी व सर्वसाधारण प्रौढासाठी व्याख्याने व करमणुकीचे कार्यक्रम घडवून आणण्याची व्यवस्था करण्यात आली. लोक केवळ साक्षर होऊन आज आपले भागत नाही. तर ते बहुश्रुत पण झाले पाहिजेत, त्यांचे आरोग्य सुधारले पाहिजे, त्यांची उत्पादन क्षमता वाढली पाहिजे. ते अधिक जबाबदार नागरिक बनले पाहिजेत म्हणून व्याख्याने व करमणुकीचे कार्यक्रम आखले जातात.

फिलिपिन्ससारख्या छोट्या देशाने आपली साक्षरता वाढविण्यासाठी

काय केले, ते वर दिले आहे. स्वतंत्र देशात प्रौढाना केवळ साक्षर करून भागत नाही तर त्याना खऱ्याखुऱ्या अर्थाने लोकशिक्षण दिले पाहिजे. स्वतंत्र झालेल्या नव्या राष्ट्रातील शिक्षक व विद्यार्थी, कोणत्याही प्रकारच्या आर्थिक मोबदल्याची अपेक्षा न धरिता, राष्ट्राच्या हाकेला ' ओ ' द्यायला पुढे येतात. डेन्मार्क हाही देश आज प्रौढशिक्षणाच्या क्षेत्रात आघाडीवर आहे. त्याचे सर्व श्रेय तेथील शिक्षक वर्गाला आहे. त्यानी कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न करता फिलिपिन्समधील शिक्षकाप्रमाणे प्रौढशिक्षणाच्या क्षेत्रात मोलाचे कार्य केले. आमच्या शिक्षक वर्गाला ही उदाहरणे स्फूर्ति देतील.

# [२०]

# थायलंडमधील लोकशिक्षण

लेखक—**श्री. व्ही. बी. कर्णिक**, लोकशिक्षणाधिकारी, महाराष्ट्र.

कांही दिवसापूर्वी थायलंडचे एक शिक्षणाधिकारी आपल्या येथे लोकशिक्षणाचे काम पाहण्यास आले होते. त्यांचे नाव पाँग सुरत्न. पुढे ते विमान अपघातात मरण पावले.

ह्या थायलंड देशामध्ये प्रौढ शिक्षणाचे जे काम चालू आहे त्याची माहिती अशी आहे.

थायलंड-देशातील लोक मुख्यत्वे करून बौद्ध धर्मीय आहेत. ह्या देशात सुमारे २००० बुद्धाची देवालये आहेत. साधारण दहा मैलांचा टापू जर आपण घेतला तर, त्या भागात, बुद्धाचे एक तरी देवालय असणारच. पूर्वीच्या काळी लहान मुले व मोठी माणसे ह्या देवळात शिक्षण घेण्यासाठीं येत असत. जनतेच्या शिक्षणाची प्रभावी केंद्रे म्हणून ह्या मठांचा त्या काळी उपयोग केला जात असे. हे जे विद्यादानाचे

काम ह्या मठामार्फत चालू असे त्या कामामागे एकादी संघटित योजना मात्र नव्हती. ह्या नंतरच्या काळात ठिकठिकाणी नव्या शाळा उघडल्या गेल्या व ह्या बुद्ध भिक्षूनी आपले हे विद्यादानाचे काम हळू हळू अंगाबाहेर टाकले. परंतु ह्या देशात एक फार चांगली परंपरा चालू आहे. ह्या परंपरेचा उपयोग प्रौढ शिक्षणाच्या कार्यक्रमासाठी फार मोलाचा असा होतो. ह्या देशातील प्रत्येक व्यक्तीने ३ ते ४ महिने बुद्ध भिक्षु झालेच पाहिजे, व बौद्ध भिक्षु होण्यापूर्वी किंवा भिक्षु असतानाच त्यानीं लिहायला वाचायला शिकलेच पाहिजे. ह्या परंपरेमुळे कोणतीही प्रौढ व्यक्ति केव्हां ना केव्हां तरी साक्षर होतेच.

आमच्या पद्धतीने प्रौढशिक्षणाचा कार्यक्रम त्यानी १९३८ साली आखला. ह्या वर्षी तेथील पार्लमेंटने जाहीर केले कीं, लिहायला वाचायला शिकणे जरुरीचे आहे, ही गोष्ट प्रत्येक प्रौढाला समजावून सांगितली पाहिजे; त्याचप्रमाणे ह्या प्रौढाला नागरिकाचे हक्क व त्याची जबाबदारी पण समजावून सांगितली पाहिजे. प्रारंभी साक्षरतेवरच भर देण्यात आला. एशियातील इतर कोणत्याही देशापेक्षा, १९३८ साली, थायलंडमध्ये साक्षरतेचे प्रमाण फार चांगले होते. परंतु थायलंडच्या दुसऱ्या कांही अडचणी होत्या. ह्या कामासाठी अंदाजपत्रकात तरतूद नव्हती. अभ्यासक्रम व पुस्तके घाईघाईने तयार करण्यात आली होती. ट्रेनिंग घेतलेले कार्यकर्ते नव्हते. दिवसा भरपूर काम करणाऱ्या प्राथमिक शिक्षकानाच ह्या कामासाठी राबविण्यात आले. असे असून सुद्धा, सर्व जिल्ह्यातून प्रौढाना साक्षरता देण्यासाठी वर्ग काढण्यात आले. ह्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे वर्ग काढण्यात आले होते; परंतु बहुतेक सर्व वर्ग रात्रीचे चालत व ते सुद्धा आठवड्यातून एक ते तीन दिवस चालत. १९४० साली थायलंडमध्ये ३५२५ प्रौढशिक्षणाच्या शाळा होत्या व ह्या शाळामधून २०८००० प्रौढ शिक्षण घेत होते. १९४१ साली सरकारने

प्रौढशिक्षणासाठी अंदाजपत्रकात विशेष तरतूद केली व त्यावर्षी अभ्यास-क्रम तयार करण्यात आला. पाठ्यपुस्तके पण तयार झाली. शाळांची संख्यापण वाढली. १९४१ साली ५१९१ शाळा होत्या. त्यामधून ३६५००० प्रौढ शिकत होते.

ह्या काळात प्रौढशिक्षणाच्या चळवळीला जो वेग आला त्याचे कारण म्हणजे सरकारने प्रौढ शिक्षणाच्या बाबतीत थोडी सक्ति करायला सुरुवात केली. थायलंडमध्ये ७०००० प्राथमिक शिक्षक होते. त्या सर्वांना हे काम करायला सांगण्यात आले व त्याना प्रत्येक साक्षर होणाऱ्या प्रौढामागे थोडी ग्रँट पण देण्यात आली. १९४३साली 'साक्षरता संवर्धक कायदा' जारी करण्यात आला. ह्या कायद्याने एका ठराविक मुदतीत सर्व प्रौढानी साक्षर झालेच पाहिजे. जे होणार नाहीत त्याना दंड करण्यात येईल असे जाहीर केले. ह्या कायद्यामुळे, नाखुषीने का होईना पण लोकानी प्रौढांच्या वर्गात गर्दी केली. ह्या साली प्रौढांच्या शाळांची संख्या १३१५७ पर्यंत वाढली व ह्या शाळामधून ११,०७,००० प्रौढ शिक्षण घेऊ लागले. थायलंडमधील साक्षरतेची चळवळ ह्या वर्षी उच्च बिंदूला जाऊन पोहोचली. कांही खाजगी व सार्वजनिक संस्थानी पण ही चळवळ उचलून धरली. त्यानी प्रौढासाठी शाळा चालविल्या पण सरकारी शाळांची संख्याच मोठी होती.

नंतर मात्र ह्या चळवळीला ओहोटी लागली. साक्षरता संवर्धक कायद्याला, पार्लमेंटचा पाठिंबा मिळाला नाही. युद्ध तहकुबीनंतर आर्थिक संकट आले. शिक्षकाचा उत्साह मंदावला. कारण प्रौढावरची सक्ति काढून टाकण्यात आल्यावर प्रौढ वर्गांना येईनासे झाले. १९४९ सालापर्यंत हे काम मंदगतीने चालले. ह्या साली पुन्हा ह्या कार्याला चालना देण्यात आली. ह्या साली पुढील गोष्टी करण्यात आल्या—

( १ ) पूर्वी साक्षर होणाऱ्या प्रौढामागे देण्यात येणारी ग्रँट अगदीच मामुली स्वरूपाची होती. आता ग्रँटचा दर वाढविण्यात आला.

( २ ) प्राथमिक शाळाना जोडून प्रौढाना माध्यमिक शिक्षण देण्याचे वर्ग सुरू करण्यात आले. त्यामुळे पूर्व साक्षर प्रौढाना अधिक शिक्षण घेण्यास हुरूप आला.

( ३ ) ह्या वर्गामधून जमाखर्च व कपडे तयार करणे ह्या सारखे विषय शिकविण्याची सोय झाली.

( ४ ) ह्या कामासाठी चलत् चित्रपट व इतर तत्सम साधनांचा उपयोग करण्याचे ठरले.

( ५ ) सर्व जिल्ह्यात वाचनालये काढण्याचे ठरले.

( ६ ) सरकारने डॉ. लॉबॉक ह्याना आमंत्रण देऊन त्यांची साक्षरता देण्याची योजना स्थानिक अधिकाऱ्याना समजावून देण्यात आली व त्यांच्या मदतीने नवी पाठ्य पुस्तके व इतर शिकविण्याची साधने तयार करण्यात आली.

( ७ ) औद्योगिक कारखानदारांच्या मदतीने त्यांच्या मजुरांच्या शिक्षणासाठी शाळा उघडण्याचे ठरले.

सरकारच्या इतर खात्याचे अधिकारी आपआपल्या साधन सामुग्रीसह खेड्यात जाऊन प्रचार करू लागले. ही मंडळी तेथे राहून आपआपल्या खात्यामार्फत चाललेल्या कामाची माहिती सांगू लागले व त्याचप्रमाणे आरोग्य विषयक व व्यवसाय विषयक माहिती देण्याची व्यवस्था झाली.

ह्या सर्व योजने प्रमाणे पूर्वीसारखे भडक स्वरूपात काम जरी झाले नाही तरी कामाची गति हळूहळू वाढू लागली. ह्या काळात शिक्षकाचे ट्रेनिंग व पाठ्यपुस्तके तयार करणे ह्याकडे विशेष लक्ष पुरविण्यात आले. प्रौढ शिक्षण पथके निर्माण झाली. ह्यांच्याजवळ ह्या कामाला योग्य अशी साधन सामुग्री देण्यात आली. अशी ४० पथके तयार झाली व ती ७० पैकी ४० प्रांतामध्ये पाठविण्यात आली. हळूहळू ह्यांची संख्या वाढत आहे. ह्याप्रमाणे थायलंडमध्ये प्रौढ शिक्षणाचे काम चालू आहे.

[२१]

# इजिप्तमधील लोकशिक्षण

लेखकः—**श्री. व्ही. बी. कार्णिक**, लोकशिक्षणाधिकारी, महाराष्ट्र.

या लेखात आम्ही आपल्या नजीकच्या एका देशाची माहिती देणार आहोत. तो देश म्हणजे इजिप्त. येथे १९३७ साली फक्त १८ टक्के लोक साक्षर होते. इजिप्तमध्ये लोकाना साक्षर करण्याचे काम मुख्यतः सरकारनेच चालविले आहे. खाजगी संस्थानी ह्या कामाला मदत देण्याचे ठरविले आहे.

१९४४ साली इजिप्तमध्ये एक कायदा करण्यात आला. ह्या कायद्याने प्रौढाना सायंकाळच्या प्रौढ शिक्षण वर्गात येण्यास भाग पाडण्यात आले. त्याचप्रमाणे ह्या कायद्याने, सावकारावर व कारखानदारावर आपल्या मजुराना प्राथमिक शिक्षण देण्याची सक्ति केली. ह्या कायदा यशस्वी करण्यासाठी, वेगवेगळ्या संस्था सरकारला साह्य करीत आहेत. शिक्षण खात्याकडून ह्या योजनेला पैसा पुरविला

जातो व ह्या कामावर देखरेख ठेविली जाते. तुरुंग खाते, पोलिस व लष्कर खाते ह्यांची ह्या कामाला खूप मदत होते.

ह्या कायद्याप्रमाणे १२ ते ४५ वयाचे पुरुष व १२ ते १५ वयाच्या मुली ह्यांच्यावरच सक्ति लागू करण्यात आली होती. पुढे सरकारच्या अडचणी वाढू लागल्या. पुरेसा पैसा नाही; साधन सामुग्रीची चांगलीशी तरतूद नाही; त्यामुळे सरकारने सक्तीचे क्षेत्र आणखी मर्यादित केले. १२ ते १८ वयाची मुले व १२ ते १५ वयाच्या मुली ह्यांच्या पुरतीच सक्ति लागू करण्यात आली.

गीझा ह्या गावी एक नवा प्रयोग करण्यात आला. त्या ठिकाणी प्रत्येक शिकलेल्या माणसाची ह्या कामासाठी भरती करण्यात आली. त्याने खेडूताना त्यांच्या फुरसतीच्यावेळी शिकविलेच पाहिजे असे सांगण्यात आले. कार्यकर्त्यांना हरएक प्रकारची मदत करण्यात आली. शिकलेल्या प्रौढाना उपयुक्त विषयावरील पुस्तके फुकट वाटण्यात आली.

लष्करामधील निरक्षरता काढून टाकण्याच्या उपक्रमाला प्रारंभ १८७० साली झाला. ह्या पूर्वीच्या अभ्यासक्रमात नवीन विषयांची भर घालण्यात आली. आज सैन्यातील ८० टक्के लोक आपली रोजची कामे संभाळून शिकायला जातात. हिवतापाची साथ सुरू झाली कीं सैन्यातील लोकाना त्या साथी विरुद्ध उपाय योजण्याची कामे करावी लागतात. अशा वेळी पण हे सैनिक प्रौढ शिक्षणाच्या वर्गात येण्याचे टाळत नाहीत.

ह्या खेरीज जनता विद्यालयामार्फत लोकशिक्षणाचे काम चांगलेच चालते. ह्या जनता विद्यालयाचे विद्यार्थी समाज सेवेची कामे करतात. ह्या विद्यार्थ्यांचे कार्यक्षेत्र शाळेतील चार भिंती पुरतेच मर्यादित राहिलेले नाही; तर आजूबाजूला पसरलेल्या लाखो अज्ञ बांधवांच्या सुधारणेची जबाबदारी पण त्यानी स्वीकारलेली आहे.

ह्या जनता विद्यालयाचे लोक नवसाक्षर प्रौढाना अधिक सुसंस्कृत करण्याचा प्रयत्न करतात. त्या प्रौढाना त्यांच्या धंद्याविषयींची उपयुक्त माहिती देतात. जनता विद्यालयाचा उद्देशच हा आहे कीं आपल्या आपल्या भोवती पसरलेल्या स्त्रीपुरुषाना आपल्या ज्ञानात वाढ करायला मदत करणे व त्याना स्वतंत्रपणे विचार करायला लावणे. ह्यायोगे ह्या प्रौढांचे जीवन अधिक सुखमय होईल व आजच्यापेक्षा ते समाजाला अधिक मदत करू शकतील.

इजिप्तमध्ये तीन चतुर्थांश लोक खेड्यात राहतात. ही खेड्यातील लोकांची संख्या जवळजवळ १ कोटी ४० लाख झाली आहे. ह्या लोकाना त्यांची आर्थिक, सांस्कृतिक व सामाजिक परिस्थिति सुधारण्यासाठी शिक्षणाची गरज भासते. जनता विद्यालयाचे विद्यार्थी खेडयात जातात. तेथील लोकांचे प्रश्न समजून घेतात. त्यांची नीट छाननी करतात व ते प्रश्न सोडविण्यास हरएक प्रकारची मदत करतात. लोकांच्यासाठी वेगवेगळ्या विषयावर उपयुक्त अशी भाषणे केली जातात व ती भाषणे आकाशवाणीमार्फत जनतेपर्यंत पोहोचतीं केली जातात. ह्या खेरीज जनता विद्यालयाचे विद्यार्थी जनतेमध्यें जाऊन, बोलपट, मूकपट व आकाशवाणी ह्यांच्या मार्फत लोकाना शिक्षण देण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारचे मौलिक कार्य आज ११००० विद्यार्थी इजिप्तमध्ये करीत आहेत.

ह्या खेरीज ग्रंथालयाची चळवळ जोराने चालू करण्यात आली आहे. नगरपालिका ग्रंथालये व वाचनालये चालवितात. कायरोमधील एका मोफत वाचनालयात वर्तमानपत्रे, मासिके ह्या खेरीज १०००० पुस्तके आहेत व त्या ठिकाणी आबालवृद्ध वाचायला येतात. ह्या ठिकाणी व्याख्यानमाला चालते व व्याख्यानानंतर बोलपट दाखविले जातात.

लोकशिक्षणाचे एक अत्यंत प्रभावी साधन म्हणून नाटकांचा उपयोग केला जातो. जनतेची करमणूक करण्यासाठी, त्यांचे सामाजिक व आर्थिक जीवन सुखावह व्हावे म्हणून जरूर ती माहिती देण्यासाठी, नाटकांचा वापर फार मोठ्या प्रमाणात केला जातो. ह्या योजनेप्रमाणे खेडोपाडी नाटकगृहे काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. लोकांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्याबाबत मार्गदर्शन करणारी नाटके लोकाना खूपच आवडतात. जनतेच्या हितासाठी सरकारने केलेले कायदे व सुखसोयींच्या तरतुदीबद्दल प्रचारात्मक नाटके बसविली जातात. ही नाटके लोक आवडीने पाहतात. आज सर्व ठिकाणीच कांही चांगली बांधलेली नाटकगृहे नाहीत; म्हणून फिरत्या रंगभूमीची सोय केली आहे. मोटरमधून नाटक करणारे नट खेड्यापाड्यातून नेले जातात व ग्रामीण जनतेला नाटके करून दाखवितात. ह्या योजनेमुळे लोकाना चांगली सात्त्विक अशी करमणूक मिळते. त्यांच्या शिक्षणात भर पडते व जनतेमध्ये सुप्तावस्थेत वावरणारी कला उजेडात येऊ शकते. नाटक हे लोकशिक्षणाचे एक मोठे प्रभावी साधन आहे, याला इजिप्तच्या अनुभवावरून पुष्टि मिळते.

———

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत
क्रमांक १८८५५ वि: ...
ग्रंथांक ९०२५ नों: दि: २८/३/५५

# [२२]

# पाणथळीच्या जागेत भातशेती

## आफ्रिकेतील लोकशिक्षण

लेखक:—श्री. व्ही. वी. कर्णिक, लोकशिक्षणाधिकारी, महाराष्ट्र.

पश्चिम आफ्रिकेत लोकांच्या मदतीने एक नवा प्रयोग करण्यात आला. ह्या प्रदेशातील गोल्ड कोस्ट नावाच्या भागाच्या उत्तरेला एक खूप दलदलीचा प्रदेश होता. ह्या भागात जवळ जवळ दहा लाख लोक रहात होते. ह्या लोकांचा मुख्य धंदा शेतीचा होता, परंतु शेती करण्याची पद्धति जुनाट होती. शेतीचे उत्पन्न त्यामुळे फार कमी येई. साहजिकच येथील लोक दरिद्री होते. शिक्षणाचे प्रमाण फारच कमी होते. शंभरात एकादा माणूस साक्षर होता.

ह्या ठिकाणी प्रौढाना शिकविणारे कार्यकर्ते व विकास योजनेचे कांही अधिकारी गेले. ह्या सर्व लोकाना एक गोष्ट पटली. येथील

लोकाना स्वतःच्या पायावर उभे राहण्याला मदत केली पाहिजे. ह्या गावी दलदलीमुळे एका विचित्र प्रकारच्या माशा खूप होत्या. ह्या माशा माणसाना किंवा जनावराना चावल्या तर त्याना सारखी झोप येण्याचा रोग जडे. ह्या माशामुळे लोकाना खूप त्रास होतो व येथील दलदलीमुळे ह्या माशा येथे मोठ्या प्रमाणात वाढतात, हे येथील लोकाना विशेषतः त्यांच्या पुढाऱ्याना पटवून देणे जरूर होते. ह्या दलदलीतून किंवा पाणथळीतून आपणास चांगली भातशेती तयार करता येईल, तुम्ही मदत मात्र केली पाहिजे, असे लोकाना सांगण्यात आले.

लोक श्रमदान करायला पुढे झाले. त्यानी तेथील दलदल साफ केली व जवळच एक बंधारा बांधला. ह्या बंधाऱ्यामुळे भाताच्या शेतीला सारखा पाणी पुरवठा मिळणे शक्य झाले. शेतकी खात्याच्या अधिकाऱ्यानी ह्या लोकाना चांगले बी बियाणे पुरविले व जरूर तेथे तांत्रिक सल्ला दिला. थोड्या वेळाने लोकांच्या मेहनतीला चांगले फळ आले. भाताची कणसे शेतातून डोलू लागली. ज्या ज्या शेतकऱ्यानी श्रमदान केले होते, त्यांच्याकडे त्या शेताचा एक भाग कापणी करिता देण्यात आला. अशा रीतीने १२ एकर शेतीतून पीक घेण्यात आले. एकरी ९५४ पौण्ड भात हाती आले. प्रत्येकाने कापणी केलेले भात त्याला मिळाले. कांही शेतकऱ्यानी भात खाण्यासाठी ठेऊन घेतले. ज्याना ते विकावयाचे होते त्यांचे भात सोसायटीमार्फत विकण्यात आले. त्यामुळे मध्यस्थी दलालाला फायद्याचा भाग देण्याची गरज राहिली नाही. ह्या शेतीच्या कामावर पुरुषाच्या जोडीने बायकानी पण श्रमदान केले व त्यामुळे त्याना पुरुषात मिसळण्याची संधि मिळाली.

ह्या अपूर्व योजनेमुळे दलदल नाहीशी झाली. त्यामुळे माशा गेल्या. लोकांचा आजार गेला. लोकानी भात लावल्यामुळे त्यांच्या हातात दोन पैसे आले. ह्या निमित्ताने लोकाना जाणीव झाली कीं, आपल्या

अडचणीतून आपणाला मार्ग काढता येऊ शकतो. ह्या योजनेमुळे लोकांच्या मध्ये संघटन वाढले. लोकाना शिक्षण देण्याचे कामपण सोपे झाले.

हा प्रयोग आमच्या कार्यकर्त्यांनी समजून घेतला पाहिजे. लोकाना शिकवायचे असेल तर सुरवातीलाच त्यांच्या हातात पाटी पुस्तके कोंबून काम होत नाही. लोकांच्या निकडीची गरज कोणती ती समजून घेऊन ती गरज पुरी पाडण्यासाठी लोकाना मदत केली पाहिजे. लोकशिक्षणाचा खरा अर्थ हाच आहे. लोकाना त्यांचे प्रश्न कोणते आहेत ह्याची जाणीव करून देणे हे पहिले काम व ते प्रश्न त्याना स्वतःलाच कसे सोडविता येतील, ह्या विषयी जरूर ते मार्गदर्शन करणे व त्याच्या करिता करता येईल तेवढी मदत करणे हे लोकशिक्षणाचे कार्यकर्त्याचे दुसरे काम. लोकशिक्षणाचा आजच्या काळातील अर्थ हाच आहे कीं, लोकाना एकमेकांच्या मदतीने सर्वांच्या उन्नतीसाठी उपयोगी पडतील असे कार्यक्रम हाती घ्यायला तयार करणे.

८५३०

[२३]

# ब्रिटिश टोगोलँड येथील प्रौढ-शिक्षण

लेखक—श्री. बा. ग. जगताप, पुणे

'प्रौढ शिक्षण' देण्याचा प्रयत्न केवळ भारतामध्ये होत नसून तो सर्व जगभर होत आहे. विशेषतः मागासलेल्या देशामध्ये ते जोराने पसरविण्याचा प्रयत्न होत आहे. आपण प्रौढाकरिता वर्ग काढतो. तेथे स्थानिक कार्यकर्त्यांची मदत घेतली जाते. कांही दिवस तो कार्यकर्ता काम करतो. परंतु त्याचा उत्साह कमी झाला किंवा लोक कंटाळले म्हणजे वर्ग बंद पडतात.

टोगोलँड येथे प्रौढ शिक्षण देणारे संघ आहेत. ते एके ठिकाणी कांही दिवस काम करतात. तेथे काम संपले म्हणजे दुसऱ्या ठिकाणी जातात. शिक्षणाचे बाबतीत पुढाकार घेऊन मार्गदर्शन करणाऱ्या या टोळ्या काय शिकवतात? मातृभाषेत लिहिणे, वाचणे, हिशेब करणे, प्रथमोपचार व आरोग्य याविषयी माहिती, संगीत, नाट्य, शारीरिक

खेळ, नागरिक शास्त्र वगैरे प्रौढाना शिकविले जाते. चार माणसामध्ये बसून एकाद्या विषयाची चर्चा कशी करावी, हेही त्याना शिकविले जाते. स्त्रियाकरिता कांही विशेष ज्ञान दिले जाते. हे सगळे शिकवीत असता, आपल्या गरजा कोणत्या आहेत व त्या भागविण्याकरिता स्वावलंबनाने प्रयत्न कसा करावा, ही जाणीव प्रौढामध्ये उत्पन्न केली जाते.

प्रौढाकरिता सर्व प्रकारचे वाङ्मय तयार करण्यासाठी एक समिति नेमण्यात आली आहे, परंतु छापण्याचे काम या समितीने करावयाचे नसून खाजगीरीत्या हे काम करणाऱ्या व्यक्तींना व संस्थाना प्रोत्साहन देण्यात येते.

या फिरत्या मंडळ्या कांही दिवस काम करतात. परंतु उभे केलेले काम पुढे चालावे यासाठी स्थानिक कार्यकर्त्याकरिता एक ट्रेनिंग संस्था निर्माण करण्यात येते. ज्याना समाजातील रीतिरिवाज माहीत आहेत, निरक्षराबद्दल सहानुभूति वाटते व त्याच्या आशाआकांक्षा काय आहेत हे ज्याना समजते, स्थानिक कमीत कमी दोन भाषा ज्याना समजतात, ज्याना आपल्या गावचे भले व्हावे अशी तळमळ आहे, सेवा करण्याची तयारी आहे व जे खेड्यातील लोकाना स्फूर्ति देऊ शकतात, अशाच लोकांचा अंतर्भाव या संस्थेमध्ये केला जातो.

स्थानिक लोकाना ट्रेनिंग देण्याचे काम, या कामासाठी नेमलेल्या लोकाकडूनच होते असे नाही. संघाबाहेरील खाजगी संस्थाकडून व सरकारी अधिकाऱ्याकडून सहाय्य घेतले जाते. ट्रेनिंग संस्थेची उभारणी, ज्या ठिकाणी जीवनाचे प्रश्न हरघडी उत्पन्न होतात, अशाच ठिकाणी केली जाते.

साक्षरता प्रसाराचे कार्यास लोकानी मोठ्या प्रमाणात हातभार लावावा, यासाठी प्रोत्साहन दिले जाते. पोलीस शिपायाच्या दंडावर ज्याप्रमाणे फिती असतात व ज्यावरून त्या शिपायाचा दर्जा आपण

८५३०
८८३०
(१०
REFBK-0008530

ओळखू शकतो. त्या प्रमाणे १० प्रौढ साक्षर करणाऱ्यास एका पांढऱ्या फितीचा बिल्ला, २० साक्षर करणारास तीन पांढऱ्या फितींचा बिल्ला दिला जातो. ज्याना हे बिल्ले दिले जातात, त्यांच्या नावाचा उल्लेख वर्तमान पत्रातून केला जातो. बिल्ल्याच्या खाली 'प्रगतीसाठी साक्षरता' असे ध्येयवाक्य म्हणून लिहिले जाते.

या कार्यासाठी दोन मोटार गाड्या ठेविल्या आहेत. खेड्यापाड्याला जावयाचे, प्रौढ साक्षरतेच्या कार्याविषयीची चित्रे दाखवावयाची, भाषणे करावयाची व खेड्याला मार्गदर्शन करतील असे नेते निवडावयाचे हे त्यांचे काम. प्रौढांचा वर्ग सुरू करण्यापूर्वीची ही सगळी तयारी असते. जे कार्यकर्ते निवडले जातात त्याना ७-८ दिवसांचे ट्रेनिंग दिले जाते. जे कामात गुंतलेले असतात व ज्याना या ट्रेनिंगसाठी आठवडाभर वेळ देता येत नाही, त्यांचेसाठी आठवड्यातून एक दिवस, याप्रमाणे कांही दिवस ट्रेनिंग दिले जाते.

साक्षरता एकदा मिळाली म्हणजे सर्व कांही मिळाले हे जितके चूक आहे, तितकेच साक्षरतेने कांही होत नाही, हे म्हणणेही चूक आहे. साक्षरतेचे शिक्षण देता देता स्थानिक गरजा लक्षात घेऊन त्या सोडविण्याचा प्रयत्न झाला तर लोकामध्ये आत्मविश्वास निर्माण झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. गाव साक्षर झाला म्हणजे त्याचे दारात आपण प्रगति आणली असे होते.

ज्या ठिकाणी वर्गांचे काम चाललेले असते तेथेच बहुधा परीक्षा घेतल्या जातात. कांही वेळा दुसऱ्या ठिकाणीही त्या घेतल्या जातात. परंतु ज्या अधिकाऱ्याकडे साक्षरता प्रसाराच्या कामाची जबाबदारी आहे, त्याकडे परीक्षा घेण्याचे काम सोपविलेले नसते. एका वरिष्ठ अधिकाऱ्याचे देखरेखीखाली त्या परीक्षा होतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक ९२५५५ वि: ....
क्रमांक ७०२५ नों: दि: २५/३/५५

परीक्षा पास झाल्यानंतर परीक्षेची प्रमाण पत्रके व ग्राम-नेता बिल्ले दिले जातात. त्यासाठी समारंभ करविला जातो. मोठ्या थाटाने सर्व गाव असे समारंभ साजरा करतो. गाणे बजावणे सुरू असते. एका मोठ्या वंदनीय पुढाऱ्याचे हस्ते हे बिल्ले व प्रमाणपत्रके दिली जातात.

नव साक्षरासाठी मातृभाषेत वर्तमानपत्र प्रसिद्ध होत असते. या पत्राचे मोल आणा अर्धा आणा असते. ते सध्या महिन्यातून एकदा प्रसिद्ध होते. ते साप्ताहिक करण्याचा सरकारचा विचार आहे. प्रौढांचे वर्गात जी पाठ्य पुस्तके वापरली जातात तीही सरकारमार्फत छापण्याची व्यवस्था झाली आहे.

गावातील लोक पोटासाठी दरवर्षी बाहेर जात असतात. अशा गावी जेव्हां गावकरी स्थिर असतील, अशाच वेळी साक्षरतेचे वर्ग काढले जातात.

लोकाना शिकविण्याचे काम स्वयंसेवकाकडून केले जाते. या कामासाठी त्याना कोणत्याच प्रकारचे मानधन मिळत नाही. फक्त त्याना एक बिल्ला देण्यात येतो. या वर्गाकरिता सर्व दिवस जरी त्याना सेवा करता आली नाही तरी निम्मी अधिक सेवा त्यानी करावी, अशी अधिकाऱ्यांची अपेक्षा असते. साक्षर झालेल्या माणसाकडून ग्राम-नेते तयार करण्याचा प्रयत्न होतो व या नेत्याकडेच साक्षरता टिकविण्याची व गावाच्या प्रगतीसाठी कांही करण्याची कामगिरी सोपविली जाते.

टोगोलँड येथे जे कार्य चालू आहे, त्यावरून बऱ्याच गोष्टी आपणास व आपल्या सहकाऱ्यासही शिकण्यासारख्या आहेत. आपली प्रगति व्हायची असेल तर आपला गाव सुधारला पाहिजे. गावाची सुधारणा आपल्या सेवेशिवाय होणार नाही; ही जाणीव प्रत्येक नागरिकास होणे आज अत्यंत महत्त्वाचे आहे.

# लोकशिक्षणमाला


* चावडीवरच्या गोष्टी भाग १ ... ८ आणे
* चावडीवरच्या गोष्टी भाग २ ... ८ ,,
* आपण एकमेकांची घरे बांधू या.... ८ ,,
* तुकाराम-रामदास .... .... ८ ,,
* राजा आणि मंजुळा .... .... ८ ,,
* मोत्याचे कणीस .... ... ८ ,,
* माणिक मोती .... .... .... ४ ,,
* अभंगाची शिकवण .... .... ४ ,,

— विकास योजनेच्या क्षेत्रातील प्रौढवर्गांना उपयुक्त —

तसेच

सर्व प्रौढ [ स्त्रिया व पुरुष ] वर्गांसाठी

( अभ्यास पुस्तके )

लेखकः—कृ. भा. बाबर व शं. ल. थोरात

प्रौढांचे वाचन, पुस्तक १ लेः—पहिली परीक्षा, किंमत ८ आ.
प्रौढांचे वाचन, पुस्तक २ रेः—दुसरी परीक्षा, किंमत ८ आ.

लेखिकाः—डॉ. सरोजिनी बाबर, एम्. ए., पीएच्. डी.

भगिनी शिक्षण, पुस्तक १ लेः—पहिली कसोटी, किं. ८ आणे
( खास भगिनीसाठी लिहिलेले )



जगताप-कारले प्रकाशन

१९२ शुक्रवार, पुणे २.